

म ग्रं.सं. ठाणे
विषय : भू. प्रवास
सं क्र ५९०

# नाईल नदीचा शोध



RLFBK-0022002

किंमत तेरा रुपये

मुखपृष्ठ : अनंत साळकर


मुद्रक:

सौ. आशा प्र. बापट

स्मिता मुद्रणालय,

१२९८, शुक्रवार पेठ, पुणे २.

# प्रस्तावना

इजिप्तमध्ये प्राचीन काळापासून संस्कृती नांदत होती. इजिप्तची लोकमाता म्हणजे 'नाईल'! या नाईल नदीवरच इजिप्तचे भवितव्य अवलंबून होते. तरीही नाईल नदी कोठून वाहत येते, याचे गूढ दोन हजार वर्षे कायम राहिले शेवटी हा गूढ उलगडण्याचा प्रयत्न ब्रिटिश व जर्मन संशोधकांनी केला इजिप्तमधील कोणालाही नाईल नदीचा शोध घ्यावासा वाटला नाही

नाईल नदीच्या शोधामुळेच मध्य आफ्रिकेत ब्रिटिश वर्चस्व स्थापन झाले आणि इंग्लंडचा अमाप फायदा झाला नाईल नदीच्या शोधाचा इतिहास इंग्लंडच्या दृष्टीने राष्ट्रीय गौरवाचा भाग आहे व त्यात भाग घेणारे संशोधक इंग्लंडमध्ये राष्ट्रीय वीर ठरले आहेत नाईल नदीच्या संशोधन मोहिमांचे अनेक दृष्टीकोनातून विवेचन करणारी पुस्तके अजूनही इंग्लंडमध्ये प्रसिद्ध होत असतात

नाईल नदीच्या उगमाच्या शोधाची कहाणी अपूर्व अशीच आहे जे संशोधक आफ्रिकेच्या अंतर्भागात शिरले त्यांनी बरोबर सैन्य नेले नव्हते. वन्य जमातीशी मैत्री करूनच त्यांनी आपला कार्यभाग साधला त्यांचे कार्य मानवतेच्या दृष्टीकोनातूनही महत्त्वाचे आहे या संशोधकांनी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातही आफ्रिकेतील निष्पाप वन्यांना गुलाम म्हणून कसे पकडले जात आहे याबद्दल हाकाटी केली त्यामुळेच आफ्रिकेतील लोकांना गुलाम म्हणून पकडणे बंद झाले

आजपर्यंत मराठी वाचकांच्या वाचनात कधीही न आलेले अनेक रोमहर्षक प्रसंग व घटना या पुस्तकात आढळतील एखाद्या कादंबरीपेक्षाही रोचक झालेली ही शोधाची कहाणी वाचकांना खिळवून ठेवेल अशी माझी खात्री आहे

१७–१०–१९७७
वरदा, सेनापती बापट मार्ग,
पुणे–१६.

ह अ भावे

# अनुक्रमणिका


| प्रकरण | कथेचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | नाईल नदीचे गूढ | ५ |
| २. | १८५६ चे झांझीबार | ९ |
| ३ | पहिली मोहीम | २३ |
| ४. | निसर्गाच्या कुशीत ! | ३४ |
| ५. | वादविवाद आणि आत्महत्या | ५० |
| ६. | बेकर व नाईल | ५४ |
| ७. | लिव्हिंग्स्टन आणि स्टॅन्ले | ७३ |
| ८ | संशोधकांचा सरदार–स्टॅन्ले | ८९ |
| ९ | १८७० मधील सुदान | ९८ |
| १०. | मध्य आफ्रिकेत गॉर्डन | ११६ |
| ११. | सुदानचा राज्यपाल गॉर्डन | १२८ |

प्रकरण पहिले

## नाईल नदीचे गूढ

नाईलचा उगम कोठे आहे यासंबंधी एकोणिसाव्या शतकातील लोकांच्या उत्सुकतेची कल्पना आज आपल्याला करता येणार नाही सध्या चंद्रमोहिमा-बद्दल लोकांना जशी उत्सुकता होती व त्यातील नाट्य लोक अनुभवत होते त्याच्याशीच गेल्या शतकातल्या नाईल नदीच्या शोधाच्या मोहिमांची तुलना करता येईल. नाईल नदी कोठे उगम पावते याविषयी मते व चर्चा दोन हजार वर्षांपासून युरोपमध्ये होत आली आहे शंभर वर्षांपूर्वी नाईल नदीच्या उगमाचा लागलेला शोध कोलंबसाने लावलेल्या अमेरिकेच्या शोधाइतका महत्त्वाचा आहे असे काहींना वाटते

या पुस्तकात लेखमालेत १८५६ पासून १८८० पर्यंत ज्या घडामोडी नाईलच्या परिसरात घडल्या त्याबाबत सविस्तर चर्चा केली आहे त्यापूर्वीचा इतिहास यात आलेला नाही इजिप्शियन लोकांना नाईल नदीचा प्रवाह खार्टूमपर्यंत प्राचीन काळापासून माहीत होता तेथेच निळी नाईल व श्वेत नाईल यांचा संगम होतो खार्टूमच्या दक्षिणेस काय आहे हे मात्र १०० वर्षांपूर्वीपर्यंत कोणालाच माहीत नव्हते

नाईल नदीचा उगम शोधणे इजिप्तच्या दृष्टीने फार महत्त्वाचे होते. इजिप्तमधून नाईल वजा केली तर तो सहारा वाळवंटाचा एक भाग ठरेल एकच वर्ष जरी नदी आटली असती किंवा पाणी कमी पडले असते तर इजिप्तचा संपूर्ण नाश झाला असता ह्या नदीला पाणी येते कोठून हे माहीत नसल्यामुळे इजिप्तमधील जनजीवनाला अस्थिरता येणे शक्य होते प्राचीन

इजिप्तमधील लोकांच्या अंधश्रद्धा व अज्ञान त्यामुळेच त्याना या अस्थिरतेची व धोक्याची जाणीव झाली नाही ।

परतु सर्व इतिहासामध्ये नाईल नदी कोरडी पडल्याचा किंवा आटल्याचा एकही उल्लेख सापडत नाही. नाईल नदीला दरवर्षी व्याधताऱ्याचा उदय झाल्यानतर इतक्या नियमितपणे पूर येत असे की त्यावरून इजिप्तमध्ये सौरकालगणनेची सुरुवात झाली. सध्या नाईलला सप्टेंबरमध्ये पूर येतो त्या काळात इजिप्तमध्ये तीव्र उन्हाळा असतो नाईल नदीचा शेवटचा हजार मैलाचा प्रवास पूर्ण वाळवटातून होतो आणि या वाळवटातून एकही उपनदी किंवा ओढा नाईलला मिळत नाही तरीही नाईलला पाण्याचा अखड पुरवठा होत राहतो तेव्हा हे प्रचड पाणी कोठून येत आहे हे शोधण्याची जिज्ञासा इजिप्शियनांना शेकडो वर्षे वाटली नाही हे आश्चर्य-कारकच आहे ।

इ. स. पूर्वी ४६० वर्षे हिरोडोटस नाईल नदीतून आस्वान धरणाच्या जागेपर्यंत गेला होता तेथूनच तो परतला. नाईल नदीच्या उगमाची नक्की माहिती नसल्याने नाईल नदी आफ्रिकेच्या अतर्भागातील अखड झऱ्यातून उगम पावते अशी लोकांची कल्पना होती. विज्ञानाचे युग सुरू झाल्यानतर युरोपला चीनची ओळख झाली अमेरिका व ऑस्ट्रेलिया ही खडे सापडली. व बहुतेक जगाचा नकाशा तयार झाला. तरीही १८५६ पर्यंत आफ्रिकेचा अतर्भाग आणि नाईल नदीचा उगम यासबधी काहीच माहिती नव्हती

निळ्या नाईलच्या उगमाचा शोध जेम्स ब्रूकने १७७० मध्येच लावला होता पण १८५६ पर्यंत शुभ्र नाईलच्या प्रवाहासबधी काहीच माहिती नव्हती अर्थात स्वैर कल्पनाशक्तीच्या लोकानी तारे तोडून या प्रदेशासबधी अफाट कल्पनाविलास केले होते. तेथे राक्षस राहतात ! शेपूट असलेली नर-भक्षक माणसे तेथे आहेत ! विचित्र प्राण्यांची तेथे वस्ती आहे तेथे समुद्र आहेत आणि इतकी उच पर्वतशिखरे आहेत की त्याच्या माथ्यावर नेहमी बर्फ असते वगैरे अनेक कल्पना लोकांच्या मनात घर करून होत्या

यातील काही कल्पनाना थोडाफार आधार होता डॉयजेनेस नावाचा एक ग्रीक व्यापारी इ स च्या पहिल्या शतकात नाईल नदीच्या उगमाशी

गेला होता, अशी आख्यायिका होती. तो हिन्दुस्थानातून परत येताना पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्यावर उतरला आणि २५ दिवसाच्या प्रवासानंतर त्याला दोन प्रचंड सरोवरे दिसली. जवळच खूप उंचीची बर्फमय शिखरेही होती. येथूनच नाईल नदीचा उगम होत असला पाहिजे असे त्याला वाटले

या आख्यायिकेवरूनच दुसऱ्या शतकातील टॉलेमीने आपला नकाशा बनवला असावा. त्या नकाशात त्याने नाईल नदी विषुववृत्तावरील दोन सरोवरातून उगम पावताना दाखविली होती या सरोवराना जवळच्याच प्रचंड उंचीच्या चंद्रपर्वतापासून पाणी मिळत असे

सतराशे वर्षेपर्यंत टॉलेमीचा हा नकाशा हीच त्या प्रदेशाची एकमेव माहिती होती १८४८ मध्ये जोहान रिबमान या पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्यावर राहणाऱ्या मिशनऱ्यांनी खळबळजनक माहिती आणली त्याने अंतर्भागात प्रवास केला आणि किलिमांजारो नावाचा पर्वत पाहिला. त्या पर्वताच्या माथ्यावर बर्फ होते असा त्याने दावा केला. लंडनमध्ये रॉयल जिऑग्रॉफिकल सोसायटीच्या एका सभासदाने रिबमानच्या या दाव्याची चेष्टा केली. रिबमानला पांढरा खडक उन्हात चमकताना दिसला, कारण विषुववृत्तावरील उन्हात बर्फ असणे शक्य नाही असे त्याचे म्हणणे होते परंतु आणखी एका वर्षाने जोहान लुडवीग क्रॉफ या मिशनऱ्याने माऊंट केनिया नावाचे दुसरे बर्फाच्छादित शिखर पूर्व आफ्रिकेच्या याच भागात पाहिल्याचे नमूद केले आणखी एक मिशनरी जे जे. एरहार्ड याने एक नकाशा तयार केला. त्यात त्याने आफ्रिकेच्या अंतर्भागात एक प्रचंड सरोवर दाखवले होते त्याला त्याने 'युनिवेसीचा समुद्र' असे नाव ठेवले होते. १८५० च्या सुमाराला आफ्रिकेच्या अंतर्भागातून झांझिबारला येणाऱ्या हस्तिदंताच्या आणि गुलामांच्या अरब व्यापाऱ्यांनी माहिती दिली की अंतर्भागात दोन प्रचंड सरोवरे आहेत एक 'उजिजी' या नावाचे आहे आणि दुसरे 'न्यान्झा' या नावाचे आहे

या सर्व बातम्या आणि गप्पा गोंधळ उडविणाऱ्या होत्या. ही सर्व सरोवरे खरेच अस्तित्वात आहेत काय ? किलिमांजारो आणि केनिया म्हणजेच टॉलेमीने उल्लेख केलेले चंद्रपर्वत आहेत की काय ? आणि या सरोवरातून

नाईल नदी खरेच उगम पावते की काय ? असे अनेक प्रश्न उपस्थित झाले होते.

या सर्व प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी रिचर्ड फ्रॅन्सिस बर्टन आणि जॉन हॅनिंग स्पेक १८५६ मध्ये आफ्रिकेकडे निघाले इजिप्तमधून नाईल नदीच्या काठाने जायच्याऐवजी त्यानी पूर्व किनाऱ्यावरील झांझिबार बेटा-पासून आफ्रिकेच्या अज्ञात अतर्भागात घुसायचे ठरविले या प्रदेशात यापूर्वी कोणत्याही युरोपियन माणसाने प्रवेश केला नव्हता. या मोहिमेबरोबरच मध्य आफ्रिकेच्या सशोधनाचा कालखड सुरू होतो

बर्टन आणि स्पेक यांनी झांझिबारपासून आपल्या मोहिमेला सुरुवात केली हे झांझिबार बेट अजूनही मध्ययुगीन सरदाराच्या आणि राजांच्या युगातच वावरत होते ..

★

प्रकरण दुसरे

# १८५६ चे झांझिबार

आज झाझिबारचे महत्व फारसे राहिले नाही पण रिचर्ड बर्टन आणि स्पेक हे प्रथम झाझिबारला १८५६ मध्ये गेले तेव्हा ते फार महत्वाचे ठिकाण होते सर्व पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्यावरचे एकमेव व्यापार-केंद्र होते ते ! बेटावरून समोर दिसणाऱ्या आफ्रिकेच्या किनाऱ्यावर आपले साम्राज्य स्थापण्याचे पोर्तुगीजाचे प्रयत्न केव्हाच विफल झाले होते ज्याला आज आपण टांगानिका, केनिया, युगांडा, दक्षिण सुदान आणि कांगो म्हणतो तो सर्व प्रदेश अज्ञात होता त्याचे नकाशेही तयार व्हायचे होते जमिनीच्या या अफाट विस्तारात काय आश्चर्य भरले आहे ते गूढच होते !

झांझिबारचे सुलतान या विस्तीर्ण प्रदेशावर आपला हक्क सांगत खरा, पण वास्तवात त्याची सत्ता फक्त किनाऱ्यावरच होती आणि तीही विशेष परिणामकारक नव्हती पावसाळा सोडून इतर दिवसांत गुलाम आणि हस्तिदंत आणण्यासाठी अरबांच्या टोळ्या या अज्ञात प्रदेशात शिरत असत, आणि एक वर्षभर आत गडप होत असत. आणि कधीकधी कायमच्याच गडप होत असत ! आज चंद्राच्या पृष्ठभागासंबंधी जितकी माहिती आपल्याला आहे तितकीसुद्धा माहिती त्यावेळी मध्य आफ्रिकेबद्दल नव्हती.

झाझिबारचे बेट मात्र सर्व जगात प्रसिद्ध होते हिंदी महासागरात फिरणाऱ्या आगबोटींना हे बंदर चांगले उपयोगी पडे अशाच एका ब्रिटिश आगबोटीत बसून रिचर्ड बर्टन आणि स्पेक मुंबईहून येऊन १९ डिसेंबर १८५६ रोजी झाझिबारला उतरले.

त्याना या बेटाचे पहिले दर्शन कसे घडले याची आजही कल्पना करता येईल. लवगा आणि इतर मसाले याचा वास वाऱ्याच्या झुळकीबरोबर येऊन प्रवाशांचे स्वागत करीत असे. पाढऱ्या शुभ्र प्रवाळाचा किनारा अगाध पसरलेल्या निळ्या समुद्राच्या लाटांनी धुऊन निघत असे. किनार-रेषेबरोबरच घनदाट हिरवेगार जगल सुरू होत असे वर्षातील सर्व दिवस हवामान दमटच असे सुलतानाचा राजवाडा लांबून कोणालाही सहज ओळखता येई त्याच्या आसपास परदेशी वकिलांची आणि व्यापाऱ्यांची घरे असत आणि या सर्वांच्या पलीकडे मशिदींचे उच मिनार चमकत असत अशाच एका बगल्यात आता बर्टन आणि स्पेक बेटावरचा ब्रिटिश एजट अॅटकिन्स हॅमरटनला थोड्याच वेळात भेटणार होते

धक्क्यावर गलबताची फारच गर्दी झाली होती बर्टनने तेथे नागरलेली शिडांची साठ गलबते मोडली आजही अशी शिडांची गलबते झांझिबारमध्ये पाहायला सापडतील याशिवाय तेथे अमेरिका, फ्रान्स व युरोपमधील जहाजे नागरलेली होती ही सर्व जहाजे तेथे नारळ, हस्तिदन, कातडी, कासवाच्या पाठी, मिरी, मधमाशाचे मेण, गेंड्याचे शिग, कवड्या आणि बाजारात येणारा इतर माल नेण्यासाठी आली होती किनाऱ्यावर सगळीकडे घाण पडली होती आणि त्यातच एखादा मेलेला प्राणी पडलेला असे. बर्टन लिहितो– 'मध्येच एखादा शार्क मासा समुद्राच्या तळातून वर येत असे आणि थड नजरेने कोळ्याच्याकडे पाहत असे. त्याच्या त्या नजरेनेच कोळ्यांचे रक्त गोठून जात असे !'

परतु किनाऱ्यावर उतरल्यानतर त्याना आणखी भयानक गोष्टी दिसणार होत्या ! झांझिबार बेटाची लोकसख्या त्यावेळी एक लाख होती सर्व लोक शहरातच राहत होते आणि शहरातील रस्ते म्हणजे वीस फुटी बोळ होते माणसे, गुरे आणि गाढवे यांची एकच गर्दी रस्त्यात असे. दुकानदार लहानशा खिडक्यांत बसून आपल्या मालाची जाहिरात ओरडून करत येणाऱ्या-जाणाऱ्यांपुढे भिकारी हात पसरत, आणि सगळीकडे कुजलेल्या माशाचा घाण वास हवेत भरलेला असे. बाजारात भाज्याचे आणि फळाचे ढीग विक्रीसाठी लागले होते. त्यावेळच्या इतर शहराप्रमाणेच हे सर्व दृश्य

होते. पण एक मोठा फरक होता. आणि हा फरक फारच महत्त्वाचा होता. १८५६ मध्येही झांझिबारमध्ये गुलामांचा बाजार होता ! गुलाम झालेले स्त्री, पुरुष आणि मुले शहरात सर्वत्र दिसत आफ्रिकन भूमीवरून नुकतेच पकडून आणलेले आणि भूक आणि क्रूर वागणूक यामुळे खुळे आणि अर्धमृत नवे गुलाम निराळे ओळखता येत असत ते भांबावलेले दिसत त्यांच्या नग्न शरीरावर मारल्याच्या खुणा असत. ते मनुष्यप्राणी वाटण्याऐवजी पिंजऱ्यात कोंडलेल्या श्वापदाप्रमाणे दिसत असत याचे उत्तम वर्णन ब्रिटिश संशोधक थॉमस स्मे यानी केले आहे इ. स. १८११ मध्ये त्यानी झांझिबारला भेट दिली होती

थॉमस स्मे लिहितो, ' हा सर्व तमाशा रोज दुपारी चारला सुरू होई गुलामाना आंघोळ घालून त्यांच्या अंगावर खोबरेल चोपडण्यात येत असे. आणि त्यांच्या तोंडावर पांढरे आणि तांबडे पट्टे रंगविण्यात येत. त्यांच्या हातांत आणि पायांत चांदीचे आणि सोन्याचे दागिने घालत. आणि त्यांना एका ओळीत बाजारात उभे करत. सर्वांत पुढे लहान वयाची व तरुण मुले-मुली व त्यांच्यामागे वयस्कर आणि शरीराने मोठे गुलाम उभे करत. या गुलामांची वये ६ ते ६० वर्षांपर्यंत असत स्त्री आणि पुरुष एकत्रच मिसळलेले असत रांगेच्या पुढे मालक उभा राहत असे. आणि रांगेच्या शेवटी दोन-तीन रक्षक तलवारी व भाले सज्ज करून उभे असत

मग ही मिरवणूक चालू लागे आणि बाजारपेठेतून फिरून येत असे पुढे चालणारा मालक कधी कधी गुलामाचे गुण आणि त्यांना देऊ केलेल्या रकमा याबद्दलचे एखादे गाणेही म्हणत असे !

जाता जाता एखाद्या गिऱ्हाईकाचे जर लक्ष गेले तर गुलामांची ही माळ थांबत असे आणि गुरांच्या बाजारात करतात तशी मालाची परीक्षा सुरू होत असे गिऱ्हाईक तो गुलाम मुका आणि बहिरा नाही आणि त्याला रोग नाही याची खात्री करून घेत असे. तो झोपेत घोरत नाही ना याची चौकशी करी. कारण घोरणे हा मोठाच दोष होता ! त्यानतर गुलामांची शारीरिक तपासणी करत. त्यांचे दात तपासत आणि मग शरीराचा प्रत्येक भाग तपासत त्या गुलामाला नंतर थोडे चालायला आणि पळायला लावत

म्हणजे त्याच्या चालण्यात दोष असेल तर तो समजत असे घासाघीस होऊन किंमत ठरली की गुलामाच्या अंगावरचे दागिने काढून घेत आणि त्याला नवीन मालकाच्या स्वाधीन करत. अशा तऱ्हेचे वीस ते तीस गुलामाचे जथ्थे दररोज विक्रीला येत असत. आणि प्रत्येक जथ्थ्यात तीस ते चाळीस गुलाम असत. या गुलामांच्या रांगेत नवजात अर्भके छातीशी धरून येणाऱ्या बाळंतिणी असत, आणि चालताही न येणारे म्हातारे असत। गुलामाच्या चेहऱ्यावर कायम वैताग आणि उदासीनपणा असे काही गुलामाच्या टोळ्या खायला न मिळाल्यामुळे नुसत्या हाडाच्या सांगाड्यासारखे दिसत। हा सर्व देखावा पाहून सुजाण माणसाच्या मनात गुलामांच्याबद्दल दया आणि त्यांच्या मालकाबद्दल संताप उत्पन्न झाला नाही तरच नवल। ...'

कॅप्टन स्पेने हे वर्णन केले त्याला १८५६ मध्ये पंचेचाळीस वर्षे झाली होती ब्रिटिश साम्राज्यात १८३० साली गुलामगिरी बंद झाली होती आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरचा गुलामाचा व्यापार थांबत आला होता १८४५ मध्ये झांझिबारच्या सुलतानाने गुलाम बाहेर पाठविण्यावर बंदी घातली होती पण त्यामुळे काहीच फरक पडला नव्हता। अरब व्यापारी पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्यावर गुलामाचा व्यापार २००० वर्षांपासून करत आले होते हा व्यापार सोडून देणे त्यांच्या स्वप्नातही आले नव्हते आज ज्याप्रमाणे घोड्यांचा आणि गुराचा व्यापार करणाऱ्याला त्यात काही अनैतिक आहे असे वाटत नाही, त्याप्रमाणे त्यावेळच्या अरब व्यापाऱ्यांना गुलामाचा व्यापार अनैतिक वाटत नव्हता।

अरबांचे काफिले अजूनही आफ्रिकेच्या अंतर्भागात गुलाम पकडण्यासाठी छापे घालीत होते आणि गलबते भरभरून झांझिबारच्या गुलामांच्या बाजारात पाठवत होते गुलामाच्या किंमती मागणी पुरवठ्याप्रमाणे बदलत असत पण १८५६ मध्ये पुरुष गुलामाला ६० ते ८० रुपये व स्त्री गुलामाला त्यापेक्षा जास्त किंमत येत असे. झांझिबारच्या बाजारात दरवर्षी वीस ते चाळीस हजार गुलाम विक्रीसाठी येत असत आणि त्यातले ३/४ गुलाम अरबस्तान, तुर्कस्थान, इजिप्त या देशांना निर्यात केले जात. अशी निर्यात



**गुलामपकडे अरब व त्यांनी पकडलेले गुलाम**

बेकायदा होती तरी त्या कायद्याची दखल कोणी घेत नसे छापा घालून गुलामांना पकडून झांझिबारला आणेपर्यंत वाईट वागणुकीमुळे अनेक गुलाम मरत परंतु झांझिबारला पोहोचलेल्या गुलामांपैकीसुद्धा ३० टक्के गुलाम अन्न न मिळाल्यामुळे व रोगराईमुळे मरत असत. हा सर्व नाश होत असल्या-मुळे अरब व्यापारी जास्तीत जास्त गुलाम गलबतात ठेचून भरत असत चार जहाजांपैकी एकाच जहाजातले गुलाम जरी विकता आले तरी फायदा होत असे. बर्टन लिहितो, 'गलबतामध्ये पूर्वी जेथे दोन मजले असत तित-क्याच जागेत पाच माळे बांधण्यात येऊ लागले आणि त्यात गुलाम भरण्यात येऊ लागले. एका गुलामाला दररोज एक पिंट पाणी जेवताना देत असत '

गुलामाचा पुरवठा चालू ठेवण्यासाठी भयंकर कृत्ये होत असत झांझिबार बंदरामध्ये स्थानिक लोकांना दारू किंवा एखाद्या मुलीचे आकर्षण दाखवून

गलबतावर बोलावून घेत आणि त्यांना जहाजामध्ये दडपत असत ज्या गुलाम मुलाची किंमत झांझिबारमध्ये १५–२० रुपये असे त्यालाच तुर्कस्थानात आणि अरबस्थानात दोनशे रुपये मिळत पकडलेल्या गुलामांना जंगलात लपवून ठेवत आणि गलबते तयार झाली की रात्री गलबतात बसवीत असत

१८११ पासून १८५६ पर्यंत झांझिबारमधील परिस्थिती काहीच बदलली नव्हती हे बर्टनच्या वर्णनावरून समजते बर्टन लिहितो, निग्रो गुलामाची ओळ जनावराप्रमाणे बाजारात आणत असत, आणि त्याचे भाव दलाल ओरडून सांगत असे. मनुष्यत्वाशी काहीच लक्षणे त्या गुलामाच्या चेहऱ्यावर दिसून येत नसत सर्वच गुलाम फार अशक्त दिसत आणि त्याच्या छातीच्या फासळ्या मोजून घेता येत असत. त्यातील अनेक आजारी गुलाम उभे न राहता आल्यामुळे जमिनीवर उकिडवे बसत असत या गुलामात लहान मुले-मुलीही असत त्याना काहीच समजत नसल्यामुळ या बाजाराची गमतच वाटत असे ! गुलामातल्या स्त्रिया होत्या त्या सर्व दिसायला कशातरीच आणि केविलवाण्या होत्या. त्या सर्व गुलाम स्त्रियात एकच थोडेबहुत सौंदर्य असलेली मुलगी होती. काहीतरी अक्षम्य अपराध केल्यामुळेच तिला विकायला आणले असावे एखाद्या घरात काम केलेले जुने गुलाम फारसे कुणी विकत घेत नसत कारण काहीतरी विशेष दोष असल्याशिवाय आपल्या घरातील गुलाम मालक विकत नसत गुलामाचे व्यापारी आमच्याकडे बघून हसले आणि आपण एक वाईट काम करत आहोत हे त्यांच्या गावीही नव्हते ! आफ्रिकेच्या अंतर्भागातून आणलेले रानटी गुलाम मात्र अनेकदा हैदोस घालत असत. भुकेलेल्या कुत्र्यांच्या थव्याप्रमाणे ते अन्नासाठी सर्व रस्त्यात फिरत आणि लुटालूट करीत शहरामध्ये हत्यार घेतल्याशिवाय कोणीही घराबाहेर पडत नसत आणि रात्र पडली की सर्व दरवाजे अडसर लावून बंद केले जात '

झांझिबारमध्येच जन्मलेले गुलाम मात्र त्या मानाने जरा सुसंस्कृत असत ते आळशी, गलिच्छ आणि अप्रामाणिक होते– परंतु झांझिबारमधून अरबांना गुलामांशिवाय निभावणे कठीण वाटत असे. अशा घरातील गुलामांना

फारशी वाईट वागणूक मिळत नसे. जर एखाद्या स्त्री गुलामाला मालका-पासून अपत्य झाले तर ते मूल गुलाम न राहता घरातील इतर मुलाबरो-बरच वाढविले जाई तरीही दारू पिणे आणि बारक्या चोऱ्या करणे यात गुलामाना विशेष काही वाटत नसे गुलाम आणि मालक यांच्यामध्ये अविश्वास आणि तिरस्कार मात्र खूपच होता

त्यावेळी झांझिबारमध्ये पाच हजार अरब होते त्यांपैकी काहींच्या जवळ दोन हजारपर्यंत गुलाम होते त्यांच्या लवगाच्या आणि नारळाच्या बागा असत त्यांची घरे तीन मजली असत, व लाकडी दारावर कोरीवकाम केलेले असे त्याच्या जरतारी झग्यासाठी आणि पागोटयासाठी नक्षीकाम केलेली कपाटे असत या अरबानी हस्तीदताचा व्यापार आपल्या हाती ठेवला होता त्यांच्याकडे स्वत:ची गलबते असत आणि गुलाम पकडायला जाणाऱ्या टोळयाना ते जबर व्याजाने पैसे पुरवीत तरीही येथील जीवन अगदी सथ, एकसुरी आणि कटाळवाणे होते कित्येक महिन्यात काहीच घडत नसे आणि सर्व दिवस सारखेच असत[1] अरब पहाटे उठे आणि सकाळची प्रार्थना उरकून आणि थोडासा फराळ करून बाजारात जात असे ११ वाजता तो घरी परत येई आणि मग जेवण, प्रार्थना व झोप उरकून तीन वाजता उठे नतर पुन्हा बाजाराला भेट, सध्याकाळी तो जनान-खान्यात मुक्कामास जाई दरवर्षी येणाऱ्या रमझानखेरीज त्याच्या या दैनिक कार्यक्रमांत काही बदल होत नसे.

बर्टनला अरब आवडत असत तो आफ्रिकेतील निग्रोंना मात्र तुच्छ लेखी निग्रो आणि सेमाईट याच्या मिश्रणाने तयार झालल्या स्वाहिली लोकां-बद्दल त्याचे मत चांगले नव्हते या स्वाहिली लोकांत रानटीपणा जास्त आहे आणि ते अप्रामाणिक आहेत असे त्याचे मत होते

१८५० ते ६० या दशकांत समुद्रावरून होणारा झांझिबारचा व्यापार अमेरिकेच्या हातात होता त्यानतर क्रमाने ब्रिटिश, जर्मन आणि फ्रेंच यांचे व्यापारावर वर्चस्व होते हे व्यापारी हस्तिदत घेत आणि त्याच्या बदल्यात कापड देत असत. पूर्व आफ्रिकेत हे अमेरिकन कापड वस्तू देण्याघेण्यासाठी चलनासारखे वापरले जाई त्याशिवाय रगीत मणी, बदुका व दारूगोळा

यांचाही वापर वस्तुविनिमयासाठी होत असे बर्टनच्या म्हणण्याप्रमाने झांझिबारमध्ये राहणारे गोरे लोक फारच बेकार जीवन कठत होते त्याची आपसात नेहमी भाडणे लागलेली असत सामाजिक जीवन तेथे नव्हतेच ! दमट हवेमुळे खेळही खेळता येत नसत प्रत्येक व्यापारी लवकर डबोले गोळा करून मायदेशी कसे पळता येईल या विचारात असे. आणि प्रत्येक प्रतिनिधी आपली बदली करावी म्हणन वरिष्ठाची विनवणी करीत असे बेटावरील पिण्याचे पाणी दूषित झालेले असे कॉलरा आणि मलेरिया यांची केव्हा साथ येईल यांचा नेम नव्हता

सत्ता आणि पैसा याची जबरदस्त ओढ असल्याशिवाय कोणीही झांझिबारला राहायला तयार झाला नसता तेथील ब्रिटिश प्रतिनिधी हॅमरटन सर्वांना पुरून जिवत उरला होता त्याचाही बळी लवकरच पडणार होता. बर्टन आणि स्पेक झांझिबारला आले तेव्हा हॅमरटनची बेटावर पधरा वर्षे गेली होती. झांझिबारचे राजकीय व सामाजिक वर्तुळ हॅमरटनभोवतीच केंद्रित झाले होते त्याचे समकालीन त्याचेविरुद्ध काहीच बोलत नाहीत क्षुद्र भाडणाच्या आणि मत्सरांच्या जगात हे विशेषच आहे ! झांझिबारचा सुलतान सय्यद सैद याचा तो निकटचा मित्र व सल्लागार होता हॅमरटनने ब्रिटिश वकिलात त्यामुळे चागलीच नावारूपाला आली होती बेटाला भेट देणारे सर्वच यरोपियन लोक हॅमरटनच्या आतिथ्यशीलतेची आणि उमद्या स्वभावाची प्रशसा करीत



झांझीबारचा सुलतान सय्यद सैद

आपल्याला परत बोलवावे म्हणून हॅमरटनने अनेकदा विनती केली मलेरिया व इतर रोग यामुळे त्याची प्रकृती बिघडली होती परतु तो कर्तव्यभावनेने तेथे राहिला होता नियतीने त्याची सागड झांझिबार

बेटाशीच घातली होती सुलतान सय्यद सैद १८५५ मध्येच मृत्यू पावला होता तरीही हॅमरटन प्रतिनिधी होताच ! त्याला उन्हाळा अगदी सहन होत नसे. तरीही त्याने बर्टन आणि स्पेक यांना आपल्या घरी राहायला बोलाविले, आणि त्याच्या सफरीची तयारी करून देण्यामध्ये उत्साहाने भाग घेतला

पुष्कळच तयारी करायची होती. आफ्रिकेतील अतर्भागात जाऊन परत यायला वर्ष किंवा दोन वर्षे सहज लागत आणि त्या हिशेबाने सर्व सामुग्री न्यावी लागे सर्व सामान हमालाच्या डोक्यावरून न्यावे लागे १०० हमाल आणि शस्त्रसज्ज रक्षक यांचा जथ्था मामुली समजला जाई बर्टनने १७० लोकांची टोळी नेण्याचा विचार केला होता हे सर्व हमाल झांझिबारमध्ये आणि पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्यावर भरती करण्यात येणार होते या सर्व हमालावर मुकादम म्हणून सैद बिन सालेम याला नेमले होते याशिवाय दोन बदुक-धारी रक्षकही होते भारतातून आलेले सिद्दी बॉम्बे आणि माबुर्की या नावाचे हे रक्षक पूर्व आफ्रिकेच्या सशोधनांत पुढे फार प्रसिद्धीला आले. बर्टन आणि स्पेक याचा स्वैपाक करण्यासाठी गोव्यातील दोन आचारी होते. सुलता-नाच्या नोकरीतील सशस्त्र गुलाम व शिपाई मिळून बारा शिपायाचे एक पथक होते

सर्व जथ्थ्याच्या रोजच्या अन्नासाठी शिकार आणि टोळीवाल्याकडून खरेदी करावयाचे धान्य, दूध आणि बोकड यावर अवलंबून राहावे लागणार होते बाकीचे सर्व सामान झांझिबारमधील अरब व्यापाऱ्याकडून विकत घ्यावयाचे होते. या सर्व सामानात तीन रायफली, दोन बदुका, तीन पिस्तुले, तीन तलवारी, दोन वर्षे पुरेल इतका दारूगोळा, घड्याळे, होकायंत्रे, तप-मापक, दुर्बिण, सूर्यघड्याळ, अतरे मोजण्यासाठी पेसोमीटर वगैरे साधने होती

मुक्काम करण्यासाठी एक तबू, घडीच्या खाटा, घडीचे टेबल व खुर्च्या, ब्लँकेटस्, मच्छरदाण्या, स्वयपाकाची भाडी, काटे-चमचे वगैरे सामान होते मोहीम लवकर संपेल या अपेक्षेने त्याने कपडे मात्र जास्त घेतले नव्हते. दमट हवेमुळे त्यांचे कपडे लवकर फाटले व शेवटी अवस्था कठीण झाली

याशिवाय त्याच्याबरोबर लहानसा शास्त्रीय पुस्तकाचा संग्रह, आकाशातील तारकांचा नकाशा, सुतारकामाची आणि लोहारकामाची हत्यारे होती कारण त्यांना बरोबर घेतलेल्या सुट्या भागातून तलावात चालण्याजोगी बोट बनवायची होती औषधाच्या पेटीत मार्फिया आणि क्विनाइन यांचाही समावेश होता मोहिमेचे यश, संशोधक मलेरियाचा प्रतिकार कितपत करतात यावरच अवलंबून असे मलेरियाची कारणे तोपर्यंत सापडली नव्हती आणि त्यावर क्विनाइन हे एकच औषध माहीत होते.

शिवाय किरकोळ सामानात चार छत्र्या, मासे पकडण्याचे हुक, दोन कंदील, औषधाच्या दोन पेट्या, युनियन जॅक, कापडाचे मोठेमोठे गठ्ठे आणि मणी होते कापड आणि मणी हे तेथील चलने होती. ते टोळीवाल्यांना देऊनच जरुरीच्या वस्तू मिळवाव्या लागत

याशिवाय या मोहिमेत दोन संशोधकांचे व्यक्तिमत्त्व सर्वांत जास्त महत्त्वाचे होते त्याचा परिणाम सर्वच गोष्टींवर होत असे.

रिचर्ड बर्टनचे व्यक्तिमत्त्व विशेषच होते त्याचा स्वभाव कोणत्या नियमात बसणारा नव्हता । तो रगेल तर होताच, परंतु ज्ञानाबद्दल परा-कोटीची भूक व उत्सुकता त्याच्याजवळ होती. त्याला साहसाचे फार आकर्षण होते उंटाच्या गळ्यातील घंटा जणू त्याला साद घालत असे. त्याला अरबांच्याबद्दल फार प्रेम होते तो त्यांच्यातलाच झाला होता त्याच्या आयुष्यभर त्याला पूर्वेचे सतत आकर्षण राहिले आणि दरवर्षी स्थलांतर करणाऱ्या पक्ष्याप्रमाणे तो सतत मध्यपूर्वेकडे जात राहिला तरीही तो नेहमी अस्वस्थच असे त्याला साहस आणि धोका यांचे जणू वेड होते त्याची नजर भेदक होती स्वाईनबर्न लिहितो, ‘ बर्टनच्या डोळ्याकडे पाहून अवर्ण-नीय भयाची शिरशिरी अंगावर भरत असे ती नजर या जगातील नव्हतीच । त्याच्या भुवया देवासारख्या आणि जबडा सैतानासारखा भासत असे ।

बर्टनचे बाह्यदर्शन असे कठोर असले तरी तो चोखंदळ संशोधक होता आपल्या मोहिमेचे निरीक्षण त्याने जितक्या बारकाईने केले तितके दुसरे कोणीही केले नाही त्याच्या निरीक्षणातून काहीही सुटत नसे त्याची भाषा साहित्यिकाची व कमावलेली होती शिवाय त्याच्या भाषेला उपहासपूर्ण

विनोदाचा स्पर्श झालेला होता 'लेक रिजन्स ऑफ सट्रल आफ्रिका' हे बर्टनच्या पुस्तकातील सर्वोत्तम पुस्तक आहे ! आणि आफ्रिकेतील संशोधकांनी जी पुस्तके लिहिली त्यातही हेच सर्वोत्तम आहे. यावेळी तो ३६ वर्षांचा होता पुढच्या आयुष्यात त्याने अनेक उलाढाली केल्या, भाडणे केली आणि साहसी प्रवासही केला शेवटी तो अरेबियन नाईटस्‌मुळे जास्त प्रसिद्ध झाला. पण त्या सर्वांचा या मोहिमेशी फारसा संबध नव्हता.

छत्तिसाव्या वर्षांपर्यंतही त्याने बरीच प्रसिद्धी मिळविली होती शिक्षण संपल्यावर त्याने सैन्यात प्रवेश केला आणि लष्करी सेवेत भारतात सात वर्षे काढली अरबाचा वेष घेऊन तो मक्केलाही जाऊन आला. अबिसेनियातील निर्जन शहर हरार यालाही त्याने भेट दिली होती.

हिंदुस्थानात असताना तो नेहमीचे सैनिकी जीवन कधीच जगला नाही. तो तेथील लोकासारखेच कपडे घालायचा आणि लोकात मिसळून खेडेगावच्या बाजारातही जायचा ! त्यामुळे तो बरोबरीच्या ब्रिटिश अधिकाऱ्यात अप्रिय झाला होता परतु त्यामुळेच भारतीय जीवन व त्याची राहणी याचा त्याला चागला परिचय झाला. सेनेमधील हिन्दुस्थानी सैनिकांत असतोष असून लवकरच असतोषाचा वणवा पेटणार आहे असे भाकित त्याने १८५४ मध्येच केले होते ते तंतोतत खरे ठरले ! तो आपल्या बरोबरीच्या सैनिक अधिकाऱ्याना तुच्छ मानत असे. शिस्त पाळणे त्याला फारसे आवडत नसे त्याच्या चक्रमपणामुळे त्याला सैन्यातून केव्हाच डच्चू मिळाला असता पण शौर्यात आणि धैर्यात त्याला तोड नव्हती त्याला अनेक भाषा समजत. त्याने अशी एक पद्धत शोधली होती की त्यामुळे त्याला कोणतीही भाषा दोन महिन्यात शिकता येई आयुष्याच्या शेवटी त्याला २९ भाषा बोलता व लिहिता येत होत्या एकदा त्याने तीस माकडे पाळली होती आणि त्याच्यातच रात्रदिवस राहून त्यांच्या आवाजावरून माकडांच्या बोलीभाषेचा आराखडाही तयार केला होता

एकाच माणसामध्ये इतक्या विविध गोष्टी एकवटल्याची उदाहरणे क्वचितच असतात. साहसाची बर्टनच्या रक्ताला चटकच लागली होती. त्याच्या मनात साहसाची ओढ आणि बौद्धिक करामत याचा जणू झगडा

लागलेला असे त्याला कधी कधी या सर्व मोहीमा वगैरे सोडून शांत आयुष्य जगण्याची लहर येई अशा एका लहरीतच त्याने इंग्लंडमध्ये इसाबेला अरुण्डेलशी विवाह ठरवून वाङ्निश्चय केला. आणि लगेचच तिला सोडून तो या मध्य आफ्रिकेच्या मोहिमेवर निघाला। अशा या हुशार, साहसी आणि लहरी संशोधकाने जॉन स्पेकसारख्या अगदी विरुद्ध स्वभावाच्या माणसाला सहकारी म्हणून निवडावे हे आश्चर्य होय।

स्पेकचा स्वभाव बर्टनच्या अगदी विरुद्ध होता बर्टनला निष्ठावंत अनुयायी हवा होता पण स्पेक प्रतिस्पर्धी ठरला स्पेक ३० वर्षांचा होता. तो उंच, सडपातळ आणि निळ्या डोळ्याचा होता तो स्वतःची काळजी घेई व धूम्रपान व मद्यपान करीत नसे. तो मोकळ्या हवेत वाढला होता आणि कामासाठी राबायची त्याला सवय होती. सवय असावी म्हणून तो बूट काढून अनवाणी पायाने या मोहिमेत चालून पाहत असे तो आपले उद्दिष्ट ठरवत असे आणि ते गाठण्यासाठी नेटाने काम करत असे मैत्री करायला तो लायक होता त्याच्या वागणुकीत वडेजाव अजिबात नव्हता तरीही तो स्वाभिमान सोडून लाचार झाला आहे असे कधीही वाटत नव्हते.

स्पेकही सैन्यात दाखल होऊन हिंदुस्थानात आला होता आणि पंजाबा-तील लढायांत त्याने भाग घेतला होता त्याला शिकारीची फार हौस होती त्याला सुटी मिळाली की तो हिमालयात शिकारीसाठी जाई तेथे त्याने अनेक शिकारीच्या मोहिमा केल्या.

बर्टन भेटण्यापूर्वी हिंदुस्थानात असतानाच आफ्रिकेच्या अंतर्भागात मोहीम काढण्याचे त्याने ठरविले होते. मोठी रजा मिळाली की मध्य आफ्रिकेत शिरून तो नाईलच्या काठाने इजिप्तमध्ये उतरणार होता. आणि प्रवासात दुर्मिळ पशुपक्ष्यांचे नमुने जमवून त्यांचे संग्रहालय काढायचा त्याचा विचार होता. नोकरीमध्ये त्याने पैसे साठविले होते आणि ३९० पौंड घेऊन मोहिमेच्या तयारीसाठी तो एडनला १९५४ साली आला होता या ठिका-णीच त्याची आणि बर्टनची प्रथम गाठ पडली

बर्टन एडनला आपल्या अबेसेनियन मोहिमेवर जाण्यासाठी आला होता

ते पाहून स्पेकने आपला बेत बदलला. आणि तो बर्टनच्या मोहिमेत सामील झाला.

अबिसिनियातील मोहिम ही त्याची आफ्रिकेतील पहिली मोहीम होती बर्टनला हवे असलेले सर्व थ्रील आणि संकटे या पहिल्याच मोहिमेत त्याना अनुभवायला मिळाली ! मुसलमानाच्या ताब्यात असलेल्या हरार शहरातून ते निघाले आणि सोमालीलॅंडच्या किनाऱ्यावरून जाऊ लागले स्पेकच्या दृष्टीने ही मोहीम अपयशी ठरली त्याचा जथ्था बेरबेरा जवळ एप्रिल १८५४ मध्ये पोहोचला तेव्हा त्याच्या छावणीवर स्थानिक सोमाली टोळीवाल्यानी मध्यरात्री छापा घातला. त्या भयानक लढाईत एक इंग्लिश संशोधक ठार झाला बर्टनच्या जबड्याला जखम झाली. स्पेकला अनेक ठिकाणी भोसकले आणि कैद करून टोळीवाले घेऊन गेले. त्याला टोळीवाल्यानी ठारच केले असते परंतु तो कसातरी निसटला आणि बर्टनला येऊन मिळाला मोहीम अर्धवटच संपली. आणि सर्वजण एकाच जहाजातून एडनला पळून आले. नतर बर्टन आणि स्पेक इंग्लंडला परतले

बर्टन आणि स्पेक यांचे स्वभाव विरुद्ध असूनही १८५५ मध्ये त्याचे वितुष्ट आलेले नव्हते दोघानीही क्रिमियातील युद्धात भाग घेतला होता आणि तेथून परतल्यावर स्पेकला हवी असलेली मध्य आफ्रिकेतील प्रवासाची योजना बर्टनने बनविली होती. बर्टनने मोहिमेत सामील होण्याबद्दल स्पेकला निमंत्रण दिले. आणि ते त्याने आनदाने स्वीकारले.

आणि आता १८५६ साल संपत आले असताना ते दोघेही झांझिबारला येऊन पोहोचले होते आणि आफ्रिकेच्या अज्ञात भूमीत मोहीम नेण्यासाठी हॅमरटनच्या मदतीने सामान जमवीत होते परराष्ट्र खात्याकडून आणि रॉयल जिऑग्रॉफिकल सोसाएटीकडून बर्टनला हजार पौंडाचे अनुदान मिळाले होते म्हणून बर्टनच मोहिमेचा पुढारी होता मोहीमेबद्दल त्याला आत्मविश्वास होता

त्यांनी मोहिमेवर निघण्याची घाई अजिबात केली नाही हॅमरटनबरोबर आणि तरुण सुलतान मजिदबरोबर चर्चा करण्यांत त्याने अनेक दिवस

चालवले आजच्या जेटयुगात आणि अवकाशयुगात आपल्याला या सथपणाचे आश्चर्य वाटते पण त्याकाळी म्हणजे एकोणिसाव्या शतकात सर्वच कामे धीरे–धीरे आणि सावकाशीनेच होत असत। सामान आणि माणसे गोळा करून मोहिमेची सवय व्हावी म्हणून त्यांनी आफ्रिकन किनाऱ्याची एक सहल काढली. यात त्याचे दोन महिने गेले. मोंबासा येथील पोर्तुगीजांचे आणि अरबांचे उध्वस्त अवशेष त्यांनी पाहिले. आफ्रिकेच्या वातावरणाचा आणि हवेचा थोडासा परिचय त्यांना झाला.

मोंबासाजवळ जोहान् रेबमन् हा ख्रिस्ती मिशनरी राहात होता. आफ्रिकेच्या किनाऱ्यावर राहणारा हा एकमेव गोरा होता त्याने मोहिमेत सामील व्हावे म्हणून बर्टनने प्रयत्न केले पण बर्टनने सुलतानाला आश्वासन दिले होते की मोहिमेमध्ये मी लोकांना ख्रिश्चन करणार नाही. म्हणून रेबमन्‌ने मोहिमेत यायला नकार दिला किनाऱ्यावरच्या प्राथमिक मोहिमेत बर्टनला मलेरियाने गाठले झांझिबारला परत येऊन त्याला अनेक आठवडे विश्रांती घ्यावी लागली त्याला वाटले की मलेरिया झाल्यामुळे प्रतिकार-शक्ती निर्माण होऊन पुढे त्रास देणार नाही. पण हा समज चुकीचा आहे हे त्याला नंतर कळणार होते.

शेवटी १६ जून १८५७ ला आफ्रिकेच्या अज्ञात प्रदेशाचा वेध घेण्यासाठी ते दोघे झांझिबारहून सुलतानाच्या गलबतातून आफ्रिकन भूमीकडे निघाले.

★

## प्रकरण तिसरे

# पहिली मोहीम

झांझिबार बेट आणि आफ्रिका खंडाची मुख्य भूमी यात वीस मैलांचेच अंतर आहे तरीही दोन्ही ठिकाणांत जमिनअस्मानाचा फरक होता. झांझिबार बेटावर डोंगर नव्हते सर्वत्र लागवड झालेली होती. सर्वत्र स्थिरस्थावर वाटत होते परंतु आफ्रिकेच्या भूमीवर मात्र अश्मयुगीन संस्कृतीचा प्रभाव जाणवत असे लांबवर पसरलेले गवत आणि त्यातच जणू उगवून आलेल्या स्थानिक रहिवाशांच्या झोपड्या ! मधूनमधून दिसणारी बाहुब्याची झाडे ! आणि अफाट पसरलेला जमिनीचा विस्तार ! असे त्या आफ्रिकन किनाऱ्याचे स्वरूप होते.

ही किनारपट्टीची मैदाने शंभर मैल पसरलेली होती त्यानंतर पर्वतांची शिखरे दिसू लागत आणि तेथून आफ्रिकेच्या अंतर्भागात पसरलेले शेकडो मैलांचे मध्यवर्ती पठार सुरू होई या पठाराची समुद्रसपाटीपासून सरासरी उंची ३००० फूट म्हणजे ९१४ मीटर आहे कोठेही नजर टाकली तरी एखादे पर्वत-शिखर दिसतेच ! लांबवर पसरलेल्या गवतामध्ये शहामृगांचा थवा किंवा हरिणांचा कळप धावताना सहजच दिसत असे लांबवर गवता-मध्ये एखादा आफ्रिकन निग्रो अगदी स्तब्ध उभा राहून पाहणी करताना दिसून येई

मध्य आफ्रिकेत रस्ते असे नव्हतेच ! जे होते ते गुलाम पकडणाऱ्या टोळ्यांनी पाडलेले पदपथ होते ते एका पाणवठ्यापासून दुसऱ्या पाणवठ्या-पर्यंत जोडलेले असत. समुद्रकिनाऱ्यापासून काझेह (ताबोरा) या टांगानिका-मधील ठिकाणापर्यंत पाचशे मैलांचा हा मार्ग अरब टोळ्यांनी नेहमी जाऊन

जाऊन तयार केला होता. काझेहला पोहोचल्यानंतर मात्र अरबाच्या टोळ्या सर्व दिशांना जात. तेथून एक मार्ग सरळ उत्तरेकडे व्हिक्टोरिया सरोवराकडे जाई एक पश्चिमेकडे जाऊन टांगानिका सरोवराच्या काठी असलेल्या उजिजी या गावाला जाई. आणि दक्षिणेकडचा मार्ग न्यासा सरोवराकडे जात असे परंतु या सर्व मार्गांनी जाणे फार कठीण असे. आणि पावसाळा सोडून इतर ऋतूतच प्रवास करता येई मोहिमेच्या प्रवासाचा पहिला मुक्काम किनाऱ्यावरच्या बगमायो या निसर्गरम्य गावी होत असे. समुद्राच्या पुळणीला लागून नारळीची बने पसरली होती. आणि त्यापलीकडे तांबड्या आणि हिरव्या पानांची घनदाट वनराई पसरलेली असे. बगमायोच्या थोड्या दक्षिणेला किंवा येथे तेराव्या शतकातील उद्ध्वस्त मशिदी आणि घरे पाहायला मिळत तेथील हवामानामुळे मानवी प्रयत्नांनी उभारलेले शिल्प लवकरच नष्ट होऊन गेले. या बगमायोपासूनच बर्टन आणि स्पेक यांच्या अंतर्भागातील मोहिमेची खरी सुरुवात झाली.

निघताना खूप अडचणी आल्याच ! त्यांना हवे होते तितके मजूर मिळाले नाहीत. त्यामुळे ओझी वाहण्यासाठी शेवटी गाढवे घ्यावी लागली. सामान जास्त वाढल्यामुळे सुट्या भागाची बोट आणि काही जड सामान मागेच ठेवावे लागले या दोन संशोधकांना निरोप देण्यासाठी आणि जमले तर त्यांना मदत करण्यासाठी हॅमरटन झांझिबारहून किनाऱ्यावर आला होता. या दोघांबद्दल असलेल्या प्रेमामुळे इच्छाशक्तीच्या बळावर तो तेथे आला होता. कारण तो मरणोन्मुख अवस्थेत होता. तसे तो बर्टनजवळ बोललाही होता झांझिबारला परतल्यावर तो थोड्याच दिवसात मृत्यू पावला. परंतु बर्टन आणि स्पेक यांना मात्र त्याच्या मृत्यूची बातमी ११ महिन्यानंतर कळणार होती.

जून २५ ला स्पेक काही माणसे घेऊन पुढे निघाला. दोन दिवसांनी बर्टनही उंटावर बसून निघाला. भयंकर कत्तली करणाऱ्या मसाई लोकांचा प्रदेश टाळण्यासाठी ते प्रथम नैऋत्य दिशेने निघाले त्यांचा पहिला मुक्काम दांगोमेरो येथे पडला. तेथे त्यांनी आणखी हमाल मिळविले आणि त्यांच्या जथ्थ्यामधील एकूण माणसे आता १३२ झाली. ऑगस्ट १८५७ मध्ये ते

मध्यवर्ती पठारांचा चढ चढू लागले होते अशा तऱ्हेने मोहिमेची सुरुवात तर झाली होती !

सुरुवातीला काही खास अडचणी आल्या नाहीत. एका खेड्यापासून दुसऱ्या खेड्यापर्यंत मळलेल्या पायवाटेनेच ते जात होते. रस्त्यात त्यांना किनाऱ्याकडे जाणारे अरबांचे तांडे दिसत त्या तांड्याबरोबर हस्तिदंत आणि पकडलेले गुलाम असत एकदर प्रवास फार धीमेपणाने चाले पहाटे चार वाजताच कोंबडा आरवला की सर्वजण निघत. बर्टन आणि स्पेक चहा किंवा कॉफी घेत, आणि थोडी न्याहारी करत त्यांचे अरब रक्षक पूर्वेकडे तोंड करून नमाज पढत सर्व गुरे, बोकड वगैरे मोजून तयार होईपर्यंत पुष्कळ वेळ जाई हमालात ओझे घेण्यावरून खूप भांडणे होत बहुधा अशक्त हमालाच्या वाटणीलाच सर्वांत जड ओझे येत असे ।

निघण्यापूर्वी शेवटचे काम म्हणजे मुक्कामासाठी बांधलेल्या गवताच्या तात्पुरत्या झोपड्या जाळून टाकणे

जथा पुढे चालू लागला की कोणी कसे जायचे यासंबंधी नियम ठरवलेले होते सर्वांत पुढे झांझिबारच्या सुलतानाचा झेंडा घेऊन वाटाड्या राहत असे त्याच्या मागे ढोलवाला, त्याच्या मागे कापड व मणी यांचे बोजे घेतलेले हमाल त्यांचे मागे मुक्कामाचे सामान घेतलेले हमाल आणि जनावरे बंदुकी घेतलेले रक्षक सर्व रानभर पसरलेले असत. या रक्षकांपैकी काहीजण आपल्या बायकांसह आणि त्यांच्या वैयक्तिक गुलामासह आलेले असत । बर्टन आणि स्पेक रांगाच्या शेवटी असत ते बहुधा उटावर किंवा गाढवावर बसत आणि आजारी असल्यास त्यांना झोळीतून किंवा डोलीतून नेले जाई. जथ्थ्यातील प्रत्येक पुरुषाकडे एखादे तरी हत्यार असे. आणि त्याची वैयक्तिक भांडीकुंडीही असत चालता चालता सर्वजण मोठ्याने बोलत, गाणी म्हणत आणि आरोळ्या ठोकीत असत. स्थानिक टोळीवाल्यांवर प्रभाव पडावा म्हणून जास्तीत जास्त आवाज व गोंगाट करण्याची जरूरी असे रस्त्यातून एखादा ससा पळताना दिसला तर हमाल बोजे खाली ठेवून त्याचा पाठलाग करीत. आणि सापडलाच तर तो कच्चाच खाऊन टाकत असत !

पहाटे सुरू झालेली ही पदयात्रा आठ ते अकरा वाजेपर्यंत सोयिस्कर ठिकाण पाहून यावत असे तोपर्यंत १० मैल अंतर चालून झालेले असे एखादे खेडे लागले तर चागल्या झोपड्या मिळवून त्यात मुक्काम होई खेडे नसेल तर बर्टन आणि स्पेकसाठी तंबू उभारत आणि मुक्काम करण्याच्या जागेला चहुबाजूनी काटेरी फांद्याचे गोल कुंपण लावण्यात येई दुपारी दोघे सशोधक आपली दैनंदिनी लिहित आणि इतर टिपणे करीत दुपारी चार वाजता गोवॅनीज् आचारी जेवण बनवे हमालाना कापड वाटण्यात येई आणि ते कापड देऊन स्थानिक रहिवाशापासून धान्य खरेदी करत

रात्री जर चांदणे असेल तर जथ्यातील हमाल त्या चांदण्यात नृत्य करत. नृत्य करून दमल्यानतर रात्री आठच्या सुमारास हमाल शेकोट्याभोवती जमत आणि थोड्याच वेळात सगळीकडे शातता पसरे

सर्वसामान्यत दिवसाचा हाच कार्यक्रम असे पण मोहिमेमध्ये सर्व-सामान्य दिवस कमीच असत। स्थानिक टोळ्यांचे पुढारी कापडाच्या रुपात कर घेतल्याशिवाय पुढे जाऊ देत नसत किती कापड द्यायचे याची घासाघीस खूप वेळ चाले मोहीम किनाऱ्यापासून जशी लांब जाऊ लागली तसतसे हमाल जथ्याला सोडून पळून जाऊ लागले. गाढवे मरू लागली नवीन हमाल घेणे भाग पडे अनेक वेळा स्थानिक लोकांकडून धान्य मिळत नसे त्यामुळे हमाल अर्धपोटी राहात. बर्टन आणि स्पेक जवळजवळ नेहमी आजारी राहिले मधूनच वळवाचे पाऊस पडत या सर्व अडचणींतूनही जथ्था पुढे चालला होता

१८५० ते १८६० मध्ये टांगानिकामधील वन्य जमाती बऱ्याच शात होत्या पुढील काळातच अरबांनी गुलामासाठी धाडी घातल्यामुळे ते लोक चवताळले आणि पशुवत् वागू लागले या वन्य जमाती बर्टन आणि स्पेकच्या मोहिमेचे स्वागतच करीत असत त्यामुळे बर्टनला आणि स्पेकला हा प्रवास त्रासदायक वाटला नाही.

तरीही गुलामांचा व्यापार सुरूच असे बर्टन आणि स्पेक याना गुलाम पकडणाऱ्या अरबाच्या टोळ्या वारवार भेटत. या टोळ्यात कधीकधी १००० पर्यंत पकडलेले गुलाम असत जे गुलाम आजारी होत किंवा ज्या

गुलामांना चालणे अशक्य होई त्यांना अरब रस्त्यातच टाकून देत. तेथेच ते मरणोन्मुख अवस्थेत पडलेले असत. सर्व दृश्य करुण आणि हृदयद्रावक असे पण रोज मरे त्याला कोण रडे ? बर्टन लिहितो— ' हे कबूल केले पाहिजे की या सर्व गुलामांच्या व्यापाराबद्दल सवयीने आम्हाला काही वाटेनासे झाले । झांझिबारला पोहोचल्यानंतर गुलामाचे जीवन पूर्वीच्या टोळीतील अश्मयुगीन निष्ठुरतेच्या मानाने जास्त चांगलेच जाणार होते. त्या मानाने स्वतंत्र असलेल्या आमच्या हमालांनाच खडतर जीवन कंठावे लागणार होते । '

एकंदरीत बर्टनला आफ्रिकन निग्रोबद्दल सहानुभूती नव्हती.

मध्य आफ्रिकेच्या वन्य जमातींना धर्म माहीत नव्हता. विवाहविधी माहीत नव्हता, कोणत्याही नीतिनियमाचे बंधन त्यांना नव्हते. आणि जमातीतील पुढाऱ्याला व बलिष्ठाला किती बायका असाव्यात याला काही बंधने नव्हती । बारापासून तीनशेपर्यंत बायका एकेकाला असत ।

परंतु मध्य आफ्रिकेत एके काळी मानवी संस्कृतीचा उदय झाला होता. तेथे विहिरी, घरे, चित्रकला वगैरे बाबतीत प्रगती झाली होती सेरेंगट्टीचे पठार व वोल्डुवाईचे खोरे या भागातील हे संस्कृतीचे अवशेष नंतर सापडले. दुर्दैवाने बर्टन आणि स्पेक या भागातून गेले नव्हते. बर्टन हा खरा संशोधक असल्याने त्याला या संस्कृतीच्या अवशेषात रस वाटला असता ! परंतु त्याला लिहावे लागले, ' मध्य आफ्रिकेमध्ये काहीही नाही । चालीरिती, उध्वस्त अवशेष, कलाकुसरीची कामे यापैकी येथे काही सापडत नाही पण पुरेसा रानटीपणाही नाही ! '


बर्टन आणि स्पेक हे त्या भागात शिरलेले पहिले गोरे होते. खेडेगावातील लोकांना त्यांच्याबद्दल फारच उत्सुकता वाटत असे. ते नेहमीच कोंडाळे करून त्या दोघांच्या भोवती उभे असत आणि तासन्तास बघत राहात, काहीजण धीटपणाने त्यांच्या गोऱ्या कातडीला हातही लावून पहात ।

बर्टनला आफ्रिकन लोकांबद्दल तिरस्कारही वाटे. त्यांचे पोम्बे नावाची दारू पिणे आणि त्यांचे बहुपत्नीत्व यांचेबद्दल बर्टनने पुन पुन्हा लिहिले आहे. त्यामानाने स्पेक आफ्रिकनांच्याविरुद्ध लिहिताना दिसत नाही. तरीपण

बर्टनने आफ्रिकनाना त्यामानाने चांगलेच वागवले कारण पुढील काही संशोधकानी आधुनिक शस्त्रांनी उगीचच्या उगीच कत्तली केल्या आहेत. बर्टनच्या सुसंस्कृत मनाच्या गरजा पूर्ण होत नव्हत्या. म्हणून त्याची गुलाम पकडणाऱ्या अरबांशी जास्त दोस्ती झाली काझेहला पोहोचल्यानंतर त्याला जेव्हा अरब व्यापारी भेटले तेव्हा त्याला फार आनंद झाला तो अरबां-मध्ये लागलीच मिसळला व त्याने त्याच्या स्तुतीपर लिहून ठेवले हेच अरब स्त्रिया, पुरुष आणि मुलाना रानटी गुराप्रमाणे पकडणारे गुलामांचे व्यापारी आहेत. हे त्याने मनावर घेतले नाही।

त्यावेळी काझेहमध्ये पचवीस अरब व्यापारी मुक्काम करून होते त्यानी तेथे मातीचीच पण खूप मोठी घरे बांधली होती. अर्थात त्या घरात जनान-खान्यासाठी आणि गुलामासाठी निराळी जागा राखून ठेवलेली असे त्यानी तेथे फळे, भाजीपाला आणि भात लावला होता. तेथील लहानशा बाजारात आवश्यक त्या सर्व वस्तू मिळत. पण किंमती मात्र झांझिबार येथील किंमती-पेक्षा पाचपट असत या अरबांचे जीवन धकाधकीचेच होते मलेरियामुळे आणि डासामुळे सदान्कदा कोणीतरी आजारी असेच। अनेकदा दीर्घकाळ मुक्काम करावा लागे. एकसूरी आणि भयाण शांततेच्या जीवनक्रमाला ते कटाळलेले होते म्हणून किनाऱ्यावरून आलेले हे दोन गोरे लोक त्यांना जेव्हा भेटले तेव्हा त्याना आनंदच झाला आणि त्यानी सर्व मदत देऊ केली बर्टन आणि स्पेक यांनी काझेहमध्ये एक महिना मुक्काम केला. बर्टनला अरबी भाषा येत असल्याने तो अरबांमध्ये मिसळला आणि त्यांचे-कडून मध्य आफ्रिकेबाबत खूपच माहिती मिळविली त्याच्याशी गप्पा मारण्यात बर्टनचा वेळ फार मजेत गेला

डिसेंबर १८५७ मध्ये त्यानी पुन्हा प्रवास सुरू केला आणि १३ फेब्रुवारी १९५८ ला ते टांगानिका सरोवराच्या काठावरच्या उजीजी गावाला पोहोचले गुलाम आणि हस्तिदंत यांच्या व्यापाराचे ते मोठे केन्द्र होते सरोवराचा हा मोठाच शोध होता। परंतु बर्टन आणि स्पेक आजारी होते स्पेकचे डोळे आले होते त्यामुळे त्याला सरोवर दिसले नाही. बर्टनचे तोंड सुजले होते त्यामुळे त्याला पातळ पदार्थ फक्त खाता येत होते. त्यानी




**स्पेक आणि बर्टनचा प्रवास मार्ग**

कशातरी दोन बोटी मिळविल्या आणि त्यातून ते सरोवराच्या उत्तरेला निघाले उत्तरेकडून एखादी नदी सरोवरातून उगम पावत असेल तर तीच नाईल नदी असेल असे त्याला वाटले. परंतु त्यांची निराशा झाली. रुझीझी नावाची नदी दक्षिणेकडून टांगानिका सरोवरात वाहत येते. तेव्हा नाईलचा उगम न सापडताच निराश अंतःकरणाने ते उजिजीहून काझेहला परतले येथे त्यांना झांझिबारहून पिछाडीला ठेवलेली शिधासामग्री आणि घरची पत्रे मिळाली व बाहेरच्या जगातील बातम्या समजल्या हिंदुस्थानातील उद्रेकाचे वर्तमान ऐकून आपले भाकित खरे झाल्याबद्दल बर्टनला समाधान वाटले !

परंतु आता अशा काही घटना घडल्या की त्यातूनच मध्य आफ्रिकेतील नाईलच्या उगमासंबधीचा कटु वादविवाद सुरु झाला ! बर्टनला सामानाची

आणि जथ्याची जमवाजमव करण्यासाठी थाबायचे होते त्यानी अरबाचे-कडून ऐकले होते की टागानिका सरोवरापेक्षा मोठे सरोवर काझेहच्या उत्तरेला तीन आठवड्याच्या अंतरावर आहे. ते शोधण्यासाठी स्पेकला तावडतोब निघायचे होते. तेव्हा बर्टन मागे राहिला आणि एक लहानसा जथ्था व रक्षक बरोबर घेऊन स्पेक ९ जुलै १९५८ ला उत्तरेकडे निघाला काझेह आणि व्हिक्टोरिया सरोवर यांमधील प्रदेश आजही सपाट गवताळ प्रदेशाचा आहे कितीही मैल चालले तरी एकच दृश्य दिसते क्षितिज-रेषे-पर्यंत पसरलेले गवत आणि अधूनमधून दिसणारी झाडे। खेडी फारच विखु-रलेली आणि खेड्याच्या जवळपास वाळलेले गवत जाळून टाकल्यामुळे विस्तीर्ण पसरलेले जमीनीचे काळे पट्टे! आणि अखड धूळ। परतु सरोवर जवळ येऊ लागले तसतसा हा एकसुरी देखावा बदलू लागला. जमीन हिर-वीगार दिसू लागली आणि हवा दमट झाली क्षितीजावर वृक्ष-राजी दिसू लागल्या आणि माँझा येथे पोहोचल्यावर तर सरोवर दिसू लागले। हे सरोवर म्हणजे लहानसा समुद्रच होता व आहे। किनाऱ्यापर्यंत घनदाट वृक्षाची राई लागलेली असे। आणि पुळणीमध्ये पिवळ्या रगाची वाळू असे उत्तरेला पाहिले तर पलीकडला किनारा दिसतच नसे। या सरो-वरात बेटे होती आणि बारक्या बोटीतून स्थानिक रहिवासी जाता-येताना दिसत होते सरोवराहून मद वाऱ्याच्या झुळुका किनाऱ्यावर येत आणि पाणघोडे पाण्यातून बाहेर येताना दिसत. सरोवराचा रग नेहमी आकाशा-सारखा असे म्हणून स्वच्छ सूर्यप्रकाशात त्या सरोवराचे पाणी निळे दिसत असे. ढगाळ हवा असेल तर ते करड्या रंगाचे होई आणि वादळी हवा-मानात ते काळेकुट्ट दिसे. अनेक दिवशी सरोवरावरील सूर्यास्त पाहण्या-सारखा असे आकाशामध्ये इद्रधनुष्याच्या सातही रगाची उधळण होई आणि त्याची प्रतिबिंबे सरोवराच्या पृष्ठभागावर नाचत असत।

सरोवराच्या किनाऱ्यावर तेथे उगवलेल्या पापीरस गवतावर पाण्याच्या लाटा आपटत आणि त्याचा अखड नाद ऐकू येत असे अनेक प्रकारच्या कीटकाचा आवाज त्यातच मिसळे, मासे पकडण्यासाठी बगळ्यांचे थवेच्या थवे येथे उतरलेले असत.

बर्टन परत आला तेव्हा त्याला दिसून आले की आपली संपूर्ण उपेक्षा झाली आहे नव्या मोहिमेत त्याला भाग घेण्यास निमंत्रण दिले नाही आणि सर्वत्र स्पेकचाच उदोउदो चालला आहे, आणि लोक आपल्याला पूर्ण विसरलेले आहेत हे सर्व मनात ठेऊन बर्टन याचा भीषण सूड उगविणार होता. पण त्याला अजून पाच वर्षे अवकाश होता!

★

प्रकरण चौथे

# निसर्गाच्या कुशीत

स्पेक आता ज्या प्रदेशात शिरणार होता तेथील म्हणजे युगांडामधील पूर्वीचा इतिहास कोणालाही माहीत नव्हता. परंतु पूर्वी केव्हातरी इथोपिया-मधून निग्रोपेक्षा उच्च संस्कृती असलेली एक जमात या भागात आली. आणि त्यांनी येथे राज्य स्थापन केले हे नक्की ! बेबदशाही आणि रानटी-पणा मध्य आफ्रिकेत सर्वत्र पसरला होता त्यामध्ये व्हिक्टोरिया सरोवराच्या पश्चिमेस आणि उत्तरेस ही सुघटित राज्यव्यवस्था बेटासारखी होती. १८६० मध्ये तेथे तीन स्वतंत्र आणि त्यातल्यात्यात सुसघटित राज्ये अस्तित्वात होती उत्तरेकडे बुन्योरो, सरोवराला लागून पश्चिमेकडे ब्युगांडा आणि दक्षिणेकडे कराग्वे अशी ही तीन राज्ये होती ही तीन राज्ये आणि तेथील समाज इतर आफ्रिकेच्या मानाने सुधारलेला होता आणि त्याना स्वतःची संस्कृती होती आफ्रिकेबाहेरच्या जगाला मात्र १८६० पर्यंत त्याच्या अस्तित्वाची कल्पनाही नव्हती

अहमद बिन इब्राहिम नावाचा एक अरब व्यापारी १८४० पर्यंत कराग्वे येथ पोहोचला होता पण एकही गोरा मनुष्य १८६० पर्यंत तेथे गेलेला नव्हता. तेथील जनतेला बाहेरच्या जगात काय आहे याची काडीमात्र कल्पना नव्हती त्यांची वसाहत इतर जगापासून जणू चंद्रावरची वसाहत असावी इतकी अलग पडली होती !

मध्य आफ्रिकेतील या जनतेने कायम अश्मयुगीन समाजरचनेतच अडकून पडावे अशीच त्याची नियती होती तेथील मानवाच्या मनातील महत्त्वाकांक्षा

नियतीने जणू विसरून टाकली होती ! शतकामागून शतके तेथले जीवन किडामुंगीच्या जीवनाप्रमाणे एकाच चक्रात फिरत होते ! आसपासचे जग समजून घ्यावे, सुधारावे अशी इच्छा तेथील मानवी समाजाला कधी झालीच नसावी लोकभ्रम, जादूटोणे आणि विचित्र चालीरीती यांच्या विळख्यात तेथील लोक नित्य अडकलेले होते !

परंतु व्हिक्टोरिया सरोवराजवळील या तीन राज्यात मात्र तशी परिस्थिती नव्हती. त्या जनतेत संस्कृतीची चांगलीच वाढ झाली होती आणि तीही कोठल्याही बाह्य उदाहरणाशिवाय व मदतीशिवाय ! परंतु त्यांच्यातही एक विचित्रपणा राहिला होता काही बाबतीत त्यांची प्रगती पुढारलेल्या समाजाइतकी झालेली होती. आणि या सुसंस्कृत वातावरणात काही चाली-रीती आणि लोकभ्रम मात्र शेकडो वर्षांपूर्वीचेच अश्मयुगकालीन टिकून होते सुधारणेची आणि रानटीपणाची एक विचित्र सरमिसळ त्यांच्यात झाली होती !

उदाहरणार्थ, इतर राज्य टोळ्याप्रमाणे त्यांची घरे झोपडीवजा नसून चांगल्या बांधणीची होती. आणि त्यांची उंची पन्नास फुटापर्यंतही असे ! ती पावसात न गळता कोरडी राहत आणि उन्हाळ्यात तेथे थंड वाटे विसाव्या शतकात युगांडामध्ये बांधलेल्या आधुनिक इमारतींपेक्षा ती जास्त आकर्षकही होती ! ढोल, शिंगे, कर्णे वगैरे वाद्येही खूपच चांगली होती. व्हिक्टोरिया सरोवरात सत्तर फूट लांबीच्या बोटीतून ते प्रवास करीत असत त्यांनी विणलेल्या टोपल्या इतक्या घट्ट विणीच्या असत की, त्यात पाणीही राहू शके ! झाडांच्या सालीपासून मऊ व टिकाऊ वस्त्रे (वल्कले) तयार करण्याची कला त्यांना माहीत होती राजाच्या दरबारात वस्त्र परिधान न करता कोणीही जात नसे ते पायात चपला घालत. टोंगा नावाचा मोठा झगा प्रतिष्ठित लोक घालत आणि अंगावर हरिणाजीन पांघरत

मध्य आफ्रिकेतील इतर वन्य जमातींप्रमाणे येथील लोक आपले शरीर गोंदवत नसत जेवण्यापूर्वी ते हात धुवत घरामध्ये गुलाम असतच पण त्यांना घरातल्यासारखीच वागणूक मिळे त्यांचे जेवण खूपच चांगले असे रताळी, केळी, कोंबड्याचे मांस, मासे वगैरे त्यांच्या जेवणात असे

या तीन राज्यांपैकी ब्युगांडा हे सर्वांत पुढारलेले आणि जास्त श्रीमंत राज्य होते. राजाची सत्ता अमर्याद होती परंतु त्याला सल्ला द्यायला एक मंडळ होते एखाद्या मंत्रिमंडळाप्रमाणेच हे मंडळ काम करे. प्रांतावर राज्यपाल नेमलेले असत. आणि ते बहुधा राज्यकर्त्यांच्या कुळातले असत सर्वांना राज्याच्या दरबारात हजर राहावे लागे. आणि तेथील शिष्टाचाराचे नियम कडक होते राजा दरबारात असताना कोणालाही खाली बसता येत नसे राजाची परवानगी घेऊनच बोलावे लागे राजा दरबारात आला की जमिनीपर्यंत वाकून कुर्निसात करावा लागे राजाला प्रतिपरमेश्वरच समजले जाई !

परंतु या सगळ्या संस्कारांबरोबर तेथे रानटीपणाही भरपूर राहिला होता ! लिहिण्याची किंवा वाचण्याची कला माहिती नव्हती आठवडे किंवा महिने, वर्ष मोजण्याचे कोणतेही कालमापन नव्हते चाक किंवा नांगर माहिती नव्हता आणि जादूटोण्यापलीकडे धर्म माहीत नव्हता एखाद्या बिघडलेल्या चिडक्या मुलाप्रमाणे त्यांच्या भावनांचा उद्रेक होत असे सर्व लोक भयंकर क्रूर होते. सर्व स्त्री-पुरुषांत दारू पिण्याचे प्रमाण फार होते

या तिन्ही राज्यात नेहमी कटकटी चालू असत उत्तरेकडील ब्युन्योरो राज्य कमी पावसाचे व कोरड्या हवामानाचे होते मैलोगणती केवळ गवत उगवलेले असे तेथील लोक जास्त कठोर, युद्धखोर आणि आक्रमक होते त्यांचा राजा कमरासी हा तसाच क्रूर आणि आक्रमक होता दक्षिणेकडील ब्युगांडा राज्याशी त्याचे हाडवैर होते. नाईल नदीतील बेटावर राहणाऱ्या गायनगा या आपल्या बंडखोर भावाबरोबरही तो झगडत असे.

व्हिक्टोरिया सरोवराच्या पश्चिमेकडचे कराग्वे राज्य समुद्रसपाटीपासून पाच हजार फूट उंच होते आणि तेथील निसर्ग सुंदर आणि आल्हाद-दायक होता तेथील क्षितिजापर्यंत पसरलेल्या हिरव्यागार गवताळ मैदानात जनावरांचे प्रचंड कळप चरत असत या कळपामध्ये हजारो हत्ती, जिराफ, रानम्हशी, हरणे आणि गेंडे असत. सरोवरातून रात्रीच्या वेळी गेंडे, पाणघोडे बाहेर पडत

कराग्वे राज्याचा राजा रुमानिका नावाचा होता त्याची राजधानी

वारन्यगे नावाच्या ठिकाणी होती. परकीय पाहुण्यांचे तो चांगले स्वागत करीत असे तिन्ही राज्यात त्याचे राज्य कमकुवत असल्याने तो बन्योरो व व्युगांडा राज्याशी मित्रत्वाने व नम्रपणानेच वागे तो त्यांना वारंवार भेटी पाठवी आणि आपण व्युगांडाचे मांडलिक आहोत असे दर्शवी रूमानिका-जवळ आधिरकन चक्रमपणा होताच! त्याच्या जनानखान्यात फारच लठ्ठ बायका होत्या त्या इतक्या लठ्ठ होत्या की त्यांना धड उभे राहाता येत नसे त्या नेहमी जमिनीवर लोळलेल्या असत पोकळ भोपळयात भरून आणलेले दूध त्याना कायम प्यावे लागे

उत्तरेकडील व्युगांडा राज्यात प्रचंड जंगले होती हवामान उष्ण व दमट होते जमिनीतून नाना रंगांच्या वनस्पती उगवलेल्या असत सगळीकडे केळीची बने लागलेली होती आणि जंगलामध्ये नित्य फुलणारी झुडपे होती नाना प्रकारच्या पक्ष्यांनी जंगल भरलेले असे निसर्गाने सौंदर्याची उधळण मुक्तहस्ताने तेथे केली होती

१८६० मध्ये युगांडाच्या राज्यावर मुटेसा हा राजा आरूढ झाला होता. आणि त्याची राजधानी व्हिक्टोरिया सरोवराच्या जवळच एका टेकडीवर होती जवळजवळ तेथेच आता आधुनिक युगांडाची राजधानी कंपाला आहे राजधानीकडे येण्यासाठी जंगलातून एक मोठा कच्चा रस्ता काढला होता. आणि शहरामध्ये चांगल्या बांधणीच्या गोल आणि मोठ्या झोपड्या होत्या आसपास लोकांचे थवे दिसून येत स्त्रिया बहुधा नग्न असत किंवा जास्तीत-जास्त कमरेभोवती कापडाचा तुकडा गुंडाळलेला असे पण पुरुष मात्र टोगा नावाचा पायघोळ झगा घालत असत

शहराच्या मध्यभागी प्रशस्त झोपड्याच्या परिसरात मुटेसाचा दरबार होता मध्यभागी गवताचा चौथरा रचून त्यावर तांबडे जाजम पसरून मुटेसा बसलेला असे आणि त्याच्याभोवती त्याचे सरदार, खिदमदगार आणि बायका उभ्या असत १००–२०० लोकांचा हा जमाव असे मुटेसा त्या वेळी विशीतला तरुण होता तो अंगाने सडपातळ होता आणि त्याचे डोळे वेध घेणारे होते त्याने नेसलेल्या टोग्याची गाठ खांद्यावर मारलेली असे. आणि

हातावर आणि पायावर तो खूप रंगीत मणी बांधत असे. भाला, ढाल आणि पांढरा कुत्रा ही त्याची राजचिन्हे त्याच्या पायाजवळ ठेवलेली असत. तो बाहेर जाऊ लागला की सर्व दरबार त्याच्या मागे जाई. चालताना तो पाय गुडघ्यात न वाकवता चाले। आणि सिंहाच्या चालीची नक्कल करत असे. चालता चालता त्याला बसण्याची लहर आली तर एक-दोन खिदमदगार आपल्या हाताने आणि गुडघ्यांच्या आधाराने मानवी खुर्ची तयार करत। तो बोलू लागला की सर्वजण शांतपणे ऐकत आणि नंतर त्याला नमस्कार करण्यासाठी जमिनीवर साष्टांग नमस्कार घालीत मुटेसाचा प्रभाव त्याच्या दीर्घ कारकीर्दीच्या सुरुवातीपासूनच जाणवत असे



संशोधक ग्रँन्ट

या सर्वांबरोबर मुटेसाचा क्रूरपणा विसंगत भासत असे बहुतेक दररोज एखाद्या माणसाची हत्या मुटेसाच्या आज्ञेवरून होत असे कधी कधी शुल्लक कारणावरून तर केवळ लहरीमुळेच वधाची आज्ञा दिली जाई. एखादी रखेली मोठ्याने बोलली किंवा एखादा खिदमदगार दार उघडण्यात चुकला तरीही त्याला मुटेसा मृत्यूदंड देई आणि ती व्यक्ती किंकाळ्या मारीत

असतानाच रक्षक पकडून नेत आणि क्षणातच मस्तक धडावेगळे केले जाई ! त्याचवेळी ढोल वडवण्यात येत आणि मरणाऱ्याच्या किंकाळ्या त्या आवाजात गडप होत ! मध्ययुगीन कहाण्यातून आणि कथातून ऐकू येणारे छळाचे विविध प्रकार मुटेसाच्या दरबारात चालू होते जिवंत जाळणे, त्याचे हात, पाय, कान कापणे आणि मृत माणसाच्या जिवंत बायकांना त्याच्या-बरोबर पुरून टाकणे, यामध्ये लोकांना विशेष काहीच वाटत नसे एखादा लहान मुलगा जितका सहजपणे किडा चिरडून टाकतो तितक्याच सहजतेने मुटेसा माणसाचा प्राण घेत असे ! त्याला इतराच्या वेदना कधीच जाणवत नसत

परंतु मुटेसा निराळे काही वागत नव्हता त्याचे बारा किंवा पधरा पूर्वज असेच वागत गेले होते ! क्रूरपणा हा जंगलचा कायदा होता ! जर मुटेसा असा क्रूरपणा करून आपल्याबद्दल भीती निर्माण करू शकला नसता तर त्याला राज्यावर फार काळ राहता आले नसते मुटेसाने राज्यावर आल्या-बरोबर बंड टाळण्यासाठी आपल्या साठ भावाना जिवंत जाळले होते !


मुटेसाजवळ इतर गुण होतेच ! तो मूर्ख नव्हता देणग्या वगैरे देऊन दोन माणसाना एकमेकांविरुद्ध भांडत कसे ठेवायचे हे त्याला चांगले माहीत होते त्याच्या भोवती असलेले ढोल-वादक, नग्न बायका आणि निग्रो योद्धे यामुळे तो रानटी टोळयाचा नायक वाटत असे परंतु ते खरे नव्हते तो मुरलेला राजकारणी होता बन्योरोच्या करामारीशी युद्ध करताना कराग्वेच्या रुमानिका राजाला तो तटस्थ ठेवत असे त्याच्याभोवतीच्या जगाच्या व्यव-हाराचे त्याला चांगले ज्ञान होते

मध्य आफ्रिकेमध्ये सभोवारच्या अराजकतेत एखाद्या बेटासारखी ही सघटित समाजरचना शभर वर्षापूर्वी अस्तित्वात होती परंतु तेथील मानवी मनावर भीतीचे साम्राज्य होतेच ! अश्मयुगीन रानटीपणा होताच ! तरीपण या लोकांना सुधारलेल्या संस्कृतीचा अवगुणापासून संरक्षण मिळाले होते तेथे गर्मी-परम्यासारखे गुप्त रोग नव्हते, देवी नव्हत्या किंवा जनावराची कत्तल करणारा लाळचा रोग नव्हता मुटेसाच्या क्रूरपणाचा परिणाम सामान्य लोकाच्या आयुष्यावर होत नव्हता त्याना खायला प्यायला भरपूर होते.

आहे ती परिस्थिती लोकाना अटळ वाटत असावी आपल्या जीवनपद्धतीत बदल करावा असे त्याना वाटत नव्हते गुलाम पकडणारे अरब व्यापारी आल्याच्या वातम्या जेव्हा पसरत तेव्हा थोडी खळबळ उडे याशिवाय बाह्य जगाशी त्याचा सबध नव्हता १८६१ च्या शेवटी स्पेक आणि ग्रँट या विभागात प्रवेश करेपर्यंत हा विभाग हजारो वर्षांपूर्वीच्या परिस्थितीतच होता परतु याच्या आगमनामुळे येते अभूतपूर्व उलथा-पालथीला सुरुवात होणार होती

या दोघा सशोधकाना झाझिबारपासून अतर्भागात जायला एक वर्ष लागले मागच्या मोहिमेप्रमाणे याही मोहिमेत सर्व प्रसगाची पुनरावृत्ती झाली पूर्वीचेच रक्षक बॉम्बे आणि माबर्की बरोबर होतेच मागच्या मोहिमे-प्रमाणेच हमाल पळून गेले स्थानिक टोळीप्रमुखांनी घासाघीस करून कर वसूल करून घेतला त्यांची गुरे चोरीला गेली. आणि ग्रँट मलेरियाने आजारी पडला आणि ते वर्षभरात व्हिक्टोरिया सरोवराच्या जवळही जाऊ शकले नाहीत बर्टन त्यावेळी पश्चिम आफ्रिकेमध्ये कॅमेरून्स येथे सशोधन मोहिमेत गर्क होता त्याला जर स्पेकची दुर्दशा समजली असती तर तो उपहासाने हसला असता ! परतु शेवटी नोव्हेंबर १८६१ मध्ये स्थानिक टोळी-वाल्याच्या लढ्यातून सुटून ग्रँट आणि स्पेक यानी काझेहच्या उत्तरेकडे कराग्वेच्या अज्ञात प्रदेशात प्रवेश केला

स्पेकला ग्रँट हा आदर्श सहकारी मिळाला होता ते दोघे एकाच वयाचे होते. आणि हिंदुस्थानात त्यांची मैत्री जमलेली होती ग्रँट हा उत्तम अनुयायी म्हणून योग्य होता. आपल्या नेत्याची आज्ञा त्याला शिरसावंद्य होती तो तक्रारी कधीच करीत नसे कुत्रा जितक्या निष्ठेने धन्याची आज्ञा पाळतो तितक्या निष्ठेने तो स्पेकची आज्ञा पाळी जनरल गॉर्डनच्या मते ग्रँट फार थड आणि बोअर करणारा होता असेलही तसे ! पण तो थड डोक्याचा होता, चागला सैनिक होता, १८५७ च्या हिंदुस्थानातील उद्रेकात तो लढला होता. त्याबद्दल त्याला शौर्यपदकही मिळाले होते याशिवाय तो चित्रकार होता आणि वनस्पतिशास्त्रात त्याला रस होता




**स्पेक व ग्रॅन्टचा प्रवासमार्ग**

हे दोघे गोरे भेटल्यामुळे कराग्वेचा राजा रुमानिका याला आनंद वाटला त्याला भेटणारे हे पहिलेच गोरे लोक होते त्याने त्याना उत्तम झोपडी राहायला दिली, आणि भरपूर शिधासामग्री दिली स्पेकने वॉरनयेंगे येथे एक महिना आनंदात घालविला त्याने रुमानिकाला देणग्या दिल्या आणि त्याच्याकडून घेतल्या त्याची पोम्बे दारू पिऊन पाहिली. त्याच्या लठ्ठ बायकांची टेपने मापे घेतली आणि बंदुकीने बऱ्याच गेंड्याची शिकार केली आणि जंगलांत राहणाऱ्या भयंकर राक्षसाबद्दल स्थानिक लोकांकडून कथा ऐकल्या पण तेथे सांगितलेल्या कथांवर आणि गप्पांवर फारसा विश्वास ठेवायचा नसतो हे लवकरच त्यांना समजले उदाहरणार्थ, रुमानिकाने सांगितले होते की, 'मुटेसाच्या दरबारात विजार घालून जाऊ नकोस त्यात फार धोका आहे!' पण तसे काही घडले नाही मुटेसाकडे या मोहिमेची बातमी पाठविण्यात आली आणि त्याचेकडून आमंत्रण येईपर्यंत

डिसेंबर महिना उलटून गेला

ग्रँटला हे दिवस फार कठीण गेले. त्याचा पाय सुजून ठणकत होता त्यामुळे त्याला झोपडीच्या बाहेरही पडता येईना की चालता येईना! शेवटी ८ जानेवारी १८६२ रोजी मुटेसाकडून निमंत्रण आले तेव्हा आजार-पणामुळे ग्रँट मागेच राहिला आणि स्पेक एकटाच पुढे निघाला. ग्रँटने पुढील तीन महिने झोपडीतच घालविले. या काळात त्याला बाहेरची काहीही बातमी समजली नाही



संशोधक स्पेक

स्पेकला मुटेसाच्या दरबारापर्यंत जायला सहा आठवडे लागले शेवटी त्याला सेसे बेटाजवळ व्हिक्टोरिया सरोवराचे दर्शन झाले. व्हिक्टोरिया सरोवर हाच नाईलचा उगम असला पाहिजे याविषयी त्याची आता खात्री झाली परतु त्याला आपले भौगोलिक संशोधन थांबवून मुटेसाचे स्वागत स्वीकारणं भाग होते

तो मुटेसाच्या राजधानीजवळ पोहोचल्यानंतर स्पेकने आपला उत्तम



राजा ' मुटेसा

सूट बाहेर काढला. आपल्या लोकांना चागले गणवेश दिले आणि मुटेसाला नजराणा द्यावयाच्या वस्तू गोळा करून तो मुटेसाला भेटायला निघाला. पण पाऊस पडल्यामुळे हा सर्व समारभ दुसऱ्या दिवसावर गेला २० फेब्रुवारी १८६२ रोजी, तांबडा गणवेश केलेले अगरक्षक आणि युनियन जॅक घेऊन तो निघाला परतु दुसऱ्या कोणाला तरी प्रथम प्रवेश दिल्यामुळे स्पेकला वाड्याबाहेरच उन्हात थांबायला सांगितले. तो तेथे ५ मिनिटे थांबला आणि रागावून एका मैलावरच्या आपल्या झोपडीकडे परत गेला. मुटेसाच्या दरबारी लोकांनी हे पाहिले. असे पूर्वी कधी घडले नव्हते ! ते धावतच स्पेककडे गेले आणि त्याला सांगितले की राजा त्याला ताबडतोब भेटेल आणि दरबारात बसण्यासाठी त्याला त्याची खुर्चीही आणता येईल असा मान पूर्वी कुणालाच दिलेला नव्हता !

स्पेक परत राजवाड्याकडे गेला तेव्हा स्वागताची सर्व तयारी पूर्ण झाली होती पाच तारांची वीणा आणि कर्णा यांचा वाद्यवृंद संगीत वाजवीत होता. दोन्ही बाजूला खिदमतगार होते स्पेक सिंहासनाजवळ गेला आणि तेथे खुर्ची टाकून बसला आणि त्याने आपल्या डोक्यावर छत्री धरली. पुढे काय घडते याची तो वाट पाहू लागला पण काहीच घडले नाही ! एक तासभर ते दोघे एकमेकांकडे पाहत होते मधून मधून मुटेसा आपल्या दरबारी लोकांना स्पेकचे अंगरक्षक, त्याची छत्री याबद्दल माहिती विचारत होता स्पेक मात्र शांतपणे वाट पाहात बसला होता

शेवटी एक मनुष्य निरोप घेऊन आला 'राजाला पाहिले काय ?' त्याने विचारले

'होय, पूर्ण तासभर पाहिले' स्पेकने उत्तर दिले स्पेकचे उत्तर मुटेसाला सांगितल्यानंतर तो उठला आणि सिंहाच्या चालीची नक्कल करीत आपल्या टाचांवर चालत तो आत निघून गेला ! राजाचे जेवण होईपर्यंत स्पेकला थांबावे लागले. कारण स्पेकची भेट होईपर्यंत राजाने काहीच खाल्ले नव्हते रात्री पुन्हा मशालीच्या उजेडात त्याची भेट झाली त्यावेळी स्पेकने आपल्या भेटी दिल्या या भेटीमध्ये दारूगोळ्यासह रायफल व बंदुका, सोन्याचे घड्याळ, दुर्बिण, लोखंडी खुर्ची, मणी, रेशमी कापड, चाकू, चमचे आणि काटे होते मुटेसाने परत भेट म्हणून त्याला गुरे, बोकड, मासे, घुबड, साळींदर आणि उंदीर दिले त्याच्या दृष्टीने हे सर्व उत्तम प्रकारचे खाद्य होते !

नंतरच्या एका भेटीच्या वेळी एक चमत्कारिक प्रसंग घडला. पिस्तुलाची जादू दाखवावी म्हणून राजाने स्पेकला विनंती केली तेव्हा त्याने चार गाई मारून दाखवल्या एक गाय अंगावर धावून आली म्हणून स्पेकला दुसरी गोळी घालावी लागली

स्पेक लिहितो, 'मी दिलेल्या पिस्तुलांपैकी एका पिस्तुलात राजाने स्वतः गोळ्या भरल्या ते आपल्या खिदमदगाराजवळ दिले आणि त्याला बाहेरच्या दरबारातील एखादा मनुष्य मारायला सांगितले तो बाहेर गेला आणि लगेच एका माणसाला मारून परत आला ! त्याच्या चेहऱ्यावर एखाद्या

लहान मुलाला पक्ष्याचे घरटे मिळाल्यावर जसा आनंद होतो तसा निरागस आनंद दिसला ! राजाने त्याला विचारले, 'तू सगळे बरोबर केलेस ना ?' तो उत्तरला, 'होय महाराज !' त्याने कोणत्या मनुष्याला ठार केले आहे हे समजून घेण्याची कोणीही उत्सुकता दाखविली नाही ! किंवा दरबारात खळबळही माजली नाही '

मुटेसाला हे पिस्तुल आणि बंदुका म्हणजे नवीन खेळणे मिळाल्यासारखेच झाले ! तो बंदुक हातात घेऊन राजधानीच्या बाहेर पडे त्याच्या मागोमाग त्याच्या बायका, खिदमतगार आणि दरबारी येत तो झाडावरचे किंवा आकाशातील एखादे गिधाड नेम धरून मारे. ते खाली पडले की भोवतालचे सर्व लोक धावत जाऊन ते पाहत आणि आपल्या राजाच्या या जादूमुळे विस्मयचकित होऊन त्याला साष्टांग नमस्कार घालण्यासाठी तेथेच जमिनी-वर लोळण घेत !

मुटेसाच्या मागोमाग त्याच्या बायका थव्याने जात असत पण त्या गुलामच होत्या स्पेक लिहितो, 'कोणत्या तरी गुन्ह्याची भरपाई म्हणून तेथील लोक राजाला आपल्या तरुण मुली जनानखान्यांत भरती करण्या-साठी नजर करत '

राजमाता पन्नेचाळीस वयाची होती तिला अधिकारही बरेच होते आणि तिचा दरबार स्वतंत्र भरत असे पण तिला दारूचे व्यसन होते आपल्याला वाईट स्वप्ने पडतात व पोट बिघडते असे तिने स्पेकला सांगितले स्पेकने तिला दारू सोडायला सांगितली आणि काही औषध दिले परंतु तिने मद्यपान चालूच ठेवले अशा विचित्र जगात स्पेकने तीन महिने घालविले त्यानंतर ग्रँटही तेथे येऊन पोहोचला नंतर ते आपल्या संशोधन मोहिमेवर निघाले कराग्वेहून येताना त्या दोघानाही कागेरा नावाची मोठी नदी ओलांडावी लागली पण ती व्हिक्टोरिया सरोवराला जाऊन मिळत होती तेव्हा ती नाईल नदीचा उगम असणे शक्य नव्हते. मुटेसाच्या दर-बारात त्याना बातम्या मिळाल्या की तेथून जवळच पूर्वेकडे सरोवराच्या काठावर एक मोठा धबधबा आहे स्पेकने तेथे जायचा निश्चय केला

परंतु मुटेसा त्याना जायला परवानगी देईना या दोघा गोऱ्यांमुळे त्याला

भरपूर करमणूक मिळाली होती आणि त्याच्याकडून आपण अजून पुरेशा भेटी उपटल्या नाहीत असे त्याला वाटत होते । शिवाय ते पूर्वेकडे म्हणजे ब्युन्योरोचा राजा कमरासी याच्या हद्दीत जात होते आणि त्याच्याबरोबर मुटेसाचे शत्रुत्व होते शेवटी आणखी सहा आठवडे त्यांना थांबावे लागले आणि मुटेसाने परवानगी दिली त्याचा जथा ७ जुलै १८६२ रोजी पूर्वेकडे निघाला

आता मोहिमेतील सर्वांत विचित्र घटना घडली त्याच्या वाटाड्याने त्यांना सरोवराच्या उत्तरेला नेले होते नाईल नदी गाठण्यासाठी त्यांना दक्षिणेकडे वळणे भाग होते विचारविनिमयानतर मोहिमेचे दोन भाग करायचे ठरले स्पेक नाईल नदीच्या उगमाकडे निघाला आणि ग्रँटने ब्युन्योरोमधील कमरासीच्या दरबाराकडे जावे असे ठरले नाईल नदीचा उगम शोधण्याचे जे उद्दिष्ट होते ते दृष्टीपथात आले असता ग्रँटला मागे ठेवावे आणि त्यानेही खुषीने राहावे हे आश्चर्यकारक वाटते परतु ग्रँटने नतर कधीही याबद्दल तक्रार केली नाही स्पेकला उद्दिष्ट गाठायची घाई झाली होती अणि तो दररोज वीस मैल या वेगाने निघाला होता ग्रँट एका पायाने लंगडा झाल्यामुळे त्याला मागे ठेवले असावे. पण एकदरीत पाहता ग्रँटवर अन्यायच झाला असे म्हणावे लागते

स्पेक जलद गतीने नाईल नदीच्या काठी उरनडोगनी नावाच्या ठिकाणा-जवळ २१ जुलै १८६२ रोजी पोहोचला हे ठिकाण व्हिक्टोरिया सरोवरा-पासून ४० मैलावर होते स्पेक लिहितो, येथे मी नाईलच्या किनाऱ्यावर उभा होतो फारच सुदर देखावा होता तो । नदीचा प्रवाह सातशे ते आठशे यार्ड पसरलेला होता. आणि त्यात अधूनमधून बेटे डोकावत होती ' दोन्ही किनाऱ्यांवर उच गवत उगवले होते आणि नदीमध्ये सुसरी, पाणघोडे वगैरे प्राणी विपुल प्रमाणात होते स्पेकने भक्तिभावाने नदीत स्नान केले

नतर त्याचा जथ्था नदीच्या उगमाकडे चालू लागला आणि शेवटी स्पेकने ज्या दिवसाची वाट पाहिली होती तो दिवस २८ जुलै १८६२ रोजी उगवला ते एका टेकडीवर चढले तेव्हा सरोवरातून एक मोठा धबधबा

बाहेर पडताना त्याला दिसला अखेर त्यांच्या श्रमाचे सार्थक झाले होते स्पेकने या धबधब्याला 'रिपनचा धबधबा' असे नाव दिले रिपन हे रॉयल जिऑग्रॉफीकल सोसायटीचे त्यावेळचे अध्यक्ष होते

आता या संशोधकाचे ध्येय होते की येथून जिवंत बाहेर पडायचे आणि आपल्या या शोधाची माहिती लोकांना द्यायची परंतु त्यांच्या परतीच्या मार्गातही खूपच धोके होते. एका महिन्यानंतर ग्रँट त्यांना येऊन मिळाला आणि ते व्युनुयोरो प्रांतात कमरासी राजाकडे गेले. कमरासीने त्यांचे विशेष स्वागत केले नाही. मोहीम पुढे जाण्यापूर्वी स्पेकला आपले पन्नास पौंडाचे घड्याळ भेट म्हणून कमरासीला देणे भाग पडले.

ते व्युन्योरोत असतानाच जवळच पश्चिमेकडे आणखी एक सरोवर असल्याची बातमी त्यांना समजली. पण हे संशोधक इतके थकले होते व त्यांना घरी जायची घाई झाली होती म्हणून त्यांनी उत्तरेकडे मोर्चा वळविला निघण्यापूर्वी स्पेकने रॉयल जिऑग्रॉफिकल सोसायटीकडून आणखी एक संशोधक तुकडी दक्षिण सुदानमध्ये पाठविली होती. त्याच्याकडून ताजा पुरवठा आणि हमाल मिळण्याची शक्यता होती परंतु ठरलेल्या वेळापत्रका-पेक्षा स्पेकला एक वर्ष उशीर झाला होता

स्पेक आणि ग्रँट यांचा उत्तरेकडचा प्रवास फारच कंटाळवाणा झाला मशींडी खेड्याजवळ त्यांना पुन्हा नाईलचे दर्शन झाले त्यांनी होड्यांत बसून नाईल नदीतून जाण्याचा प्रयत्न केला पण दाट झुडुपामुळे त्यांना पुन जमिनीवरचा प्रवास करावा लागला ते जसेजसे उत्तरेकडे जात होते तसतसे तेथल्या स्थानिक रानटी टोळ्या जास्त असंस्कृत व मागासलेल्या दिसू लागल्या ते आदिवासी धनुष्यबाण वापरणारे व नग्न राहून अंग रंगवणारे होते युगाडातील संस्कृती आणि कला यांचा त्यांच्यात मागमूसही नव्हता

शेवटी ३ डिसेंबरला इजिप्तच्या एका लष्करी तुकडीशी त्यांची गाठ पडली दोन वर्षे रानटी टोळ्यांत काढल्यानंतर सुसंस्कृत लोकांशी त्यांची प्रथमच गाठ पडत होती इजिप्तचे हे सर्वांत दक्षिणेकडील फालोरा नावाचे ठाणे होते तेथील प्रमुख मोहमद वाड-अल मेक होता या दोन्ही संशो-धकांना नाईलकाठावरील गोंडोकोरो या इजिप्शियन ठाण्यावर

पोहोचवण्याच्या त्याला आज्ञा होत्या दोन वर्षांनी प्रथमच ग्रँट आणि स्पेक मऊ बिछान्यावर झोपले आणि त्याना उत्तम अन्न मिळाले. परतु साबण मिळाल्याबद्दल त्यांना सर्वांत जास्त आनद झाला।

तरीही स्पेक आणि ग्रँट यांच्या अडचणी सपल्या नव्हत्या मोहमद वाड-एल त्याच्याशी मित्रत्वाने वागत होता हे खरे पण गुलाम पकडण्याचा आणि हस्तिदत जमवण्याचा त्याचा जोडधदा होता। ती कामे झाल्यानतरच दहा जानेवारी १८६३ रोजी तो निघाला मोहिमेचे पुढारी बैलावर आणि गाढवावर बसलेले असत त्याच्या मागे हस्तिदत घेतलेले मजूर, पकडलेले गुलाम, गुरे बोकड वगैरेंचा थवा असे हा सर्व जमाव एक हजार लोकाचा झाला होता.

१३ फेब्रुवारी १८६३ ला स्पेक गोंडोकोरो पोहोचला स्पेकच्या मदती-साठी पाठविलेला पेथ्रिक तेथे नव्हता परतु एक अनपेक्षित सशोधक स्पेकला भेटला स्पेकचा जुना मित्र बेकर तेथे सशोधन मोहिमेवर आला होता स्पेकला २ वर्षे ५ महिन्यानतर भेटणारा तो पहिला इग्रज होता. स्पेकला या भेटीगाठीमुळे जो आनद झाला त्याचे काय वर्णन करावे ?

सॅम्युअल बेकर आपल्या पत्नीसह तेथे आला होता त्याशिवाय तीन ऑस्ट्रीयन मिशनरीही तेथे आले होते स्पेकला शेवटी आपल्या लोकांत येऊन पडल्यामुळे फार बरे वाटले बेकर लिहितो, 'त्या दोघात स्पेक जास्त थकलेला होता ग्रँटच्या कपडयाच्या चिंध्या झाल्या होत्या आणि विजार गुडघ्यावर फाटली होती ते दोघे थकलेले व आजारी दिसत होते. पण त्याच्या डोळ्यांत निश्चयाची चमक होती त्यामुळेच ते येथवर येऊ शकले.'

पण त्याच्या मदतीसाठी पाठविलेला पेथ्रिक कोठे होता ? जिऑग्रा-फिकल सोसायटीने त्याला हजार पौंड दिले होते मोहिमेला मदत करण्या-ऐवजी हस्तिदताचा व्यापार करायला तो दुसरीकडे गेला होता खरे म्हणजे पेथ्रिक खूप अडचणी सोसून त्याच्यासाठी वाट पाहत वर्षभर तेथे राहिला होता पण स्पेक त्याच्यावर भयकर भडकला आणि त्याच्या बायकोने क्षमा मागूनही त्याने पेथ्रिकची मदत स्वीकारली नाही स्पेक आणि ग्रँट बेकरने

पुरविलेल्या बोटीतून खार्टूमला गेले इंग्लंडला पोहोचल्यानंतर स्पेकने पेथिरकविरुद्ध गंभीर तक्रारी केल्या त्यामुळे पेथिरकला निलंबित करण्यात आले आणि त्याचे पुढचे आयुष्य कष्टात गेले.

स्पेकच्या मोहिमेतील एक हमाल मृत्यू पावला होता आणि १४३ पळून गेले होते शिल्लक राहिलेल्या २२ लोकांचा स्पेकने चांगला सन्मान केला ! त्याचे झांझिबारपर्यंतचे तिकीट काढून दिले आणि प्रत्येकाला तीन वर्षांचा पगार दिला झांझिबारला पोहोचल्यानंतरही त्या हमालांना आणखी बक्षिसे मिळाली. इंग्लंडला पोहोचण्यापूर्वी स्पेकने रॉयल जिऑग्रॉफिकल सोसायटीला नाईल नदीच्या उगमाचा शोध लागल्याबद्दल तार केली होती. या दोघांना आपले लंडनमध्ये जोरदार स्वागत होईल अशी आशा होती

पण नाईलच्या उगमाचा शोध लावल्याचे श्रेय स्पेकला सहजासहजी मिळणार नव्हते याबाबतीत त्याला अनेक प्रतिस्पर्धी आणि शत्रू निर्माण होणार होते !

★

प्रकरण पाचवे

## वादविवाद आणि आत्महत्या

आज अतराळ प्रवास, चद्रमोहीम याना जे महत्त्व आहे ते महत्त्व शभर वर्षांपूर्वी आफ्रिकेतील सशोधकाच्या मोहिमाना होते लोकांच्या मनावर फार मोठा परिणाम या मोहिमांचा होता चित्रपट नभोवाणी व दूरदर्शन नसल्यामुळे पाश्चात्य जनतेची मुख्य करमणूक या सशोधन मोहिमाच्या पुस्तकातून होत असे लिव्हिंग्स्टनच्या आफ्रिकेवरील पुस्तकांनी तर राजकीय धोरण बदलले.

सशोधकाची ही पुस्तके वैयक्तिक माहिती देणारी असत आणि प्रचारात्मक असत ती धार्मिक भावनेला आवाहन करीत आणि गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवीत. त्यामुळे ती फारच यशस्वी होत असत. सशोधकाला मिळणाऱ्या या यशामुळेच या क्षेत्रात मत्सर फार असत एकाने लावलेले शोध कसे चुकीचे आहेत हे दुसरा सिद्ध करू पाही रिचर्ड बर्टन, स्पेक, ग्रँट, पेथिरक याची अनेक पुस्तके १८६० ते १८७० या दरम्यान प्रसिद्ध झाली

स्पेक आणि बर्टन हे जरी एकत्र मोहिमेला गेले होते तरी नाईलचा उगम कोठे असावा याबाबत त्याचे मतभेद झाले मोहीम सपून स्पेक लडनला आधीच परतला आणि पुढील मोहीम त्याने स्वतःसाठी ठेवून घेतली याबद्दल बर्टनला फार राग आला आणि त्याने निरनिराळ्या लेखांत स्पेकविरुद्ध बरेच गरळ ओकले १८६३ मध्ये स्पेक आणि ग्रँट परत आल्यावर बर्टनने हा वाद पुन्हा उकरून काढला स्पेकने व्हिक्टोरिया सरोवराच्या दक्षिण आणि उत्तर बाजू जरी पाहिल्या होत्या तरी त्याने त्या सरोवराला प्रदक्षिणा घातली नव्हती बर्टनच्या मते ही अनेक सरोवरे असण्याचा सभव

इंग्लडमध्ये टर उडवायची प्रथाच होती !

होता कारण स्पेकचे म्हणणे मान्य केले तर व्हिक्टोरिया सरोवराचे क्षेत्र-फळ ३०,००० चौ मैल एवढे होते इतके मोठे गोड्या पाण्याचे सरोवर अस्तित्वात असणे शक्य आहे काय असा प्रश्न बर्टनने उपस्थित केला, खरे म्हणजे स्पेक आणि बर्टनने जे संशोधन केले होते त्यामध्ये अनेक प्रश्न सोडवायचे राहिले होते त्यासाठी आणखी संशोधन होणे आवश्यक होते या सर्व वादामध्ये आफ्रिकेतील महान संशोधक लिव्हिंग्स्टनही सामील झाला लिव्हिंग्स्टनच्या मते नाईलचा उगम व्हिक्टोरिया सरोवराच्या आणखी दक्षिणेला होता त्यामुळे त्यानेही बर्टनची बाजू घेतली. रॉयल जिऑग्राफि-कल सोसायटीमध्ये याबाबत बराच वाद माजला. आणि दोन्ही बाजू एक-मेकावर आरोप-प्रत्यारोप करू लागल्या.

एम क्वीन् नावाचा एक हुशार भूगोलशास्त्रज्ञ स्पेकच्या विरुद्ध गेला. पण त्याने कधीच प्रवास केला नव्हता एम क्वीनने स्पेकचा खोटेपणा सिद्ध करण्यासाठी त्याच्याच ग्रथातील उतारे दिले.

एका समीक्षकाने स्पेकने तेथील भूभागाना राजे-राण्याची आणि मोठ्या लोकाची नावे दिली त्यावरच आक्षेप घेतला— असल्या क्षूद्र प्रदेशाना मोठ्या लोकाची नावे ठेवून त्याचा अपमान केला आहे असे त्याने प्रतिपादन केले । एम् क्वीनने स्पेकचीच विधाने घेऊन असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की स्पेकचे म्हणणे मान्य केले तर नाईल नदी डोंगर चढून जात आहे असे सिद्ध होते ।

अशा तऱ्हेने स्पेकविरूद्ध बरेच वादळ उठले त्याने पुन्हा एकदा आफ्रि-केच्या मोहिमेवर जायचा बेत जाहीर केला तेव्हा त्याचा उपहास व चेष्टा झाली शिवाय इग्लडमध्ये त्यावेळी लोकाची टर उडवावयाची प्रथाच पडली होती । लोकाना त्यातच गमत वाटत असे त्यातून स्पेक म्हणजे हिंदुस्थानात गेलेल्या तरुण अधिकाऱ्यांपैकी एक होता. विश्वास बसू नये अशा हकीकती तो सागत होता त्यामुळे स्पेकविरुद्ध सशयाचे आणि टिंगलीचे वातावरण तयार झाले

शेवटी या वादाचा निकाल करण्यासाठी ब्रिटिश असोसिअेशन फॉर अॅडव्हान्समेंट ऑफ सायन्स या सस्थेने बाथ येथे १६ सप्टेंबर १८६४ रोजी

एक सभा घेण्याचे ठरविले या सभेला स्पेक, बर्टन आणि लिव्हिंग्स्टन यानी उपस्थित राहण्याचे मान्य केले होते त्याशिवाय नामवंत भूगोलशास्त्रज्ञ त्या सभेला हजर राहणार होते

स्पेकजवळ सभा गाजविण्याची कला नव्हती त्याने आपल्याविरुद्धच्या आरोपांना उत्तरे दिली नव्हती एम् क्वीनने आपल्या लेखात त्याची इतकी निंदा केली होती की त्याच्याविरुद्ध स्पेकला बदनामीची फिर्यादही करता आली असती ! पण तसे त्याने काहीच केले नाही ! त्याने आपल्या समर्थनाची तयारी केली होती आणि त्याच्याजवळ पुरेसा आत्मविश्वासही होता

बर्टननेही आपली बाजू मांडायची पूर्ण तयारी केली होती स्पेकबरोबर स्वत तो जेथे गेला होता. त्यामुळे बर्टनच्या प्रतिपादनाला विशेष महत्त्व होते

१६ सप्टेंबर १८६४ रोजी त्याचा हा वादविवाद बाथ येथे होणार होता त्यापूर्वी १५ सप्टेंबरला स्पेक आणि बर्टन भेटले त्यावेळी त्याचा खूप मोठा वादविवाद झाला त्यावेळी स्पेक आजारी दिसत होता आणि त्याला ऐकू येत नव्हते

१६ सप्टेंबरला बाथ येथील सार्वजनिक हॉलमध्ये बर्टन सर मर्चिसन आणि शेकडो प्राध्यापक आणि प्रेक्षक हा जाहीर वाद ऐकण्यासाठी जमले होते. काही लोक टिंगलीच्या स्वरांत म्हणत होते की आज येथे नाईलचे द्वंद्वयुद्ध खेळले जाणार आहे ! सर्वजण उत्सुकतेने स्पेकचीच वाट पहात होते

इतक्यात एक निरोप्या चिठ्ठी घेऊन आला त्यांत लिहिले होते, बंदूक चुकीने उडाल्यामुळे श्रीयुत स्पेक मरण पावले आहेत !' ही बातमी ऐकून बर्टन कोसळलाच ! तो उद्गारला, 'अरे देवा ! अखेर त्याने आत्महत्या केली ! वादाच्या ऐवजी त्या सभेमध्ये स्पेकच्या मृत्यूच्या दुखवटयाचा ठराव मांडण्यात आला

स्पेकने आत्महत्या केली की त्याचा मृत्यू अपघाताने झाला हे गूढ शेवट-

पर्यंत कायम राहिले त्याबाबत इंग्लंडमध्ये बराच काळ उलटसुलट वाद-विवाद चालू झाला शेवटी नाईल नदीच्या उगमाचे श्रेय स्पेकला देण्यात आले आणि तशी पाटी रिपन धबधब्याजवळ बसविण्यात आली आता रिपन धबधबा जलविद्युत योजनेसाठी बांधलेल्या धरणामध्ये बुडून गेला आहे आणि त्याबरोबरच स्पेकने नाईल नदीचा शोध लावल्याची ती पाटीही तेथील खोल गाळात रुतून बसली आहे !

★

प्रकरण सहावे

## बेकर आणि नाईल

नाईल नदीच्या उगमाचा प्रश्न, वाद निर्माण झाल्यामुळे लवकर मिटणारा नव्हता म्हणून सॅम्युअल बेकरच्या संशोधनाकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते बेकर व्यवहारी मनुष्य होता. त्याचे पाय जमिनीवर होते आपल्याला काय साधावयाचे आहे हे त्याला नक्की माहीत असे हाती घेतलेले काम नियतीनेच आपल्यावर सोपवले आहे असा त्याला आत्मविश्वास वाटत असे त्याच्या सवयी न बदलणाऱ्या होत्या तरी कोणत्याही परिस्थितीत तो निराश होत नसे. खरे म्हणजे बेकरचे व्यक्तिचित्र उभे करणे फार कठीण आहे. काही वेळा तो दिखाऊ, उतावळा, भावनाशील, आणि दृढनिश्चयी वाटतो तर काही वेळा त्याचे उलट वाटत असे बेकरचा जन्म १८२१ मध्ये झाला. त्याचे वडील श्रीमंत होते आणि त्याच्या मालकीची जहाजे होती तरुण वयापासूनच बेकरला शिकारीची आवड निर्माण झाली होती त्याचे शरीर कमावलेले होते आणि पहिल्यापासून त्याने दाढी ठेवलेली होती त्याचे शिक्षण जर्मनीत झाले आणि धर्मोपदेशकाच्या मुलीशी त्याने विवाह केला आयुष्यभर तो जगभर फिरतच राहिला सिलोनमध्ये त्याने चहाचे मळे लावले, तर मध्य युरोपमध्ये रेल्वे बांधणीचे व्यवस्थापन केले सिलोनमध्ये त्याने हत्तीची शिकार केली हिंदुस्थानात त्याने वाघ मारले आणि मध्ययुरोपात अस्वलांच्या शिकारी केल्या आणि १८६३ मध्ये आफ्रिकेतील सुदान प्रांतात आपल्या दुसऱ्या तरुण पत्नीसह तो शिकारीच्याच हेतूने आला होता शिकारीबरोबर जमल्यास संशोधनही करावे असा हेतू त्याच्या

मनात होताच म्हणून तो शिकार करता करता नाईल नदीतून उगमाकडे निघाला होता

एखादी गोष्ट करायची ठरवली म्हणजे तो सर्व आखणी चिकित्सक बुद्धीने व साक्षेपाने करीत असे. त्याप्रमाणे त्याने प्रथम एक वर्ष सुदानमध्ये घालवायचे ठरविले. नाईलच्या उपनद्या शोधत तो फिरला आणि त्याबरोबर अरबी भाषाही शिकला. त्याने लंडनहून उत्तम तोफा व बंदुका मागवल्या उत्तम दर्जाची शास्त्रीय उपकरणे व इतर सामुग्री मागवली. पैशाची त्याच्याकडे ददात नव्हती त्याने कुठल्याही सोसायटयांची किंवा शासनाची मदत घेतली नव्हती तेव्हा आपल्याला हवा तसा निर्णय घ्यायला तो स्वतंत्र होता तरीही त्याच्या इतका व्यवस्थित संशोधक आफ्रिकेत अजून गेला नव्हता. एक वर्ष सुदानमध्ये हिंडून तो खार्टूममध्ये पोहचला तेव्हा त्याला आरबी भाषा उत्तम येऊ लागली होती आणि त्याने मनोसोक्त शिकार केली



**बेकर दांपत्य**

होती खार्टूममध्ये तेव्हा पेट्रिक ब्रिटिश वकील होता त्याच्या निमंत्रणावरून बेकर सपत्नीक खार्टूमला गेला.

१८६० मध्ये खार्टूमच्या वसाहतीस ४० वर्षं झाली होती. झांझीबार

प्रमाणेच खार्टूमसुद्धा हस्तिदताच्या आणि गुलामांच्या व्यापाराचे केंद्र बनले होते मध्य आफ्रिकेतून गुलाम आणि हस्तिदत घेऊन नाईलच्या काठाने व्यापाऱ्याचे तांडे येत सुदान इजिप्तचा प्रांत होता पण ते नावापुरतेच होते तेथे मुसा-पाशा नावाचा इजिप्तचा राज्यपाल होता. तो आणि इतर सर्व अधिकारी कोणत्या न कोणत्या प्रकारे गुलामाच्या व्यापाऱ्यांशी सबधित होते खार्टूम येथे पधरा हजारांची फौज होती नवीनच जिंकलेल्या प्रदेशा-वर ज्या तऱ्हेने सैनिकी शासन असते तसे हे शासन होते. पण यात जास्त क्रूरता व बजबजपूरी होती. त्यांचे मुख्य काम धान्याच्या किंवा गुरांच्या रुपात सक्तीने कर वसूल करण्याचे होते.

बेकरचे खार्टूमबद्दल प्रथमदर्शनीच फार वाईट मत झाले. तो लिहितो, 'इतके घाणेरडे, रोगट ठिकाण जगाच्या पाठीवर असेल याची कल्पनाही करता येत नाही !' नाईल नदीपलीकडे विस्तीर्ण पसरलेले वाळवट होते. आणि नदीला चिकटून तीस हजार लोक दाटीवाटीने राहत होते नाईलचे पुराचे पाणी अनेकदा झोपड्यात भरून राहत असे मृत प्राणी रस्त्यात तसेच पडून राहत आणि त्याची दुर्गंधी सगळीकडे पसरे. नदीतून रहाट-गाडग्याने उपसले जाणारे गढुळ पाणी हाच एकमेव पाणी पुरवठा होता प्रत्येक रहाटगाडग्यावर कर बसवलेला असे शहरामध्ये कुठलेही काम लाच दिल्याशिवाय होत नसे. तुरुगामध्ये कैद्याचे हाल करणे आणि त्याना फटके मारणे हे नित्याचेच होते. मुसा पाशा पशूहूनही क्रूर होता. वर्षातून सर्व दिवस भयकर उकाडा होत असे. उन्हाळ्याच्या दिवसांत वाळूचे वादळ होत असे व त्यावेळी सर्व आकाश वाळूकणानी भरून दिवसा अधार पडत असे

तरीही त्याकाळी खार्टूमचे स्थान महत्वपूर्ण होते सस्कृतीचा तो शेवटचा टप्पा होता तेथून दक्षिणेकडे अज्ञात प्रदेश पसरला होता त्या अज्ञात प्रदेशात काय गुढ भरले आहे या बद्दल काहीच माहिती नव्हती ! दक्षिणे-कडे जाणारा प्रत्येक तांडा म्हणजे संशोधन मोहीम होती नाईलवरून येणारी प्रत्येक बोट तेथील अज्ञातप्रदेशासबधी सुरस आणि चमत्कारिक बातम्या घेऊन येत असे. तऱ्हेतऱ्हेच्या वनस्पती आणि किडे, औषधे आणि अत्तरे त्या

बोटी बरोबर आणत हस्तिदताचा व्यापारच दरवर्षी चाळीस हजार पौंडाचा किंवा आठ लाख रुपयांचा होत असे

खार्टूमची लोकवस्ती सम्मिश्र होती. तेथे ग्रीक, आर्मेनीयन, अरब आणि इजिप्शिअन व्यापारी आणि सैनिक होते या सर्वांनी अबिसिनीयातील तरुण मुलींशी विवाह केला होता तीस युरोपियन लोक राहत होते आणि त्याचा जीवनक्रम तसा बरा चालला होता.

दर महिन्याला उटाच्या ताफ्याबरोबर त्याना बाहेरची पत्रे, आणि बिस्किटे, दारू, साबण वगैरे जरूरीचे सामान मिळत असे स्थानिक तुर्की आणि इजिप्शिअन सरकारी अधिकारी युरोपियनांना मेजवान्या देत मेजवानीच्या शेवटी अबिसिनियन मुलींचा नाच असेच

खार्टूम गुलामांच्या व्यापारावरच जगत असे एखाद्या धाडसी पुरुषाला तेथे नशीब काढता येत असे. त्याच्याजवळ पैसा नसेल तर ऐंशी टक्के व्याजाने तो त्याला सहज मिळत असे । सामान्यपणे गुलाम पकडणारा व्यापारी दोनशे तीनशे सशस्त्र लोक घेऊन नाईल नदीतून दक्षिणेकडे निघत असे. एखाद्या सोयीस्कर ठिकाणी उतरून तो स्थानिक टोळी प्रमुखाशी समझोता व करार करत असे नतर स्थानिक टोळीप्रमुख आणि हे गुलाम पकडणारे व्यापारी रात्रीच्या वेळी एखाद्या खेड्यावर छापा घालत पहाटे-पूर्वी ते झोपड्यांना आगी लावून देत आणि त्या आगीच्या उजेडात गोळीबार करत त्यांना मुख्यत स्त्रिया हव्या असत. त्याना पकडल्यावर गलोलीच्या टोकाप्रमाणे टोके असलेल्या लाकडात त्यांची मान अडकवत आणि काठीच्या पुढच्या भागाला त्यांचे हात बांधून टाकत मुलाच्या गळ्यांना साखळ्या अडकवत आणि त्या साखळ्यांनी त्या मुलाना त्यांच्या आयांच्या मानेशी बाधत खेडेगावातील सर्व वस्तू लुटत गुरे, हस्तिदत, धान्य हे लुटतच शिवाय मेलेल्यांच्या अगावरून ओबडधोबड दागिनेही कापून नेत !

मग हा सव थवा नाईल नदीकडे जहाजात भरण्यासाठी हाकलत नेला जाई. पकडलेली गुरे देऊन त्याच्या बदल्यात व्यापारी हस्तिदंत खरेदी करत असत. भरपूर हस्तिदत देऊ केल्यास त्याच्या बदली तो गुलामालाही

सोडायला तयार होई काही वेळा हे व्यापारी मदतीला घेतलेल्या स्थानिक टोळीवर उलटत आणि त्यांनाच गुलाम म्हणून पकडून नेत असत ! परंतु बहुसंख्य व्यापारी स्थानिक टोळीच्या प्रमुखाशी केलेले करार वर्षानुवर्ष चालवत आणि पाळत. गुलामांचा व्यापारी खार्टूममध्ये हस्तिदंत आणि गुलाम विकून पुन्हा परत येईपर्यंत स्थानिक टोळीप्रमुख हस्तिदंताचा आणि गुलामांचा 'ताजा माल' जमा करून ठेवत प्रत्येक व्यापाऱ्याचे कार्यक्षेत्र ठरलेले असे. आणि खार्टूमपासून गोंडोकोरोपर्यंत त्यांनी सर्व प्रदेश परस्पर समतीने जणू वाटून घेतला होता

धंदा चांगला झाला तर एकेक व्यापारी वीस हजार पौंड हस्तिदंत आणि चारशे ते पाचशे गुलाम विकत असे. एका गुलामाची किंमत शभर ते सोळाशे रुपये घेत असत या मिळकतीतून तो आपले कर्ज भागवी आणि पुन्हा नव्या मोहिमेवर निघे गुलामाच्या व्यापारावर अधिकृतरीत्या बंदी होती म्हणून खार्टूम शहराबाहेर त्यांची विक्री होई आणि मग त्याची रवानगी उंटाच्या तांड्याबरोबर तांबड्या समुद्राकडे किंवा कैरोकडे केली जाई

इतिहासामध्ये इतका क्रूर आणि राक्षसी गुलामाचा व्यापार दुसरा नव्हता टांगानिकापेक्षा हा येथील व्यापार जास्त संघटित होता बेकरने गुलामांच्या व्यापारासबंधी भयंकर हकीकती विलक्षण अलिप्तपणे लिहून ठेवल्या आहेत गुलामाची तावडतोब मुक्तता करून काही साधेल असे त्याला वाटत नसे गुलामाना मुक्त करून सुद्धा त्यांना स्वतंत्र करणाऱ्याबद्दल कृतज्ञता वाटत नसे ! आफ्रिकन निग्रो गोऱ्यांची कधीच बरोबरी करू शकणार नाहीत असे त्याचे मत होते

आफ्रिकन लोकाच्या रानटीपणाबद्दल आणि त्याच्या पाशवी रूढीबद्दल बेकरने चिडून लिहिले आहे. तो लिहितो, 'आमच्या इंग्रज मानवतवाद्यांना असे वाटते की, हे गरीब आफ्रिकन काळे लोक म्हणजे निसर्गाची निरागस अपत्ये आहेत ! मला एका टोळीतील मनुष्याने त्याच्या बायकोची पाठ आणि हात दाखवले एखाद्या जनावराला जसे डागावे तसे तिला सर्वत्र डागले होते ! आणि हे तो कौतुकाने सांगत होता ! या राक्षसी लोकांना

प्रेम म्हणजे काय हे माहीत नाही टोळीतला मनुष्य जितका श्रीमंत असेल त्या प्रमाणात त्याला बायका असतात त्याच्या दृष्टीने स्त्रिया म्हणजे किंमती जनावरेच ।'

आफ्रिकन निग्रोबद्दल बेकरची अशी कठोर मते असल्याने त्याच्यावर पुढे इग्लंडमध्ये टीका झालीच परंतु गुलामगिरी नष्ट करण्यासाठी आफ्रिकेत त्या काळात तरी जास्तीत जास्त प्रयत्न करणारा आणि व्यवहारी मार्ग वापरणारा बेकरच होता हे मान्य केले पाहिजे पण ही सर्व पुढची घडामोड झाली सध्या खार्टूमच्या दक्षिणेकडे गुलाम पकडणाऱ्या टोळ्यांनी इतका हैदोस घातला होता की सशस्त्र तुकडी घेतल्याशिवाय कोणीही त्या भागात जाणे धोक्याचे होते शिवाय खार्टूममधील इजिप्तच्या अधिकाऱ्यांना तिऱ्हाईत मनुष्याला तेथे जाऊ देणे आवडणारे नव्हते कारण गुलामाच्या व्यापारातील त्याचा सहभाग त्यामुळे बाहेरच्या जगाला समजणार होता मुसापाशाने बेकरला अडवण्याचे सर्व प्रयत्न केले परंतु त्याचा विरोध डावलून बेकर निघालाच रॉयल जिऑग्रॉफिकल सोसायटीने स्पेक आणि ग्रॅन्ट यांचा शोध घ्यायला पेथ्रिकला पाठवले होते तो मृत्यू पावल्याची बातमी आली होती म्हणून सोसायटीने ही कामगिरी बेकरवर सोपवली बेकरने ती स्वीकारली आणि स्पेक व ग्रॅन्ड मरण पावलेले आढळले तर नाईल नदीच्या उगमाचा शोध घेण्याची कामगिरी आपण करावयाची असे त्याने मनाशी ठरवले.

खार्टूममध्ये सहा महिने राहून त्याने शहाण्णव माणसे व तीन बोटी गोळा केल्या त्यांना गणवेश दिले आणि हत्यारबंद बनवले. चार महिने पुरेल इतकी शिधासामुग्री, एकवीस गाढवे, चार उंट व चार घोडे बरोबर घेतले सुदानमध्ये त्याला जर्मन प्रवासी जोहान्स स्मिट भेटला होता. त्यालाही बरोबर घेतले आणि ते अठरा डिसेंबर १८६२ रोजी नाईल नदीतून दक्षिणेकडे निघाले

खार्टूमच्या दक्षिणेकडे नाईल नदीचा प्रवाह वेगवेगळ्या प्रकारचा आहे, पहिले पाचशे मैल तो बराचसा नियमित असून नदीच्या दोन्ही किनाऱ्यावर विस्तीर्ण वाळवंटे पसरली आहेत नंतर अबेसिनियन पर्वतातून येणाऱ्या सोबात


नदीशी संगम झाल्यावर मलाकाल शहराजवळ नाईल पश्चिमेकडे वळते आणि देखावा बदलतो हवा दमट होते. आणि दोन्ही काठांवर हिरवळ दिसू लागते. आणि तेथून पुढे सुद-गवतांनी भरलेली दलदल सुरू होते. नाईल म्हणजे पापीरस आणि सुद-गवतांनी भरलेला एक प्रचंड समुद्रच होतो उष्ण हवामानातील तेथील पशू-पक्ष्यांचे राज्य जणू जगाच्या सुरुवातीपासून अबाधित राहिले आहे. चिखलाने भरलेल्या पाण्यात सुसरी आणि पाणघोडे मधूनच डोके वर काढतात आणि हवेत सर्वत्र डास आणि कीटक भरलेले असतात. बगळ्यासारखे पाण्याजवळ वाढणारे अनेक पक्षी किनाऱ्यावर उभे असतात. किनारा असा नसतोच मधून मधून तयार झालेल्या बेटावर हिरवीगार झुडपे वाढलेली असतात त्यांनाच किनारा म्हणावयाचे ! अशी ही बेटे दृष्टी पोहचेल तिथपर्यंत पसरलेली दिसतात हा सर्व प्रदेश म्हणजे जमीनही नाही आणि पाणीही नाही असा दलदलीचा आहे पाण्याबरोबर दरवर्षी माती आणि वनस्पती वाहत येते आणि त्यांची बेटे बनतात. ही बेटे दरवर्षी आपली जागा बदलतात. आणि तेथील देखावा अशा हजारो प्रकारच्या बेटांमुळे नेहमी नवीनच दर्शन घडवत असतो

बेकर लिहितो, 'नाईलच्या या वरच्या भागात कुठल्याच संस्कृतीचे अवशेष नाहीत, किंवा स्फुर्ती देईल असा इतिहास नाही. हा सर्व भाग उजाड आणि रानटी आहे. लक्षात ठेवावे असे येथे काहीही नाही.' दक्षिण सुदानमध्ये जाणाऱ्या सर्वच गोऱ्या लोकांचा हा अनुभव होता. या विस्तीर्ण प्रदेशात मानवी संस्कृतीची काहीच प्रगती झालेली नव्हती. ऑस्ट्रेलिया खंडासारखाच हा उजाड प्रदेश होता. सुदच्या दलदलीमध्ये तर मानव कधी राहिला असलेल्याच्या खुणा दिसत नव्हत्या. कीटक आणि पशू-पक्षी भरपूर होते पण कोणीही माणूस या दलदलीच्या बेटावर राहिला असता तर अन्नाच्या अभावामुळे त्याचा भूकबळी पडला असता नाईलचा हा दलदलीचा प्रदेश पावसाळ्यामध्ये महाराष्ट्राएवढ्या भूभागावर पसरत असे. या दलदलीतून नदीचे मुख्य तीन प्रवाह वाहत असत. पण वाहून येणाऱ्या गवतामुळे ते कधी बंद होतील याचा नेम नसतो. मलाकालच्या दक्षिणेला साठ मैलांवर जिराफाची नदी सुरू होत असे. आणि पन्नास मैल गेल्यानंतर त्यात-

त्यात्यात स्वच्छ पाणी असल्याने 'नो' या सरोवरापर्यंत जाता येत असे या सरोवरापासून दोन फाटे फुटत असत त्यांपैकी बार एल् जेबेल हा प्रवाह दक्षिणेकडे जात असे व अरब व्हापारी तोच मार्ग वापरत नो सरोवराच्या दक्षिणेला पाचशे मैल गेल्यावर सर्व दलदल आणि गवत सपत असे तेथेच गोंडोकोरी वसलेले होते वारा अनुकूल असेल तर खार्टूमपासून गोंडोकोरीपर्यंत पोचायला दीड महिना लागत असे

गोंडोकोरोच्या पुढे नाईल नदीतून जाणे अशक्य असे कारण पुढे दर आठ-दहा मैलांत लहान मोठा धबधबा होताच. म्हणून अज्ञात प्रदेशाच्या हद्दीवरचे गाव म्हणून गोंडोकोरोला महत्त्व आले होते

पण गोंडोकोरो म्हणजे नाईल नदीच्या पूर्व किनाऱ्यावरील झोपड्यांचा लहानसा थवा होता. या ठाण्याची स्थापना १८४० मध्ये झाली होती आणि




बेकरचा प्रवास

१८५१ मध्ये तेथे ऑस्ट्रियन रोमन कॅथलिक मिशनची स्थापना झाली होती. पण या मिशनची दुर्दशाच होती ! तेथे पाठवलेल्या वीस मिशनऱ्यांपैकी पंधरा मिशनरी मेले ! आणि तेथील स्थानिक लोकांपैकी एकाचेही धर्मांतर त्यांना करता आले नाही गोंडोकोरोच्या दक्षिणेस कोणतीही गुलाम पकड-णारी टोळी किंवा हस्तिदंताचे व्यापारी जात नसत. तेथील रानटी टोळ्यांचा प्रखर विरोध असे आणि परतण्याचा मार्गही फार लांबचा होई. स्पेकला भेटलेला वाड-एल-मेक किंवा आंद्रे डी बोनो हा प्रवासी या सारखे थोडे लोक सोडले तर कोणीही गोंडोकोरोच्या दक्षिणेकडे गेलेले नव्हते, आणि हा सर्व अज्ञात प्रदेश होता या प्रदेशात स्पेक आणि ग्रँटचा शोध घेण्यासाठी बेकर आत घुसणार होता

त्यावर्षी दलदलीत गवत फारसे माजलेले नव्हते त्यामुळे बेकरचा बोटींचा ताफा खार्टूमपासून गोंडोकोरोपर्यंतचा हजार मैलांचा प्रवास चाळीस दिवसात करू शकला प्रवासामध्येच जोहान्स स्मीट मरण पावला आणि खूप लोक आजारी पडले गुरांना आणि माणसांना डासांचा त्रास फारच झाला बेकर लिहितो, ' गोंडोकोरो म्हणजे शुद्ध नरक होता महाग व्यापारी आणि त्यांचे नोकर हे नेहमी दारू पिऊन भांडणे करत आणि बंदुकीच्या फैरी हवेमध्ये उगीचच झाडत.'

बेकर तेथे पंधरा दिवस होता याचवेळी बुन्योरोहून आलेले स्पेक आणि ग्रँट त्याला भेटले बेकर लिहितो, ' मला वाटले की माझी ही मोहीम येथेच संपली पण स्पेक आणि ग्रँट यांनी उदारपणे मला मार्गाची माहिती व नकाशा दिला तसेच व्हिक्टोरिया सरोवराच्या पलीकडे पश्चिमेला आणखी एक मोठे सरोवर असून त्याचा शोध घ्यायचा राहिला आहे असे सांगितले.

काही दिवसानंतर स्पेक आणि ग्रँट खार्टूमकडे गेले आणि बेकर पतिपत्नी पश्चिमेकडच्या अज्ञात सरोवराच्या दिशेने निघाले

आपल्या या फिरस्तीची हकीकत बेकरने ' अल्बर्ट न्यांझा, ग्रेट बेसीन ऑफ द नाईल ' या पुस्तकात लिहून ठेवली आहे हे पुस्तक संशोधकांच्या अशा प्रकारच्या सर्व पुस्तकात वाचनीय आहे आफ्रिकेतील साहसांबद्दल आजपर्यंत जितक्या कथा लिहिल्या गेल्या आहेत त्या सगळ्यांचा मसाला

या पुस्तकात ठेचून भरलेला आहे या सर्व जंगलप्रवासात बेकरची तरुण आणि सुंदर पत्नी प्रत्येक साहस अनुभवायला त्याच्याबरोबर होती. त्याच्यावर हिंस्त्र पशू हल्ला करत आणि बेकर अचूक नेम धरून त्यांना ठार मारे मोहीमेच्या सुरुवातीलाच त्याच्या जथ्यातील लोकांनी बंड केले आणि त्याच्या पुढाऱ्याला कमरेच्या पट्ट्याने झोडपून बेकरने ते शमवले ! पुढे गेल्यानंतर ओझी वाहणारी गुरे मरून गेली आणि त्यांना बैलावर स्वार व्हावे लागले त्यांचा अन्नपुरवठा संपला आणि त्याना झाडपाला खाऊन राहावे लागले आजारपणामुळे कित्येक आठवडे वाया गेले लबाड वाटा-ड्यानी त्यांना भलत्याच रस्त्याला नेले पाणघोड्यानी त्याच्या होड्या उलटवून टाकल्या गुलाम पकडणाऱ्या टोळ्यानी त्याना फसवले रानटी टोळ्यांनी त्यांच्यावर विष लावलेल्या बाणांनी हल्ला केला रानटी टोळ्यांनी युद्धासाठी वाजवलेले पडघम त्याना नेहमीच ऐकू येत असत अशी एक का दोन, अनंत संकटे त्याच्यावर नित्य कोसळत होती या सर्व रोमांचकारी प्रसंगामध्ये सौ बेकर कधीही घाबरली नाही या सर्वांना पुरून उरण्या-इतके धैर्य तिच्यात होते रात्रीच्या वेळी ते झोपडीत झोपले असता झोपडी-कडे येणारा पावलाचा आवाज जर तिने ऐकला तर ती गप्प राहून बेकरची बाही ओढत असे मग बेकर जागा होऊन आपले पिस्तूल सावरत असे• दवामुळे तिचे कपडे जेव्हा वाळत नसत तेव्हा तिला पुरुषाचा पोषाख घालण्यामध्ये लाज वाटत नसे

गोंडोकोरोच्या आग्नेयेला ते नऊ महिने भटकले परंतु हमाल नसल्याने त्याना पुढ जाता येईना त्याना व्युन्योरोचा राजा कमरासीकडे जायचे होते पण कमरासी आपला भाऊ रायनगाबरोबरच्या युद्धात गुतला होता. त्यामुळे त्यांना व्युन्योरोकडे जाता आले नाही यावेळी ते पश्चिमेकडच्या अज्ञात सरोवरापासून पधरा दिवसाच्या प्रवासी अतरावर होते स्थानिक आफ्रिकन आदिवासींना हा गोरा मनुष्य सरोवराकडे कशासाठी जातो आहे हेच समजत नसे ! बेकर एकदा कोमोरो नावाच्या टोळी प्रमुखाबरोबर राहिला होता त्याने बेकरला विचारले, समजा, तू त्या सरोवरावर पोहचलास तर तू त्याचे काय करणार ? त्याचा तुला काही उपयोग आहे का ? समजा

त्याच्यातून तुला एक नदी वाहताना दिसली, ठीक आहे. पुढे काय ? तू ती घरी का घेऊन जाणार आहेस !'

कोमोरो तसा हुषार मनुष्य होता जीवनाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टीकोन एकांतिक आणि निराशवादी होता तो एकदा बेकरला म्हणाला, 'बहुतेक सर्व लोक वाईट असतात. त्यांच्यात सामर्थ्य असेल तेव्हा ते अशक्तांना लुबाडतात. जितके चांगले लोक आहेत ते सर्व सामर्थ्यहीन असतात. ते चांगले असतात, कारण वाईट होण्याइतके सामर्थ्य त्यांच्यात नसते !'

अनेक महिने वणवण भटकल्याने आता मात्र बेकर वैतागला होता दोघांना मलेरिया झाला होता आणि अनेकदा सौ बेकरला डोलीतून न्यावे लागले शेवटी एका अरब व्यापाऱ्याच्या संगतीने करुमा धबधब्याजवळ ते नाईलच्या काठी पोहचले येथून बन्योरो राज्याची सरहद्द सुरू होत होती. कमरासीच्या टोळीवाल्यांनी नदीच्या पलीकडच्या तीरावरून त्याच्याकडे विचारणा केली तेव्हा बेकरच्या दुभाष्याने सांगितले की, स्पेकचा भाऊ आला आहे आणि त्याने कमरासीसाठी खूप मोठा नजराणा आणला आहे । ते होडयात बसून बेकरकडे आले. पण गुलाम पकडण्याचा हा छापा असावा म्हणून भीतीने होडयातून उतरले नाहीत

बेकरने या प्रसंगाचे वर्णन असे केले आहे, ' होडीतील एक प्रमुख ओरडून म्हणाला, 'आम्हाला त्याला पाहायचे आहे.' म्हणून मी कपडे बदलले आणि स्पेकने घातले होते तसे कपडे घालून तेथील एका कडयावर उभा राहिलो आणि पलीकडच्या तीरावरील लोकांना उद्देशून माझी हॅट हातात घेऊन हलवू लागलो. मी एखाद्या चौकात उभारलेल्या पुतळ्याप्रमाणे दिसत असलो पाहिजे । माझ्या दाढीमुळे स्पेकशी असलेले साम्य त्यांना जाणवले असेल माझे स्वागत करण्यासाठी भाला आणि ढाली घेऊन त्यांनी नृत्य सुरू केले आपला आनंद व्यक्त करण्यासाठी ते त्यांची गाणी ओरडत होते !'

बेकरच्या जथ्थ्यात एकशेदहा माणसे होती. त्या सर्वांना नदी ओलांडायची परवानगी देण्यात आली तेथील आदिवासी निग्रोमध्ये सौ बेकरमुळे

फारच खळबळ माजली तिने याचवेळी आपले केस धुवायचे ठरवले कमरे-पर्यंत पोहोचणारे आपले सोनेरी केस ती धूत असताना तिच्याभोवती आश्चर्यचकित झालेले आदिवासी निग्रो कोंडाळे करून उभे होते । स्थानिक टोळीप्रमुखानी वरीच घासाघीस करून त्यांना कमरासीच्या राजधानीकडे पोचवण्याचे कबूल केले ते दहा दिवसात तेथे पोहचले या काळात बेकर फार आजारी पडला होता त्याला झोळीत घालूनच राजाकडे नेले आणि राजाच्या पायाजवळ ठेवले

राजा कमरासी तांब्याच्या स्टूलावर बसला होता आणि जमिनीवर चित्त्याची कातडी अंथरली होती. त्याला भीती वाटत होती की आपला शत्रू रायनगा यानेच या गोऱ्या माणसाला पाठवले असावे. पण हा स्पेक सारखाच दरिद्री प्रवासी आहे आणि वाईट होण्याइतके त्याचे सामर्थ्य नाही हे समजल्याने तो बेकरशी नीट वागू लागला । आणि त्याच्याकडून देणग्या कशा उटपता येतील याचे बेत करू लागला

बेकरला हा सर्व काळ फार वाईट गेला. त्याला मलेरियाने चांगलेच पछाडले होते आणि त्याच्या जवळचे सर्व क्विनाईन संपले होते. आपल्याला वाटाड्या आणि हमाल पुरवण्याबद्दल त्याने कमरासीला अनेकदा विनवले. पण कमरासी त्याच्याकडे आणखी देणग्याची मागणी करतच राहिला.

शेवटी फेब्रुवारी १८६४ मध्ये कमरासीने बेकरला संशोधन मोहीमेवर निघण्याची परवानगी दिली. पण एका अटीवर सौ बेकरने कमरासीजवळ मागे राहावे । तिच्याबदली एक तरुण कुमारिका बेकरला देण्यात येईल । ही अट ऐकल्यावर बेकरने पिस्तूल काढले आणि ते कमरासीच्या छातीला लावून त्याला ठार करण्याची धमकी दिली । इतक्यात सौ बेकरही आपल्या बिछान्यातून उठून तेथे आली आणि संतापाच्या भरात तिने राजाला खूप शिव्या दिल्या । तेव्हा कोठे कमरासीने माघार घेतली आणि त्यांना जाण्याची परवानगी दिली

दुसऱ्या दिवशी हमाल जमले आणि हा जथा आपल्या मोहिमेवर निघाला सुरुवातीलाच काफू नदी त्यांना आडवी आली तेथे दलदल पसरली होती आणि तेथून एखाद्या जनावरावर स्वार होऊन जाणे अशक्य होते. बेकर

लिहितो, ' त्या घोक्याच्या पृष्ठभागावरून मी पायी जायचे ठरविले आणि सौ बेकरला माझ्यामागे यायला सांगितले. नदी ऐंशी यार्ड रुंद होती मी ३/४ अंतर गेल्यावर मागे वळून पाहिले तो सौ बेकर एकाच जागी उभी होती आणि दलदलीत व झुडपांत हळूहळू खाली जात होती ! तिचा चेहरा वाकडातिकडा झाला होता आणि भीतीने निळा पडला होता ! मी तिच्याजवळ पोचायच्या आतच गोळी लागून कोसळावी तशी ती खाली कोसळली माझ्या आठ-दहा माणसांच्या सहाय्याने एखादे प्रेत ओढून काढावे तसे आम्ही तिला ओढून काढली ! आम्हीही कंबरभर दलदलीत घुसलो होतो आम्ही कसे तरी तिचे डोके पाण्याबाहेर ठेवले आणि कष्टानेच किनाऱ्यावर आलो मी तिला झाडाखाली ठेवून ती शुद्धीवर यावी म्हणून तिच्या डोक्यावर व तोंडावर पाणी मारले. पण जणू मृत्यू पावल्याप्रमाणे तिच्या संवेदना नष्ट झाल्या होत्या तिचे दात आणि हाताच्या मुठी आवळलेल्या होत्या आणि डोळे उघडे होते पण अगदी स्थिर होते '

नदीकाठी अन्न मिळण्यासारखे नव्हते म्हणून बेकर बेशुद्ध झालेल्या सौ बेकरला डोलीत घालून दोन दिवस चालतच राहिला तिसऱ्या दिवशी सकाळी सौ बेकर शुद्धीवर आली पण ती आता वात झाल्यामुळे बरळू लागली एक आठवडा बेकर रात्रंदिवस तिच्याजवळ बसला तिच्यासाठी थोडा मध व पक्ष्याचे मांस मिळवले पाऊस सारखा कोसळतच होता या सर्व श्रमामुळे बेकर शेवटी थकला व बेशुद्ध पडला ! त्याला जाग आली तेव्हा सौ बेकरचा वात थांबला असून ती त्याला ओळखू लागली आहे असे दिसले दोन दिवस विश्रांती घेऊन त्यांनी आपली मोहीम काफू नदीच्या काठाने सुरू केली १३ मार्चला ते विषुववृत्तापासून पचवीस मैलांवर आले त्या दिवशी वाटाड्याने सांगितले की आपण उद्या त अज्ञात सरोवर पाहू शकू

बेकर लिहितो, ' त्या रात्री मला झोप आली नाही नाईल नदीच्या उगमाकडे जाण्याच्या ईर्ष्येने मी कित्येक वर्षे झगडलो होतो मला रात्रीच्या स्वप्नात नेहमी अपयश आलेलेच दिसत असे पण आता इतके कष्ट केल्या-

नंतर यशाचा प्याला माझ्या ओठाजवळ आला होता उद्याचा सूर्य मावळण्या-पूर्वी माझे संशोधन पूर्ण होणार होते '

'१४ मार्च सूर्योदयापूर्वीच बैलावर बसून वाटाड्याबरोबर मी मागोमाग लागलो होतो सरोवराजवळ पोचल्याबरोबर त्याला दोन मुठी भरून मणी देण्याचे मी कबूल केले होते. म्हणून तो उत्साहाने जात होता सकाळ झाली व सर्वत्र सूर्यप्रकाश पसरला. आम्ही एक नदी ओलांडून पलीकडच्या टेकडीच्या माथ्याकडे धावतच गेलो आणि पाहतो तो काय ! समोर एक अथांग जलाशय पाण्याच्या समुद्राप्रमाणे पसरला होता ! दक्षिणेकडे आणि नैऋत्येकडे सरोवराचा किनारा दिसतच नव्हता ! दुपारच्या उन्हात पाणी चमकत होते पश्चिमेकडे पन्नाससाठ मैलावर सरोवराच्या कुशीतून निळी पर्वतशिखरे वर आली होती. ती शिखरे सरोवराच्या पातळीपासून सात हजार फूट उंच असावीत '

सर्वोच्च यश मिळविल्यानंतर आनंदोत्सव कसा साजरा करायचा याच्या योजना आपण अनेकदा आधी करून ठेवतो. पण प्रत्यक्ष ती वेळ आल्यानंतर निराळेच घडते बेकरनेही सरोवर दिसल्यावर काय करायचे, कसे ओरडायचे हे ठरवले होते पण त्यावेळी भावनेच्या उद्रेकामुळे तो एकदम गप्पच झाला ! नंतर ते दोघे बैलावरून उतरले आणि सरोवराच्या काठाकडे जाऊ लागले

बेकर लिहितो, 'मी एक बांबूची काठी हातात घेतली आणि खाली उतरू लागलो माझी पत्नीही माझ्या खांद्याच्या आधाराने येत होती अनेक दिवसांच्या आजारामुळे आमची शरीरे कृश झाली होती पण या यशामुळे आमच्या अंगात तात्पुरती ताकद आली होती डोंगराचा उतार उतरून यायला आम्हाला दोन तास लागले. त्यानंतर एक मैलाच्या सपाट हिरवळी-तून आणि वृक्षराजीतून आम्ही चालत गेलो मी पाण्याजवळ धावतच गेलो श्रमामुळे आणि उन्हामुळे मला फार तहान लागली होती. नाईल नदीच्या उगमस्थानाचे पाणी मी कृतज्ञतेने प्यायलो '

ते नाईल नदीचे उगमस्थान होते हे खरे, पण ते एकमेव उगमस्थान नव्हते बेकरने त्या सरोवराला महाराणी व्हिक्टोरियाचे यजमान अल्बर्ट यांचे नाव दिले

अतिशय आनंदाने ते दोघेजण त्या सरोवराच्या किनाऱ्यावर उभे होते. अनेक वर्षांच्या प्रवासाने ते दोघेहीजण थकलेले आणि वाळलेले होते त्या सरोवराच्या किनाऱ्यावर पाय ठेवणारे ते पहिले युरोपियन होते.

आता बेकरपुढे एकच प्रश्न उभा होता लवकरात लवकर घरी कसे परतायचे त्यांनी तिथल्या कोळयांच्याकडून झाडांच्या खोडातून कोरलेल्या दोन होडया मिळविल्या त्या होडयात बसून ते उत्तरेला निघाले दोन आठवडे प्रवास केल्यानतर ते सरोवराच्या उत्तर टोकाकडे आले तेथे त्याना आणखी एक आश्चर्य सापडले नाईल नदी तेथे १३० फूट उंचीच्या धबधब्या-मधून उडी घेत होती या धबधब्याला बेकरने रॉयल जिऑग्राफिकल सोसायटीचे अध्यक्ष मर्चिसन यांचे नाव दिले त्या धबधब्याजवळचा देखावा मनोहर होता धबधबा अरुंद असल्याने एखादा नळ फुटावा तसे पाणी बाहेर पडते आणि पाण्यातून जे तुषार निर्माण होतात त्यांचे आकार नेहमी नित्यनूतन असतात

या ठिकाणीच पाणघोडयाने त्यांची बोट उलटवून टाकली होती. आजही त्या ठिकाणी सुसरीचे थवेच्या थवे आढळतात या अपघातातून ते नशिबा-नेच वाचले

त्यांनी होडी सोडून दिली आणि धबधब्याच्या वरच्या बाजूला असलेल्या पाटोआन बेटावर आश्रय घेतला आता बन्योरोमध्ये अंतर्गत यादवी सुरू झाली होती त्यातून बचावून कमरासीच्या राजधानीला पोचायला त्याला दोन महिने लागले अन्न न मिळाल्यामुळे तो भुकेने अर्धमेला झाला होता. तेथे पोचल्यावर बेकरला पत्ता लागला की ज्या माणसाला पहिल्या भेटीत ते राजा समजले, तो राजा नसून गाम्भी नावाचा राजाचा भाऊ होता ! बेकरने विश्वासघात केला असता तर आपला बचाव व्हावा म्हणून कम-रासीने मुद्दामच त्याला आपल्या जागी ठेवले होते. अर्थात बेकरला गाम्भी किंवा कमरासी दोन्ही सारखेच होते तरीपण ते खऱ्या राजाला भेटले. आणि त्यानेही बेकरला मेजवानी दिली आणि त्याच्याकडून जास्तीत जास्त देण्या उपटण्याचा प्रयत्न केला

त्यानंतर बेकरला सहा महिने बन्योरो प्रांतात उगीचच काढावे लागले.

मुटेसा आणि बन्योरो यांच्या लढाया चालू झाल्या होत्या आणि त्यामुळे प्रवास करणे अशक्य झाले होते. त्यातून बेकरला रोज दुपारी मलेरियाचा ताप यायला लागला होता. औषधे नव्हती. मुटेसाचे आक्रमण वाढल्याने कमरासी उत्तरेकडे पळाला आणि त्याचेबरोबर बेकरलाही जावे लागले. आपले थडगे मध्य आफ्रिकेतच खोदले जाणार असे बेकरला वाटू लागले !

इतक्यात गोंडोकोरोहून गुलाम पकडण्यासाठी अरबांची टोळी आली. त्यांनी बेकरसाठी शिधासामुग्री आणली होती. त्याशिवाय घरची पत्रे आणि लंडनची वर्तमानपत्रेही होती.

अन्न आणि हमाल मिळविण्यासाठी जरूर असलेले कापडही त्या सामुग्रीत आले होते. त्या अरबांच्या जथ्याबरोबरच बेकर उत्तरेकडे निघाला. त्यांचा प्रवास फारच हळू चालला होता. कारण खेड्यांवर छापे मारून अरबांना गुलाम व गुरे पकडायची असत. त्यामध्ये बराच वेळ जाई. शेवटी दोन वर्षांनंतर फेब्रुवारी १८६५ मध्ये त्यांनी गोंडोकोरोमध्ये प्रवेश केला. पण आता तेथे कोणीही युरोपियन शिल्लक उरला नव्हता. बेकर बहुधा मृत्यू पावला असावा असे सर्वजण समजत होते !

या मोहीमेमध्ये बेकरच्या नशिबी हाल आणि संकटे शेवटपर्यंत सुटणार नव्हती. खार्टूमला जाण्यासाठी त्याने एक बोट भाड्याने घेतली. परंतु सुद-गवताच्या दलदलीत त्याला अनेक आठवडे अनुकूल वाऱ्याची वाट पाहत अडकून पडावे लागले. तशातच प्लेगची साथ आली आणि त्यांची अनेक माणसे त्यात दगावली.

ते कसेतरी खार्टूमला पोहचले. तेथील युरोपियनांनी त्यांचे चांगले स्वागत केले. खार्टूमहून कैरोपर्यंतचा प्रवाससुद्धा सुरळीत पार पडला नाही. वाटेत त्यांची बोट फुटली आणि लुटारूंनी त्यांच्यावर छापे घातले. शेवटी ऑक्टो-बर १८६५ मध्ये बेकर पतिपत्नी सुवेझला पोहचले. त्यांच्या आफ्रिकेतील या भ्रमंतीला पाच वर्षे झाली होती. सुरुवातीला बेकरबरोबर निघालेल्या शंभर सव्वाशे मदतनीसांपैकी शेवटपर्यंत एकच जण टिकला होता. त्याला

बेकरने कैरोच्या एका हॉटेलात नोकरी लावून दिली, आणि ते स्वदेशी जाण्यास निघाले त्यावेळच्या आपल्या मनःस्थितीबद्दल बेकर लिहितो,

'खरेच का मी नाईलच्या उगमापासून परत आलो आहे? ते सगळे स्वप्नासारखे वाटत असले तरी स्वप्न नव्हते! या सर्वांना साक्षी होती माझी पत्नी पाच वर्षांच्या उन्हातान्हातील प्रवासामुळे तिचा चेहरा चाग-लाच रापला होता. या माझ्या यात्रेतील हीच माझी एकमेव निष्ठावत अनुयायी होती'

बेकरच्या या रोमाचकारी भ्रमतीच्या वृतान्तात आठ दहा चित्रपटकथाचा मसाला भरलेला होता इग्लडमधील जनता या चित्तथरारक वृतान्नावर बेहद्द खूप होती लिव्हिंग्स्टन, बर्टन, स्पेक आणि ग्रँट याच्या पुस्तकांपेक्षा बेकरचे पुस्तक 'द अल्बर्ट न्याझा' सर्वांत जास्त लोकप्रिय झाले सौ बेकर चे धैर्य, बेकरचा दृढनिश्चय आणि धैर्यशौर्य, यानी ब्रिटिश जनतेच्या मनावर एखाद्या कादबरीच्या नायक नायिकेप्रमाणे मोहिनी घातली अर्थात हे सर्व यश मिळविण्यासाठी बेकर लायक होता, व त्या दर्जाचा होताच

लोकाना बेकरचा आणखी एक गुण आवडला कोणत्याही परिस्थितीत बेकर डगमगून जात नसे आहे त्या परिस्थितीचा स्वीकार करून तो त्यातल्या त्यात काय सोयी करता येतील हे पाही त्याने झाडे लावली, शिकारी केल्या जेथे राहिला तेथे कच्ची घरेही बांधली आणि स्थानिक टोळीप्रमु-खाशी सभाषणे केली त्याने बटाट्यापासून दारु तयार केली. शिकारीतील जनावराच्या कातड्याचे सूट शिवले. एखाद्या चित्रपट नायकाजवळ जसे सर्व गुण एकवटलेले असतात त्याप्रमाणे बेकरच्या अगी खरोखरच एकवट-लेले होते! त्याने आणि त्याच्या पत्नीने आपल्याभोवती उत्तम माणसे जमवली होती त्यांनी माकडे आणि पक्षी पाळले होते आणि त्याना घेऊनच तो प्रवास करत होता ते ज्या बैलावर बसायचे ते बैलही त्याने शिकवून तयार केले होते बेकरने तेथील आदीवासींचे सूक्ष्म निरीक्षण केले होते त्याने आपल्या पुस्तकात अनेक तपशील लिहून ठेवले आहेत तेथील आदिवासी हत्तीच्या कानाच्या कातड्याचे ढोल करतात दारु साठवण्यासाठी

पोकळ भोपळे वापरतात आणि त्यातून आदिवासी गवताच्या नळीने दारू पितात, असे अनेक तपशील त्याने नोंदवले आहेत. झाडाची साल ठोकून ठोकून त्याचे वल्कल कसे बनवतात, आदिवासी सुया कशा तयार करतात, आणि त्या सुयानी बोकडांचे कातडे शिवून एखाद्या कसबी शिंप्याप्रमाणे पोषाख कसा शिवतात याचे त्याने सुंदर वर्णन केले आहे.

बेकर इंग्लंडला पोहचण्यापूर्वीच रॉयल जिऑग्राफिकल सोसायटीने त्याला सुवर्णपदक दिले. काही दिवसातच त्याला सरदारकीही देण्यात आली आणि आता तो सर सॅम्युअल बेकर झाला, त्याच्या 'द अल्बर्ट न्याझा' या पुस्तकाच्या तीन आवृत्त्या निघाल्या. नाईल नदीवरील, शिकारीबद्दल त्याने एक पुस्तक लिहिले आणि एक कादबरीही लिहिली ते सर्व लिखाण लोकप्रिय झाले बेकरचे नाव नाईल नदीशी कायमचे जोडले गेले.

बेकरची पुस्तके लोकप्रिय तर झालीच पण त्या पुस्तकानी त्याहीपेक्षा जास्त दूरगामी परिणाम केले पूर्वी मध्य आफ्रिकेच्या नकाशात सर्वच अज्ञात असल्यामुळे जगली प्राणी दाखवत असत पण आता तसे राहिले नाही वस्ती करण्यास योग्य असा हा अविकसित अफाट प्रदेश आहे हे लोकांना समजले त्याचबरोबर गुलाम पकडणाऱ्या टोळ्यांनी तेथील आदिवासी निग्रोवर कसे अत्याचार चालवले आहेत याचीही माहिती लोकाना समजली नाईल नदी आता भौगोलिक कुतूहलाचा विषय राहिला नाही या प्रदेशात इग्लडने आता हस्तक्षेप केला नाही तर गुलामपकडे अरब हा प्रदेश उध्वस्त करून टाकतील असे त्याने प्रतिपादन केले राजकीय, मानवतावादी, आणि व्यापाराच्या दृष्टिकोनातून मध्य आफ्रिकेचे महत्त्व इग्लडमधील लोकांना पटू लागले.

बेकरच्या पुस्तकानेच मध्य आफ्रिकेबद्दल लोकाचे कुतूहल जागे केले असे नाही पण त्यातील महत्त्वाचा भाग पार पाडला हे निश्चित त्याच्या सशोधनामुळे नाईलच्या उगमाचे गुढ पुरतेपणी उकलले नाही. अल्बर्ट सरो-वराभोवती त्यानी फेरी घातली नव्हती त्यानी इतकेच सिद्ध केले की स्पेकने पाहिलेला प्रवाह अल्बर्ट सरोवराला येऊन मिळत होता आणि त्यातून पुन्हा बाहेर पडत होता हा बाहेर पडणारा प्रवाह म्हणजेच नाईल हे त्याने सिद्ध

केले नव्हते. बेकरच्या शोधामुळे स्पेकच्या विरोधकांना मात्र एक चांगला मुद्दा मिळाला. पुन्हा थोडा वाद माजला आणि रॉयल जिऑग्रॉफिकल सोसा-यटीने नाईलच्या उगमाचा हा प्रश्न सोडविण्यासाठी लिव्हिंग्स्टनला पाठ-वण्याचे ठरवले. लिव्हिंग्स्टनचे मत नाईल नदीचा उगम टांगनिका सरोवरात असावा असे होते. इतकी वर्षं जाऊनही नाईल नदीच्या उगमाचे गुढ अद्याप कायमच राहिले होते।

★

प्रकरण सातवे

# लिव्हिंग्स्टन आणि स्टॅन्ले

आफ्रिकेच्या संशोधकामध्ये लिव्हिंग्स्टन सर्वांत जास्त प्रसिद्ध आहे. १८६५ मध्ये तो आफ्रिकेच्या शेवटच्या प्रवासाला निघाला तेव्हा त्याचे वय ५२वर्षाचे होते तापूर्वी त्याने १८५८ ते ६४ पर्यंत आफ्रिकेत झांबेझी नदीचा शोध घेतला होता. आणि न्यासा सरोवर शोधून काढले होते लिव्हिंग्स्टनच्या व्यक्तिमत्त्वामध्ये अशी काही जादू होती की तो जेथे असे तथाल जीवन जास्त चांगले वाटत असे. त्याला एकदा भेटले की प्रत्येकाला नवा उत्साह वाटे आणि तो भाळून जाई गुलाम पकडणाऱ्या अरब व्यापाऱ्यांना याचा अनुभव आला आणि त्यांनी त्याला शक्य तेवढी मदत केली. त्याच्या पूर्वीच्या मोहीमांमध्ये त्याने बरेचसे गोरे सहकारी नेले आणि तो त्यांच्यावर आपली उच्च नैतिक मूल्ये लादण्याचा प्रयत्न करीत असे. म्हणून ते लिव्हिंग्स्टनवर नाराज असत. परंतु १८६५ मध्ये तो गोरे सहकारी न घेता एकटाच निघाला होता. लिव्हिंग्स्टनला आफ्रिकेचे भयंकर आकर्षण होते, आफ्रिका ही त्याच्या जीवनाचा भाग झाली होती त्याचे जीवन आफ्रिकेला वाहिलेले होते आफ्रिकेची आणि त्याची सांगड नियतीनेच घालून दिली होती बाकीचे संशोधक ठराविक उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रवास करत हे साध्य झाले की केव्हा एकदा घरी परततो असे त्यांना होत असे परंतु लिव्हिंग्स्टन कुठल्याही हेतूशिवाय आफ्रिकेतच फिरत राहिला. तो आफ्रिकेत गोल गोल फिरत राहिला तो आफ्रिकन लोकात राहात असे आणि त्यांचेच अन्न जेवत असे व त्यांच्या झोपडीत झोपतही असे. आफ्रिकन जीवनाशी इतका समरस होऊनही तो त्यांच्याकडे अलिप्तपणे पाहू शकत असे तो लिहितो, या

प्रदेशात मनाचा दुर्बलपणा हा चमत्कारिक रोग आहे स्वतंत्र स्वच्छंद माणसाला गुलाम म्हणून पकडले की या रोगाने त्यांची मनेच मरून जातात!' याप्रमाणे अतिशय थोड्या शब्दांत पण प्रभावीपणे त्याने गुलामगिरी विरुद्ध प्रचार केला. इंग्लंडमधील अँटीस्लेव्हरी सोसायटीच्या प्रचंड प्रचारातून जे साधले नव्हते ते लिव्हिंग्स्टनच्या प्रत्यक्ष अनुभवातून आलेल्या थोड्या शब्दांतून साधले लिव्हिंग्स्टनच्या जीवनाची तुलना विसाव्या शतकातील डॉ अल्बर्ट स्वाईत्स्झर याच्याशीच करता येईल स्वाईत्स्झर एका जागी काम करत होता तर लिव्हिंग्स्टन सतत भटकणारा होता त्याचे फाटकेतुटके कपडे, डोक्यावर चपटकी हॅट आणि हातात काठी असलेली त्याची शांत मूर्ती झाडाझुडूपातून पुढे चालत आहे, असे चित्र नेहमी माझ्या डोळ्यांपुढे उभे राहते. आज विसाव्या शतकात विज्ञानाच्या प्रगतीमुळे आणि होऊन गेलेल्या दोन महायुद्धांमुळे सर्वच जीवन अस्थिर आणि सशयास्पद वाटते. १०० वर्षांपूर्वी तसे नव्हते. लिव्हिंग्स्टनची परमेश्वरावर अढळ श्रद्धा होती. परमेश्वराकडे पोहोचण्याचा त्याचा मार्ग आफ्रिकेतून जात होता आपल्याला आफ्रिकेतच मृत्यू यावा अशी त्याची मनापासून इच्छा असली पाहिजे।

१८६५ मध्ये लिव्हिंग्स्टनने आफ्रिकेत परत न जाण्याचे जाहीर केले होते ते मनापासून नसावे यापूर्वीची २२ वर्षे त्यानी आफ्रिकेतच घालविली होती आणि त्यामुळेच तो पुन्हा एकदा आफ्रिकेकडे खेचला गेला लिव्हिंग्स्टन आफ्रिकेमध्ये प्रथम १८४० मध्ये गेला तेव्हा किनारा सोडल्यास सर्व आफ्रिका म्हणजे अज्ञात प्रदेश होता. १८६५ पर्यंत आफ्रिकेची जी माहिती उपलब्ध झाली होती त्यातील महत्त्वाचा वाटा लिव्हिंग्स्टनचाच होता तरीही १८६५ मध्ये अनेक प्रश्न सुटायचे होते नाईल नदीच्या उगमाचा शोध अपुराच होता गुलामाचा व्यापार बंद झाला नव्हता

१८६५ मध्ये लिव्हिंग्स्टनला इंग्लंडमध्ये काही काम नव्हते त्याला स्वतःचे घर नव्हते पत्नी तीन वर्षांपूर्वीच आफ्रिकेत वारली होती मोठा मुलगा अमेरिकन यादवी युद्धात मरण पावला होता त्यामुळे लिव्हिंग्स्टनला मागे पाश काही राहिले नव्हते,

लिव्हिंग्स्टनला त्याच्या पुस्तकांनी पुष्कळ पैसा मिळवून दिला होता.

त्याला प्रसिद्धीही पुष्कळ मिळाली होती परंतु त्या प्रसिद्धीबद्दल त्याला ओढ नव्हती रॉयल जिऑग्रॉफिकल सोसायटीने नाईलच्या उगमाचा अपुरा शोध पूर्ण करण्याची कामगिरी स्वीकारण्याची त्याला विनंती केली आफ्रिकेत संशोधन करणे हे त्याच्या जीवनाचे ध्येयच होते त्यामुळे ही विनंती त्याने तात्काळ मान्य केली नाईल नदीचा उगम मध्य आफ्रिकेतील अतिशय उंच चंद्रपर्वताच्या पायथ्याशी असलेल्या अथाग झऱ्यातून होतो असे हिरोडोटसने २००० वर्षांपूर्वी लिहून ठेवले होते ही कल्पना खरी की खोटी हे तपासण्याचाही त्यांचा एक हेतू होता

लिव्हिंगस्टनची प्रकृती तशी ठणठणीत होती दीर्घ प्रवासाचा ताण त्याला सहज सोसला असता इंग्लंडमध्ये त्याने एक वर्ष पूर्ण विश्रांती घेतली होती वीस वर्षांपूर्वी आफ्रिकेमध्ये सिंहाशी झालेल्या झुंजीत त्याचा खांदा दुखावला होता तो अजूनही दुखत असे परंतु ही फारशी गंभीर बाब नव्हती त्याने या सिंहाच्या हल्ल्याचे वर्णन लिहून ठेवले आहे यातून लिव्हिंग्स्टनच्या स्वभावावर चांगला प्रकाश पडतो म्हणून ते संपूर्ण येथे दिले आहे

' मी गर्जना ऐकली दचकून मागे वळून पाहतो तो एक सिंह माझ्या अंगावर उडी घेण्याच्या तयारीत होता ! सिंहापासून मी थोडा उंचीवर उभा होतो त्याने उडी मारून माझा खांदा पकडला आणि आम्ही दोघेही उतारावर गडगडत खाली आलो तो माझ्या कानाशी गुरगुरत होता आणि मला हलवीत होता त्याच्या हल्ल्यामुळे उंदीर मांजराच्या तावडीत सापडल्यानंतर जसा तो स्तब्ध होतो तसा मी स्तब्ध झालो ! काय घडते आहे हे मला चांगले समजत होते तरीही सगळे स्वप्नासारखे वाटत होते ! आणि भीती व दुःख तर मुळीच नव्हते भूल दिल्यावर एखाद्या रोग्याने आपली शस्त्रक्रिया शांतपणे पाहावी त्यासारखीच ती भावना होती हिंस्त्र पशूने हल्ला केल्यानंतर सर्व जनावरांची अशी अवस्था होत असावी मृत्यूचे दुःख होऊ नये म्हणून दयाळू परमेश्वराने केलेली योजना असावी !'

लिव्हिंग्स्टनच्या नव्या मोहिमेची सुरुवात आत्मविश्वासाने व उत्साहाने झाली. प्रत्यकाने त्याला शुभेच्छा दिल्या इंग्लंडच्या पंतप्रधानांनीही

जातीने विचारपूस करून त्याला काय हवे नको ते पाहायला सांगितले मोहीम कशी आखायची याबाबत त्याला पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले होते झांबेझी वरील मोहिमेबद्दलचे नवे पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर तो निघणार होता. झाबेझीच्या मोहिमेत त्याचे बरोबर जॉन किर्क हा सहकारी होता. म्हणून त्याने किर्कला आपल्याबरोबर येण्याचे निमन्त्रण दिले पण किर्कने ते नाकारले. तरीही त्याच्याबद्दल पूर्वग्रह न बाळगता लिव्हिंग्स्टनने त्याची शिफारस झांझिबारच्या उपराजदूतपदासाठी केली शेवटी लिव्हिंग्स्टनने एकट्यानेच जायचे ठरविले. परराष्ट्र खात्याने त्याला पाचशे पौंड अनुदान दिले आणि जिऑग्रॉफिकल सोसायटीने पाचशे पौंड दिले बाकीचे पैसे लिव्हिंग्स्टनने आणि त्याच्या मित्रांनी गोळा केले लिव्हिंग्स्टनला सरकारने 'मध्य आफ्रिकेतील ब्रिटिश वकील' असा हुद्दा दिला पण या हुद्याला पगार नव्हता । ऑगष्ट १८६५ मध्ये तो आफ्रिकेत जायला निघाला आणि पॅरीस, कैरो आणि मुंबई या मार्गाने जानेवारी १८६६ मध्ये तो झांझिबारला पोहोचला

१८५६ मध्ये बर्टनने भेट दिली तेव्हा झांझिबार जसे होते तसेच आताही होते पण पश्चिमी राष्ट्रांच्या राजकारणाच्या आणि व्यापाराच्या सापळ्यात हे बेट हळूहळू अडकत होते तेथे आता सहा पाश्चिमात्य राष्ट्रांच्या वकिलाती होत्या आणि व्यापारी श्रीमंत होत होते. पाश्चात्य राष्ट्रांच्या जहाजांची ये-जा बरीच वाढली युरोपीय राष्ट्रातील व्यापारी आणि सैनिक याचीही बरीच वर्दळ होती आणि गुलामाचा व्यापार बराच वाढला होता. आता आफ्रिकेच्या मध्य भागातून दरवर्षी ८०,००० ते १,००,००० गुलाम पकडले जात होते. याशिवाय जून महिन्यातील अनुकूल वाऱ्याबरोबर अनेक शिडाची जहाजे गुलाम पकडून अरबस्तानाकडे जात असत त्यातील गुलामाचा हिशेब येथे घेतलेला नाहीच ।

लिव्हिंग्स्टन लिहितो, 'येथील जीवन कित्येक शतकांत बदललेले नाही. गुलामाची जहाजे येतात व जातात सगळीकडे कचरा व घाण वास पसरलेला असतो मी गुलामाच्या बाजाराला भेट दिली तेथे ३०० गुलाम विक्रीसाठी उभे केले होते ते सर्व तरुण होते आणि त्यांचे चेहरे दु:खी व दीन

होते गिऱ्हाईके त्यांचे दात तपासून पहात होती आणि कपडे काढायला लावून त्यांचे लैंगिक अवयव तपासत होते एखादी काठी फेकून ती त्या गुलामाला आणायला सांगत असत त्यामुळे तो कसा चालतो हे समजे. गुलाम खरेदी करणारी गिऱ्हाईके अरबस्थानातील होती काही गुलामांना हाताने ओढत असत आणि त्याची किंमत ओरडून जाहीर करत.'

लिव्हिंग्स्टनने सुलतानाची भेट घेतली सुलतानाने त्याला सर्व मदत देऊ केली लिव्हिंग्स्टनचा पूर्वीचा मदतनीस किर्क तेथे उपराजदूत म्हणून नुकताच आला होता त्यानेही मोहिमेची तयारी करण्यामध्ये लिव्हिंग्स्टनला खूपच मदत केली किर्कने लिव्हिंग्स्टनबरोबर झांबेझीच्या मोहिमेत पाच वर्षे काढली होती आणि त्याला आपल्या नेत्याबद्दल फार आदर होता मोहिमेचा झांझिबारमधील प्रतिनिधी म्हणून किर्कने काम करावे असे ठरले. मोहिमेला पुरवठा करण्यासाठी टांगानिका सरोवराच्या काठावरील ऊजीजीकडे किर्कने नंतर सामुग्री पाठवावी असे ठरले

तशी ही मोहीम फार मोठी नव्हती लिव्हिंग्स्टनने मुंबईहून काही सैनिक आणले होते. स्पेक आणि ग्रँट यांच्या मोहिमेत भाग घेतलेल्या तिघा मुलानाही त्याने भरती करून घेतले जथ्थ्यामध्ये आता साठ माणसे झाली त्याशिवाय उंट, म्हशी, खेचरे व गाढवे वगैरे जनावरे सामान वाहण्यासाठी होती

लिव्हिंग्स्टनने अरबी व्यापाऱ्यांच्या मार्गाने जायचे ठरविले त्याला प्रथम टांगानिका सरोवराच्या दक्षिणेकडे न शोधलेला प्रदेश शोधण्यासाठी जायचे होते तो प्रथम रावुमा नदीच्या मुखाजवळ उतरला (ही नदी टाझानिया व मोझांबिकची सध्या सरहद्द आहे) आणि येथून त्याचा अपूर्व प्रवास सुरू झाला हा प्रवास यापुढे सात वर्षे चालणार होता आणि लिव्हिंग्स्टनच्या मृत्यूनंतरच संपणार होता ! माणसाची इच्छाशक्ती प्रबळ असते हे यातून समजणार होते.

अत्यंत चुकीची व असंभाव्य अनुमाने बाळगून लिव्हिंग्स्टनचा हा ऐतिहासिक प्रवास सुरू झाला होता तो नाईल नदीच्या शोधाला निघाला होता आणि ती तेथून शेकडो मैल लांब होती ! त्याला गुलामगिरी बंद करायची

होती. पण हे साध्यासाठी त्याच्याजवळ कोठलेच साधन नव्हते ! तो एकटा नि शस्त्र आणि असहाय्य होता. आणि त्याला आफ्रिका खंड तुडवून जायचे होते या सगळ्या अशक्य गोष्टी होत्या. लिव्हिंग्स्टनला हव्या होत्या त्या गोष्टी साधल्या खऱ्या पण किती विचित्र तऱ्हेने ! ज्याना तो नष्ट करू इच्छित होता त्या गुलाम-पकड्या अरबानीच आजारपणात त्याची काळजी घेतली आणि त्याला शिधासामुग्री दिली गुलामगिरी कालांतराने नष्ट झाली पण निराळ्याच प्रकारे ! लिव्हिंग्स्टनने लिहिलेल्या एका खेड्यातील चक्षुर्वैसत्य हकीगतीमुळे इंग्लंडमध्ये जागृती झाली आणि गुलामगिरीला शेवटचा फटका बसला नाईल नदीच्या उगमाचे कोडे पूर्णपणे सुटले पण ते लिव्हिंग्स्टनने सोडविले नाही तर त्याच्याकडून स्फूर्ती मिळालेल्या स्टॅन्लेच्या प्रयत्नामुळे सुटले. लिव्हिंग्स्टन ही मोहिम एखाद्या कर्मयोग्याप्रमाणे चालवत होता जगन्नियत्या परमेश्वराच्या इच्छेनेच सर्व घडते यावर त्याची दृढ श्रद्धा होती.

या सात वर्षांच्या मोहिमेत लिव्हिंग्स्टनची इतकी दशा अनेकदा झाली होती, की या सर्वांतून तो जगला कसा याचे आश्चर्य वाटते ! मोहिमेच्या सुरुवातीसच त्याची सर्व जनावरे नष्ट झाली आणि बहुतेक मदतनीस पळून गेले त्याची औषधाची पेटी चोरीला गेली. १८६६ च्या अखेरीस तो टांगानिका सरोवराच्या दक्षिणेस होता तेथे तो आजारी पडला तेव्हा अरब व्यापाऱ्यांनी त्याची काळजी घेतली पण त्यांच्या कृत्यामुळे लिव्हिंग्स्टनला तेथून पुढे जाणे अशक्य झाले होते त्याला हमाल किंवा ओझी वाहणारी जनावरे मिळेनात. तरीही तो लुलाबा नदीच्या पश्चिमेला गेला आणि तेथून बाँगवेलो सरोवराच्या दक्षिणेला पोहोचला तेथे जाणारा तो पहिलाच युरोपीय प्रवासी होता बाँगवेलो सरोवराला प्रदक्षिणा घालून तो उजिजीला मार्च १८६९ मध्ये परतला तेव्हा त्याच्या प्रवासाला तीन वर्षे पूर्ण झाली होती त्याच्या तोंडात दात नव्हते मलेरिया व इतर रोगांनी तो आजारी होता आणि केवळ हाडाचा सापळा उरला होता. किर्कने त्याच्यासाठी जी सामुग्री पाठविली होती ती वाटेतच लुटली गेली होती. त्याला जरूर असलेले क्विनाईनही मिळाले नाही आणि बाहेरच्या जगाचे बातमी देणारे टपालही

मिळाले नाही. आफ्रिकेतील संशोधक वर्षावर्षांनी मिळणाऱ्या टपालाची फार उत्सुकतेने वाट पाहत असत. लिव्हिंग्स्टनने इंग्लंडला पाठविण्यासाठी ४२ पत्रे लिहून ठेवली होती. पण गुलामपकडे अरबांनी ती झांझिबारला पोहोचवायला नकार दिला. त्या पत्रात त्यांनी केलेल्या कत्तलीची माहिती आहे, हे त्या अरबांना माहीत होते ! आणि त्यांना त्या हकिगती बाहेर जाऊ द्यावयाच्या नव्हत्या.

त्यामुळे लिव्हिंग्स्टन पुनः एकदा लुलाबा नदीकडे वळला. त्याच्या मते हीच नाईल नदी होती. वास्तविक ती अटलांटिक महासागराला मिळणाऱ्या कांगो नदीची उपनदी होती. परंतु लिव्हिंग्स्टनच्या ते लक्षात आले नाही. या त्याच्या प्रवासामध्येच त्याला एक भीषण प्रसंग अनुभवावा लागला. लुलाबा नदीच्या किनाऱ्यावर नयानग्वे येथे एके दिवशी सकाळी गुलाम पकड्या अरबांनी केलेली भीषण कत्तल असहाय्य साक्षीदार बनून त्याला पाहावी लागली !


लिव्हिंग्स्टन त्या गावी बरेच दिवस राहिला. त्याला ते ठिकाण आवडले होते. वस्तुविनिमय पद्धतीवर तेथें लहानसा बाजार भरत असे. सुमारे २००० लोक बाजाराला जमत. कोंबड्या, फळे आणि धान्य यांची देव-घेव बाजारात चालत असे. जवळूनच प्रचंड नदी वाहत जाऊन अरण्यात घुसत असे. १५ जुलै १८७१ च्या दिवशी तेथे काय घडले ही सर्व हकीगत लिव्हिंग्स्टनने लिहून ठेवली. त्यामुळे बाहेरच्या जगाला निग्रोंची दुःखे आणि शोकांतिका समजल्या, दुगांबे आणि टगामोयो हे ते अत्याचार करणारे अरब टोळीप्रमुख होते.

लिव्हिंग्स्टन लिहितो, 'त्या दिवशी सकाळी बरेच उकडत होते. मी बाजारात दुगांबे व त्याच्याबरोबर आलेली माणसे पाहिली. त्या तिघांच्या हातात बंदुका पाहून मला आश्चर्य वाटले. बाजारात अशा बंदुका आणणे चांगले नाही असे मी माझ्या माणसाकडून त्यांना कळवले. तेथे फारच गरम होत होते म्हणून मी चालायला लागून बाजाराच्या बाहेर पडलो. मी थोडा पुढे जातो तोच मला बंदुकीचे आवाज ऐकू आले. त्या तिघांनी बाजारातील लोकांवर स्वैर गोळीबार सुरू केला होता. त्याचवेळी दुसऱ्या एका

जध्याने नदीकिनाऱ्यावर गोळीबार केला तेथेच घाबरून पळणाऱ्या स्त्रियांनी होड्याजवळ गर्दी केली होती ते सर्व लोक इतके घाबरले होते की वल्ही न घेताच ते होड्यात घुसू लागले होड्या नांगरलेला ओहळ फार लहान होता आणि तेथे घाबरलेल्या व जखमी झालेल्या लोकांनी एकच गर्दी केली होती अनेकांनी नदीत उड्या मारल्या होत्या नदीच्या पलीकडल्या तीरावर पोहोचण्यासाठी तीन मैल पोहून जाणे आवश्यक होते पण तितकी शक्ती नसल्याने नदीत उडी मारलेल्यांपैकी कित्येकजण बुडून मरणार हे निश्चित होते ! इकडे याचा गोळीबार चालूच होता नदीतील अनेक तरंगणारी डोकी बुडताना दिसत होती त्यातील काहीजण दोन हात वर करून जणू परमेश्वराची प्रार्थना करण्यासाठी उसळी घेत आणि दुसऱ्याच क्षणी पाण्याखाली गडप होत एका होडीत खच्चून माणसे भरली होती आणि ती कशीबशी निसटली तीन होड्यात माणसांनी इतकी दाटी केली होती की त्या सर्वांसकट त्या होड्या नदीच्या तळाशी गेल्या ! हळूहळू नदीवर तरंगणारे लोकही नाहीसे झाले ! शेवटी डुगुबे नावाच्या अरबाने होडीतून २१ जणांना वाचविले पण एका स्त्रीने होडीत यायला नकार दिला गुलाम होण्यापेक्षा बुडून मरणे बरे असे तिला वाटले असावे ! ती कदाचित वाचलीही असेल कारण तेथील स्त्रिया पोहोण्यात तरबेज होत्या त्या नेहमी बुड्या मारून कालव्याचे शिंपले बाहेर काढत असत अरबाच्याच हिशेबाप्रमाणे त्या सकाळी ३३० ते ४०० माणसे मेली. होडीजवळ गोळीबार करणाऱ्या अरबांनी इतका स्वैरपणे गोळीबार केला की त्यामुळे एक अरबच मेला !

मी इतका संतापलो होतो की, मी अरबावर पिस्तुल झाडणार होतो. परंतु डुगुबेने मला आवरले तेथील गोळीबार संपल्यावरही अरबांनी पळणाऱ्या लोकांवर व खेड्यांवर गोळीबार चालूच ठेवला मी हे लिहितो आहे तेव्हाही पलीकडच्या तीरावर मृतासाठी चाललेला शोक व आक्रोश ऐकू येत आहे ! हे परमेश्वरा ! तुझे दयामय राज्य केव्हा बरे येईल ? येथे इतकी कत्तल झाली आहे की मी जणू नरकातच आहे असे मला वाटत आहे !'

या कत्तलीच्या घटनेनंतर पुढच्या प्रवासासाठी लिव्हिंग्स्टनला होड्या व हमाल मिळणं अशक्यच झालं. कत्तलीच्या या घटनेमुळे लिव्हिंग्स्टनला धक्का बसला. त्याची प्रकृती खालावली आणि तो उजीजीला येऊन स्वस्थ बसला त्याच्याजवळ आता काही साधनसामुग्री उरली नव्हती आता उजीजी येथे आल्यानंतर जगण्यासाठीसुद्धा त्याला भीक मागण्याची पाळी आली ! गुलाम पकडणाऱ्या अरब व्यापाऱ्यांनीच त्याला त्या वेळी मदत केली त्यामुळे तो जिवंत राहू शकला तो अशा विपन्नावस्थेत असतानाच १० नोव्हेंबर १८७१ मध्ये उजीजी येथे त्याला स्टॅन्ले भेटला




**लिव्हिंग्स्टन व स्टॅन्ले यांचे प्रवासमार्ग**

या भेटीचे वर्णन करताना लिव्हिंग्स्टन लिहितो, ' एका दिवशी माझा मदतनीस सुशी धावतच आला आणि म्हणाला, ' एक इंग्लिश मनुष्य येत आहे मी त्याला पाहिला ' आणि तो पुन्हा त्याच्याकडे पळत सुटला त्या जथ्याच्यापुढे एक मनुष्य अमेरिकन निशाण घेऊन चालत होता. त्यांच्याबरोबर कापडाचे गठ्ठे, स्वयंपाकाची भांडी, तंबू वगैरे चिक्कार सामान होते माझ्या मनात आले, हा चांगला श्रीमंत प्रवासी दिसतो ! माझ्यासारखा दरिद्री दिसत नाही ! '

स्टॅन्लेने या भेटीचे वर्णन जास्त चांगले केले आहे

तो लिहितो, सलीमने मला सांगितले, ' पांढऱ्या दाढीचा एक म्हातारा मी पाहिला तोच डॉ लिव्हिंग्स्टन असला पाहिजे ' ही बातमी ऐकल्यावर मला जो हर्ष झाला त्याचे वर्णन काय करावे ? माझ्या हृदयाची धडधड मला ऐकू येऊ लागली पण मी स्वतःशी म्हणालो, ' बा मना, तुझ्या भावनांना आवर ! एक गोरा मनुष्य दुसऱ्या गोऱ्या माणसाला अदबीने आणि सन्मानानेच भेटला पाहिजे ! ' म्हणून मी माझ्या भावनांना आवर घातला जमलेल्या लोकांना बाजूला सारले आणि पुढे गेलो. तेथे अरबांच्या अर्धवर्तुळात अर्धवट पिकलेली दाढी असलेला एक गोरा मनुष्य उभा होता मी हळूहळू त्याच्याकडे गेलो अशक्तपणामुळे तो फिक्कट पडला होता आणि त्याने निळी टोपी घातली होती, विजार आणि कोट परिधान केला होता मला असं वाटलं की धावत जावे आणि त्याला मिठी मारावी. पण तो माझे स्वागत कसे करील याबद्दल मला भीती वाटत होती त्यामुळे मी चालरीत पाळण्याचे ठरविले हळूहळू चालत त्याच्याकडे गेलो आणि हॅट काढून म्हणालो, ' आपणच डॉ. लिव्हिंग्स्टन ना ? '

तो थोडा हसला आणि आपली टोपी थोडीशी उचलून म्हणाला, ' होय ! '

मी माझी हॅट घातली आणि हस्तांदोलन करून त्याला मोठ्यांदा म्हणालो, ' परमेश्वराच्या कृपेमुळेच आपली भेट होत आहे ! '

लिव्हिंग्स्टन म्हणाला, ' तुमचे येथे स्वागत करण्यात मला आनंद होत आहे '

आफ्रिकेच्या संशोधनाचा इतिहास डॉ लिव्हिंग्स्टन आणि स्टॅन्ले यांच्या भेटीचे वर्णन केल्याखेरीज पूर्ण होत नाही खरे म्हणजे लिव्हिंग्स्टनला ही मदत फार उशिरा आली होती लिव्हिंग्स्टनचा पत्ता लागत नव्हता त्याला पाच वर्षे झाली होती १८६८ मध्येच लिव्हिंग्स्टन मरण पावल्याचे वृत्त त्याच्या पळून गेलेल्या हमालाने दिले होते तशी बातमीही वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली होती पण नतर लिव्हिंग्स्टनची काही पत्रे मिळाली त्यामुळे त्याला शोधण्याचा प्रयत्न मध्येच सोडून देण्यात आला आज रेडिओ आणि विमाने याच्या उपयोगामुळे अज्ञात प्रदेशाचा किंवा माणसाचा शोध घेणे सोपे झाले आहे १०० वर्षांपूर्वी एखादे जहाज समुद्रात हरवले की ते नष्ट झाले म्हणूनच समजत । आणि मनुष्य अज्ञात प्रदेशात राहिला तर मृतच मानण्यात येई । तरीसुद्धा लिव्हिंग्स्टनचा शोध ब्रिटिशांनी का केला नाही आणि स्टॅन्ले त्याला का शोधायला आला हे सगळे आश्चर्यच आहे. स्टॅन्लेने-सुद्धा ही कामगिरी सावकाशच केली स्टॅन्ले 'न्यूयॉर्क हेरॉल्ड'चा बातमी-दार होता तो या कामगिरीवर १८६९ मध्ये बाहेर पडला त्याच्या मालकाने त्याला सांगितले, 'प्रथम, सुवेझ कालव्याच्या उद्घाटनाच्या समा-रभाला उपस्थित राहा नतर जेरुसलेम, क्रिमिया, कास्पियन समुद्र या भागात प्रवास करून शेवटी हिन्दुस्थानात जा आणि शेवटी लिव्हिंग्स्टनचा शोध हाती घे । तो जर मेलेला असेल तर त्याच्या मृत्यूचा पुरावा गोळा करून घेऊन ये ।' स्टॅन्लेने हा सर्व कार्यक्रम १४ महिन्यात पूर्ण केला आणि तो १८७१ च्या शेवटी उजीजीला पोहोचला.

स्टॅन्ले कोण होता ? त्याचे जीवन एखाद्या कादबरीकारालासुद्धा कल्पना करता येणार नाही, इतके अद्भुतरम्य होते ' त्याचे खरे नाव स्टॅन्ले नव्हतेच । तो होता रोलड इग्लडमधील वेल्स परगण्यात एका काम-गाराच्या घरात तो जन्मला तो अमेरिकेमध्ये हरकाम्या पाऱ्या म्हणून गेला स्टॅन्ले नावाच्या एका अमेरिकनाने त्याला दत्तक घेतले अमेरिकन यादवी युद्धात त्याने भाग घेतला प्रथम तो दक्षिणेच्या बाजूने लढला आणि नतर उत्तरेकडल्या संस्थानांच्या बाजूने । तो इग्लडला परतला पण त्याच्या बदफैली आईने त्याला हाकलून दिले नतर त्याने अमेरिकेन रेड इडियनाच्या विरुद्ध



संशोधक स्टॅन्ले

झालेल्या मोहिमेत भाग घेतला. नंतर तो पत्रकार झाला आणि अबिसिनि-याच्या सम्राटाविरुद्ध केलेल्या इंग्लिश मोहिमेची बातमीपत्रे पाठविली या सगळ्या विविध अनुभवामुळे त्याचा कणा पोलादाचा बनला होता. अत्यंत दरिद्री अवस्थेत सुरुवात करून स्वतःच्या गुणांनी त्याने उच्च स्थान मिळविले होते। आणि आपण कोठून आणि कोठे पोचलो याची त्याला चांगली जाणीव होती. त्याची इच्छाशक्ती प्रबळ होती तो दुसऱ्यांना सल्ला विचारत बसत नसे संकटे कोसळली तर तो डगमगून जात नसे तो लोकांत फारसा मिसळत नसे आणि त्याला कोणाचीही दया वगैरे वाटत नसे। त्याचा स्वाभिमान गर्विष्ठपणापर्यंत पोहोचला होता

स्टॅन्ले उजीजीला पोहोचला तेव्हा तो तीस वर्षांचा होता स्टॅन्लेच्या आणि लिव्हिंग्स्टनच्या स्वभावात जमीन-अस्मानाचे अंतर होते परंतु या

क्षणी तरी दोघांनाही एकमेकाची फार जरूरी होती. लिव्हिंग्स्टनला औषधे, साहित्यसामुग्री आणि बाहेरच्या जगातील बातम्या हव्या होत्या. स्टॅन्लेला, या प्रसिद्ध माणसाला शोधून काढल्याबद्दल मिळणारी कीर्ती हवी होती

या प्रवासाच्या सुरुवातीला तरी वर्तमानपत्रासाठी एक सनसनाटी बातमी मिळवावी इतकाच त्याचा उद्देश होता अधिकारी लोक वर्तमानपत्रातील प्रसिद्धीला घाबरतात हे त्याला माहिती होते झांझिबारला अमेरिकन राजदूताकडे तो उतरला आणि त्याने आपले बेत गुप्त ठेवले आफ्रिकेच्या किनाऱ्याने मी हिंडणार आहे आणि ते प्रवास-वर्णन वर्तमानपत्रांना पाठवणार आहे असे त्याने इतरांना सांगितले त्याने मोहिम मोठ्या चातुर्याने आखली त्याने लिव्हिंग्स्टनच्या नोकरीतील बॉबेला नोकरीत घेतले. आणि उत्तम साहित्य जमवले चांगल्यातले चांगले हमाल सर्वांत जास्त दर देऊन ठरविले झांझिबारपासून उजीजीला तो आठ महिन्यात पोहोचला वाटेत तो मलेरियाने आजारी पडला आणि त्याने आफ्रिकन टोळीवाले आणि अरब गुलामपकडे यांच्याशी लढाया करून त्यात प्रत्यक्ष भाग घेतला त्याने दोन गोरे साहाय्यक घेतले होते ते दोघेही मृत्यू पावले. आणि प्रवासाच्या शेवटी लिव्हिंग्स्टनचा शोध लावण्यात त्याला यश मिळाले लिव्हिंग्स्टनने तक्रार केली की, किर्कने त्याला जे हमाल दिले ते सर्व लबाड, चोरटे व गुलाम होते आपल्या बातमीपत्रासाठी या गोष्टीची त्याने नोंद करून घेतली किंबहुना लिव्हिंग्स्टनचे व त्याचे जे दीर्घकाळ संभाषण झाले त्याचा त्याने पुढे चांगला उपयोग करून घेतला त्याने स्वत: लिव्हिंग्स्टनचे शिष्यत्व स्वीकारले व त्याचेबरोबर प्रवास करायचे ठरविले प्रथम ते उसिझी नदीचा शोध घेण्यासाठी तीन आठवड्याचा प्रवास करून आले त्यात त्यांना आढळले की उसिझी नदी टांगानिका सरोवराला येऊन मिळते. त्यातून बाहेर पडत नाही तेव्हा लिव्हिंग्स्टनला वाटले की लुलाबा नदी म्हणजे नाईल नदी असली पाहिजे म्हणून लुलाबा नदीकडे जायचे त्याने ठरविले पण त्याच्याकडे सामान किंवा हमाल नव्हते ते मिळविण्यासाठी दोघेजण उजिजीपासून २०० मैलावरच्या ताबोरा ठाण्याकडे निघाले तेथे किर्कने

आश्वासन दिलेले सामान आलेले नव्हते लिव्हिंग्स्टनने झांझिबारला यायला नकार दिला तेव्हा स्टॅन्लेने आपले जितके सामान लिव्हिंग्स्टनजवळ ठेवणे शक्य होते तितके ठेवले आणि तो एकटाच झांझिबारला परतला त्याचेबरोबर लिव्हिंग्स्टनच्या डायऱ्या व पत्रे होती. 'न्यूयॉर्क हॅरॉल्ड'ला पाठवावयाचे वातमीपत्र त्याने तयार केले लिव्हिंग्स्टनने 'न्यूयॉर्क हॅरॉल्ड'ला उद्देशून एक पत्रही लिहिले होते त्याने मध्य आफ्रिकेतील गुलामाचा व्यापार बंद करण्याविषयी कळकळीची विनती केली होती

स्टॅन्लेने वेळ बरोबर साधली होती लिव्हिंग्स्टनला शोधायला रॉयल जिऑग्रॉफिकल सोसायटीने पाठविलेले शोधक पथक त्याला किनाऱ्यावर बगमोयो येथे भेटले लिव्हिंग्स्टनची बातमी सांगून त्या शोधपथकाला त्याने परतवले त्यामुळे मे १८७२ मध्ये लिव्हिंग्स्टनच्या भेटीची सनसनाटी वातमी पुरविण्याचे श्रेय स्टॅन्लेला मिळविता आले इग्लंडमध्ये स्टॅन्लेचे जोरदार स्वागत झाले त्याला सन्मानपदके व भेटी मिळाल्या पण इग्लंड-मधील लोकांना एका अमेरिकन नागरिकाने लिव्हिंग्स्टनचा शोध लावावा आणि त्याला वर्तमानपत्री प्रसिद्धी मिळाली हे मनातून आवडले नाही लिव्हिंग्स्टनला मदत करण्यात किर्कने हेळसाड केली असा स्टॅन्लेने आरोप केला एक अधिकारी असल्याने किर्क उत्तर देऊ शकत नव्हता पण किर्कने आपल्या मित्राकरवी प्रचार केला आणि त्यामुळेच स्टॅन्लेला शत्रू निर्माण झाले

लिव्हिंग्स्टन ताबोरा येथेच दिवस मोजत बसला होता स्टॅन्लेने ठेवलेली शिधासामग्री त्याला चार वर्षे पुरण्यासारखी होती । त्याच्याजवळ सुशी आणि चूमा हे दोनच मदतनीस राहिले होते त्यामुळे त्याला कोणतीही मोठी मोहीम हातात घेता येत नव्हती किनाऱ्यावरून हमालाची मदत घेऊन येण्याची तो वाट पाहत होता आंब्याच्या झाडाखाली बसून तो बायबलचे पाठ शिकवी आणि रोज आपली दैनंदिनी लिहित असे ताबोरा गावाच्या बाहेरच एका अरबाने बांधलेल्या मातीच्या घरात तो राहात असे त्याचे वय आता ५९ वर्षांचे झाले होते स्टॅन्लेच्या सहवासात असताना त्याची प्रकृती थोडी सुधारली होती पण ती बिघडली आणि दुरुस्त होण्यापलिकडे

गेली परंतु आपण मृत्यूच्या जवळ येत आहोत हे त्याला समजले असावे असे त्याच्या डायऱ्यांवरून वाटत नाही तो अजूनही नाईल नदीच्या उगमाचाच विचार करीत होता त्याची परमेश्वरावर दृढ श्रद्धा होती आणि त्यामुळे त्याचे मन शेवटपर्यंत खंबीर राहिलेले होते त्याने वेळोवेळी जी पत्रे पाठविली त्यातून त्याचा हा खंबीरपणा दिसून येतो मधून मधून घरी इंग्लंडला परतायचा विचारही त्याच्या मनात डोकावत होता. त्याने एका पत्रामध्ये आपल्या मित्राला लंडनमध्ये एखादे घर भाड्याने घेऊन ठेवण्याबद्दल सांगितले होते

ऑगस्ट १८७२ मध्ये स्टॅन्लेने पाठविलेला ५७ हमालाचा जथा येऊन पोहोचला आणि थोड्या दिवसांत तो प्रवासाला निघाला त्याला अलिकडे असे वाटत असे की बगवेलो सरोवरात येणारा प्रवाह म्हणजे नाईल नदीचा उगम असेल म्हणून त्या दिशेने तो निघाला आणि टांगानिका सरोवराजवळ पोहोचला आणि तेथून दक्षिणेकडे निघाला तावोरा येथून निघाल्यापासून आठ महिन्यानी एप्रिल १८७३ मध्ये तो बगवेलो सरोवराच्या दक्षिणेला होता त्यातून बाहेर पडणारा प्रवाह सापडतो काय याचा तो शोध घेत होता लुलाबा नदी कांगो नदीस मिळत असावी अशी त्याला शंका होती पण त्या शंकेला थारा न देता आपले संशोधन चालवत होता

हा प्रदेश फार अडचणीचा होता. जागजागी दलदली होत्या चितांगो नावाच्या टोळी प्रमुखाच्या खेड्याशेजारी लिव्हिंग्स्टन खूप आजारी पडला आणि त्याला डोलीतून न्यावे लागले १ मे १८७३ रोजी सकाळी त्याच्या मदतनीसाना तो मृत्यू पावलेला आढळला बिछान्याजवळ गुडघे टेकून परमेश्वराची प्रार्थना करीत असतानाच त्याला मृत्यू आला होता ! त्याचे निष्ठावंत मदतनीस सुशी आणि चुमा यांनी त्याचे शव झांझिबारला न्यायचे ठरविले त्या अशिक्षित लोकांच्या मनात लिव्हिंग्स्टनबद्दल देवावर असावी तशी श्रद्धा व प्रेम होते त्यानी लिव्हिंग्स्टनची आतडी वगैरे काढून टाकली आणि एक पंधरवडाभर ते शव उन्हात वाळविले नतर ते कापडात शिवून टाकले मग एक झाडाचा बुंधा घेऊन त्यातील पोकळीत ते बसविले आणि तो बुंधा गिडाच्या कापडात शिवून टाकला. नतर तो बुंधा एका काठीला

बांधला आणि दोन लोकांनी तो नेण्याजोगा झाला लिव्हिंग्स्टनशी एकनिष्ठ राहिलेले सुशी, चुमा व इतर साठ लोक झांझिबारकडे निघाले. झांझिबार-पर्यंत त्याना १ हजार मैलाचे अतर काटायचे होते आणि प्रवाशांना मारून लुटणाऱ्या अनेक रानटी टोळ्या होत्या. तरीही त्यांचा हा जथा ११ महिन्या-नतर झांझिबारला सुखरूप पोहोचला दरम्यान इग्लडहून लिव्हिंग्स्टनचा शोध पुन्हा घ्यायला दोन मोहिमा पुन्हा पाठविण्यात आल्या एक आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्याहून निघाली होती आणि दुसरी पश्चिम किनाऱ्याहून ! पूर्व किनाऱ्यावरच्या मोहिमेचा पुढारी लोवेट कॅमेरॉन होता त्याची सुशी आणि चुमा याच्या जथ्याची भेट ताबोरा येथे ऑक्टोबर १८७३ मध्ये झाली कॅमेरान पुढे उजीजीला गेला आणि त्याने लिव्हिंग्स्टनची सर्व कागदपत्रे मिळविली त्यानतर दोन वर्षांनी तो आफिरकेच्या पश्चिम किनाऱ्यावर पोहोचला सुशी आणि चुमा लिव्हिंग्स्टनचे शव घेऊन हिन्दी महासागराच्या किनाऱ्यावर बगमायो येथे १५ फेब्रु १८७४ ला पोहोचले. तेथे 'व्हल्चर' आगबोटीतून त्याचे शव झांझिबारला नेण्यात आले लिव्हिंग्स्टनवर सिंहाने केलेल्या हल्ल्यात त्याच्या खांद्याला जखम केली होती त्या जखमेवरून ते शव लिव्हिंग्स्टनचेच आहे याबद्दल खात्री करून घेण्यात आली

नतर ते शव इग्लडला नेण्यात आले आणि १८ एप्रिल १८७४ रोजी त्याचे वेस्ट मिनिस्टर ॲबेमध्ये सन्मानपूर्वक दफन करण्यात आले. तो दिवस इग्लडमध्ये शोकदिन म्हणून पाळण्यात आला

★

प्रकरण आठवे

## संशोधकाचा सरदार-- स्टॅन्ले

आफ्रिका खडामध्ये एकदा सशोधक जाऊन आला की त्याला पुन. पुन्हा जावेसे वाटते अनेक सशोधकांची अशी स्थिती झाली आहे तेथील लोकांच्या रानटीपणाबद्दल व खालावलेल्या नीतिमत्तेबद्दल त्यांनी आपल्या पुस्तकात तिरस्काराने लिहिले आहे तरीही आफ्रिकेबद्दल त्याना ओढ वाटत राहते तेथील निसर्गसौंदर्याची कोणीच दखल घेताना दिसत नाही ! लांबवर पसरलेली हिरवी मैदाने आणि तेथील क्षितीजावर डोके वर काढणारे निळे पर्वत आणि सुदर निसर्गात स्वच्छद विहरणारे वन्य प्राण्यांचे कळप याकडे कोणाचे लक्ष गेलेले दिसत नाही

डॉ स्वाईनफर्थ हा शांत स्वभावाचा सशोधक होता तो लिहितो, 'येथील वन्य जमातीच्या थव्याचे नग्न दर्शन घडले की, कोणीही मनुष्य भांवावून जातो आपले सुसस्कृत जग मागेच राहिले आहे याची त्याला आठवण होते ' इतर सशोधकांप्रमाणेच स्वाईनफर्थही युरोपातून पुन्हा आफ्रिकेच्या मोहीमेवर निघालाच प्रत्येक सशोधकाचे आपली मोहीम हाती घेण्याचे हेतू भिन्न भिन्न होते. परतु सर्वांमध्ये आफ्रिकेची ओढ आणि भटकतीची लागलेली चटक ही सर्वसामान्य होती.

परतु या सर्व सशोधकाहून स्टॅन्ले निराळाच होता. तो केवळ सशोधक नव्हता त्याला व्यापार करावयाचा होता, आणि जमले तर राज्यही स्थापावयाचे होते तो आपल्या प्रत्येक मोहीमेकडे एक व्यापारी साहस म्हणूनच पहात असे तो तेथे आफ्रिकन लोकांना सुधारायला गेला नव्हता किंवा शास्त्रीय विषयावर सशोधनही त्याला करावयाचे नव्हते. त्याला पैसा

आणि कीर्ती हवी होती ! आणि तरी सुद्धा जें साधायचे त्याच्या मनात नव्हते असे संशोधन त्याने केले आफ्रिकेत राज्य स्थापन केले आणि मिशनऱ्याचे अनेक जथे पाठवून त्यांच्या धर्मप्रचाराला वाव दिला

स्टॅन्लेचे हेतूच वेगळे असल्याकारणाने त्याने इंग्लंडशी कधीच निष्ठा दाखवली नाही जो आपल्याला मदत करेल त्याच्यावरोबर तो तात्पुरते जमवून घेई त्याने 'न्ययॉर्क हेरॉल्ड या वर्तमानपत्रासाठी आफ्रिकेत काम केले त्याप्रमाणे बेल्जमच्या राजाचा प्रतिनिधी म्हणूनही त्याने काम केले त्याच्या या अस्थिर स्वभावामुळे त्याला बरेच शत्रू निर्माण झाले आणि मित्र कोणीही नव्हते. पण त्याला मित्रांची जरुरीच नव्हती त्याची पुस्तके पुष्कळच लोकप्रिय होती. आणि त्यातून तो सूक्ष्म निरीक्षणातून काढलेले निष्कर्ष लिहित असल्यामुळे त्या पुस्तकाबाबत वाद निर्माण झाले नाहीत

१८७४ मध्ये स्टॅन्ले आपल्या सर्वांत मोठ्या आफ्रिकेच्या मोहीमेवर गेला. लिव्हिंग्स्टनच्या मृत्यूनंतर त्याचे राहिलेलें कार्य पूर्ण करण्यासाठी त्याने ही मोहीम काढली होती स्टॅन्लेला तीन उद्दिष्टे साधावयाची होती डॉ स्वाईनफर्थने आपल्या ' द हार्ट ऑफ आफ्रिका ' या पुस्तकात असे प्रतिपादन केले होते की व्हिक्टोरिया सरोवर एक नसून ती निरनिराळी पाच सरोवरे आहेत. तेव्हा सरोवराला प्रदक्षिणा घालून ते एक सरोवर आहे की पाच ते नक्की ठरवायचे होते. शिवाय रिपन धबधबा हा एकच प्रवाह त्यातून बाहेर पडतो की आणखी काही, हे ठरवायचे होते त्याच-प्रमाणे टांगानिका सरोवरालाही प्रदक्षिणा घालून पाहावयाची होती तसेच लुलाबा नदीचे लिव्हिंग्स्टनचे संशोधन पूर्ण करावयाचे होते या तीन कामा-साठी स्टॅन्ले निघाला होता

प्रथम त्याने ' न्यूयॉर्क हेरॉल्ड ' आणि लंडनचे ' डेली टेलिग्राफ ' या वर्त-मानपत्राकडून मोहिमेस आर्थिक सहाय्य मिळवले मध्य आफ्रिकेसबंधी उपलब्ध असलेली सर्व माहिती वाचून काढली या विषयावरची १३० पुस्तके विकत घेतली सामान्य कामगार वर्गातील तरुण सेवक त्याने निवडले ते एखाद्या सैनिकाप्रमाणे आज्ञाधारक होते आणि पुस्तके लिहून त्यांनी केव्हाच वाद निर्माण केला नसता. पाच कुत्रे विकत घेतल्यानंतर आपल्या

सेवकासह ऑगस्ट १८७४ मध्ये स्टॅन्ले इंग्लडहून मोहीमेवर निघाला. त्याची मोहीम झांझिबारहून नोव्हेंबर १८७४ मध्ये बाहेर पडली आजवरच्या मोहिमेपेक्षा सर्वात जास्त माणसे आणि साहित्य सामग्री स्टॅन्लेच्या या मोहीमेजवळ होती त्याने सरोवरात फिरण्यासाठी चाळीस फूट लांबीची बोट सुटया भागात तयार करून घेतली होती सर्व साहित्याचे वजन आठ टन होते आणि सर्व मिळून ३५६ माणसे मोहिमेत होती त्यांचा हा जथा चालू लागला की, अर्ध्या मैलाची रांग चालू होई स्टॅन्ले साडेतीन महिन्यात व्हिक्टोरिया सरोवराजवळ पोहचला तोपर्यंत जथ्यातील शंभर माणसे कमी झाली होती काही हमाल पळून गेले. काही आजारपणाने मेले, आणि काही स्थानिक टोळीवाल्यांच्या चकमकीत मारले गेले एडवर्ड कोका नावाचा इंग्रज सेवकही तापाने वारला स्टॅनलेच्या सर्वच मोहिमेचा असाच साचा होता तो जलद प्रवास करे. विरोध करणाऱ्या आफ्रिकी टोळयांवर गोळीबार करून त्याना मारून टाकी त्याच्या मोहिमेतील बहुसंख्य सहकारी व हमाल मरण पावत ! पण शेवटी उद्दिष्टे साध्य झालेली असत त्यांच्या मोहिमेतील युरोपियन सहकारी क्वचित जिवत परत आले !

त्यांची मोहीम व्हिक्टोरिया तलावाच्या दक्षिण किनाऱ्यावर मॉंझाजवळ पोहचली सोळा वर्षापूर्वी स्पेकही येथेच पोहचला होता. त्याने बरोबर आणलेली सुटया भागांची ' लेडी ॲलिस ' ही बोट जोडली त्याने आपले दोन इंग्लिश सेवक आणि मोहीमेतील इतर लोक याना किनाऱ्यापाशीच थाबायला सांगितले आणि अकरा आफ्रिकन सहकारी निवडून घेऊन तो आठ मार्च १८७५ रोजी बोटीत बसून व्हिक्टोरिया सरोवराला प्रदक्षिणा घालायला निघाला पूर्व किनाऱ्याने तीन आठवडे प्रवास केल्यानंतर तो रिपन धबधब्याजवळ आला तेथे मुटेसाचा वकील भेटी घेऊन त्याला भेटायला आला होता त्याचेबरोबर स्टॅन्ले पाच एप्रिल १८७५ रोजी मुटेसाच्या दरबारात पोहचला.

स्पेकने मुटेसाला भेट दिली त्याला बरीच वर्षे झाली होती मुटेसाचे राज्य आता व्हिक्टोरिया सरोवराच्या उत्तर आणि पश्चिम किनाऱ्यावर १५० मैल पसरले होते, लोकसंख्या वाढून तीस लाख झाली होती. मुटेसा

आता चाळीशीचा होता त्याने पाहुण्याबरोबर हस्तादोलन केले. आणि स्वाहिली भाषेत त्याचे स्वागत केले. त्याने आपली राजधानी रुबेगा येथील टेकडयावर नेली होती. पाहुण्यांसाठी उत्तम झोपडया होत्या. आता तेथे बंदूक नवलाईची राहिली नव्हती मुटेसा दीड लाखाचे सैन्य गोळा करू शकत होता शिवाय त्याच्याजवळ व्हिक्टोरिया सरोवरात लढाऊ होडयाचा ताफाही होताच. त्याचा जनानखाना आणखी जास्त वाढला होता. स्टॅन्लेच्या अंदाजाप्रमाणे त्याला दोनशे बायका होत्या त्याच्या दरबारात बऱ्याचशा परदेशी वस्तू दिसत होत्या पूर्वीप्रमाणे भर दरबारात मनुष्यवध करणे बंद झाले होते. या सगळयामुळे स्टॅन्लेवर चांगला प्रभाव पडला स्पेकने मुटेसाचे जे वर्णन केले होते त्या रानटीपणाचा मागमूसही नव्हता. मुटेसाची मते मुसलमान धर्माकडे वळलेली पाहताच स्टॅन्लेने त्याला ख्रिश्चन धर्माची सथा द्यायचे ठरवले, आणि त्याला बायबल वाचून दाखवण्यास सुरुवात केली मुटेसाने थोडासा उत्साह दाखवला

खरे पाहिले तर मुटेसात फारसा फरक पडला नव्हता १९ वर्षं राज्य केल्यानंतर राजकारणात तो मुरला होता मध्य आफ्रिकेच्या जगाबाहेर सामर्थ्यवान राष्ट्रे आहेत, आणि त्यांच्याशी मैत्री केल्यास आपल्याला बंदूका व दारुगोळा मिळू शकतो हे त्याला समजले होते ! म्हणून तो युरोपियन पाहुण्याचे चांगले स्वागत करे आदल्यावर्षीच उत्तरेकडून चैले लाँग नावाचा एक गोरा पाहुणा गॉर्डनपाशा कडून प्रतिनिधी म्हणून भेटायला आला होता त्याच्या सन्मानार्थ मुटेसाने भर दरबारात तीन माणसाचे बळी दिले होते गॉर्डनपाशा पुन्हा त्याच्याकडे एक वकील पाठवणार होता

त्यामुळेच सध्या मुटेसाच्या दरबारात शांततेचे आणि मैत्रीचे वातावरण होते स्टॅनलेच्या व त्याच्या रोज भेटी होत असत इतक्यात गॉर्डनकडून येऊ घातलेला वकील आलाच गार्डनच्या नोकरीतील तो सिनान्ट बेलेफॉन्ड नावाचा फ्रेंच होता तो भेटल्यामुळे स्टॅनलेला फार आनंद झाला स्टॅनलेचे 'डेलो टेलिग्राफ 'साठी लिहिलेले बातमीपत्र पुढे पाठवण्याचे त्यानी मान्य केले त्या लेखातून मध्य आफ्रिकेत मिशनरी पाठवण्यासाठी आवाहन स्टॅन्लेने केले होते नंतर बेलेफॉन्ड गोंडोकोरोकडे परतला आणि स्टॅन्लेने

सरोवराची प्रदक्षिणा पुढे चालू केली

६ मे १८७५ रोजी व्हिक्टोरिया सरोवराला हजार मैलांची प्रदक्षिणा घालून स्टॅन्‌ले म्वान्झा येथे परत आला. या प्रदक्षिणेला त्याला ५७ दिवस लागले व्हिक्टोरिया सरोवर हे एकच सरोवर होते पाणी बाहेर जाण्याचा मार्ग रिपन धबधबा हा एकच होता आणि कागेरा नावाची नदी पश्चिमेकडून सरोवराला मिळत होती. ते सर्व आता पुराव्याने सिद्ध होत होते शेवटी स्पेकचे म्हणणे खरे ठरले स्टॅन्‌लेने आपल्या लेखातून व्हिक्टोरिया सरोवराच्या आणि रिपन धबधब्याच्या शोधाचे श्रेय स्पेकलाच दिले

स्टॅनलेचे दुसरे उद्दिष्ट टागानिका सरोवराचे शोध घेण्याचे होते तसेच अल्बर्ट सरोवराचा इतर सरोवराशी सबंध आहे काय हे ठरवायचे होते. म्हणून मोहिमेतील सर्व लोक होड्यांत बसून व्हिक्टोरिया सरोवरातून पलीकडे निघाले म्वान्झा येथे स्टॅन्‌लेचा आणखी एक सहकारी मरण पावला होता व बरेच लोक सोडून गेले होते, पण मुटेसा त्याना सर्व मदत देणार होता


व्हिक्टोरिया सरोवरात बंबिरे नावाचे मोठे बेट आहे. तेथील आदिवासींनी पूर्वीच्या प्रवासात स्टॅन्‌लेला त्रास दिला होता. त्याचा सूड आता स्टॅन्‌लेला उगवायचा होता त्याचवेळी मुटेसाच्या लढाऊ होड्या स्टॅन्‌लेलाच पाहायला आल्या होत्या त्या सर्वांनी मिळून बेटावर हल्ला करायचे ठरवले. बंबिरे बेटावरचे २ ते ३ हजार भालाईत हल्ल्याला तोंड देण्यास त्याच्या पद्धतीप्रमाणे किनाऱ्यावर जमले होते स्टॅनलेने योग्य जागा शोधली आणि त्या आदिवासींवर तुफान गोळीबार केला आदिवासी पैकी थोडेसे पळून जाऊ शकले तेवढे वाचले. बाकीचे सर्व जागच्या जागीच ठार झाले !

स्टॅनलेने प्रवास सुरू ठेवला आता मुटेसा स्वत येऊन त्यांना मिळाला होता. त्या दोघांनी रिपन धबधब्याजवळच्या एका बेटावरील बडखोराची अशीच कत्तल करून टाकली त्याने आपला मूळ हेतू सोडून अशा कत्तलीत का भाग घेतला हे समजत नाही. त्यामुळे मुटेसाची मैत्री त्याला मिळाली पण त्यामुळे फारसे साधले असे नाही. स्टॅनले लिहितो 'या रानटी लोकाना फक्त सामर्थ्याची आणि धैर्याचीच भाषा समजू शकते ' अशा कत्तलीत

भाग घेतल्यामुळे इंग्लंडमध्ये स्टॅन्‌लेबद्दल प्रतिकूल मत झाले.

आपल्या मोहिमेसाठी माणसाची आणि साहित्याची मुटेसाने देऊ केलेली मदत त्याने मदत त्याने स्वीकारली आणि तो अल्बर्ट सरोवराकडे न जाता दक्षिणेकडे कराग्वे राज्याकडे शिरला तेथे त्याला रुमानिका राजा भेटला तो आता म्हातारा झाला होता आणि आजारी होता. स्टॅन्‌ले तेथून गेल्यावर आजारपणाला कटाळून त्याने आत्महत्याच केली.

एक महिना विश्रांती घेऊन स्टॅनले दक्षिणेकडे टांगानिका सरोवराच्या




**स्टॅन्‌लेची दुसरी मोहीम**

रोखाने निघाला तो जेव्हा उजीजीला पोहचला, तेव्हा सरोवर पाहून त्याला आश्चर्य वाटले. सरोवराची पाण्याची पातळी खूपच वाढली होती १८७१ मध्ये तो लिव्हिंग्स्टनबरोबर येथे आला तेव्हा बाजारपेठेतील माडाची तीन झाडे आता पाण्यात बुडुन गेली होती किनारा २०० फूट वर सरकला होता यावरुनच सिद्ध होत होते की, टागानिका सरोवरातून कोणतीही नदी उगम पावत नव्हती ! जून १८७६ मध्ये स्टॅन्लेने आपली बोट पुन्हा जोडली आणि त्यात बसून टागानिका सरोवराला प्रदक्षिणा घालून तो परत उजीजी येथे आला त्या सरोवरातून नाईल नदी उगम पावत नव्हती हे आता नक्की ठरले. याही बाबतीत बर्टनचे म्हणणे खोटे ठरले आणि स्पेकच खरे सांगत होता हे नक्की झाले

आता स्टॅन्लेचे तिसरे काम शिल्लक राहिले लिव्हिंग्स्टनने सोडलेली लुलाबा नदी कोठे जाऊन मिळते हे ठरवायचे होते ऑगस्ट १८७६ मध्ये या मोहिमेवर येऊन त्याला दोन वर्षे होत होती आता शेवटचे उद्दिष्ट साधण्यासाठी तो या धाडसी मोहिमेवर निघाला त्याचा जथा आता निम्माच राहिला होता

आफ्रिकेच्या अनेक साहस मोहिमामध्ये स्टॅन्लेचा लुलाबा आणि कांगो नदीतून अटलांटिक महासागराकडे केलेला हा प्रवास अद्वितीय आणि अजोड आहे ! कित्येक महिने ही नदी आपल्याला कोठे घेऊन जाणार हे त्याला समजत नव्हते कदाचित ती नाईलला मिळाली असती किंवा स्टॅन्-लेला एखाद्या अज्ञात प्रदेशात घेऊन गेली असती ! एकदा त्या नदीत नाव घातल्यानंतर नदी जिकडे नेईल तिकडे जाणे त्याला भाग होते या सर्व प्रवासाचे वर्णन त्याने 'थ्रू द डार्क कॉन्टिनंट' या पुस्तकात केले आहे या प्रवासात त्याला सर्व प्रकारच्या संकटांना तोंड द्यावे लागले त्याची नाव फुटली उपासमार झाली सर्व साहित्यसामुग्री नष्ट झाली नदीकाठच्या रानटी टोळ्यांनी त्याच्यावर अनेकदा हल्ले चढवले आणि त्याचा शिल्लक राहिलेला शेवटचा युरोपियन सहकारी बुडून मेला ! झांझिबार सोडल्यानंतर ९९९ दिवसांनी त्यांचा जथ्था अर्धमेल्या अवस्थेत कांगोच्या मुखाजवळ येऊन

पोचला तेथील युरोपियन व्यापाऱ्यांनी अन्नसामुग्री व इतर मदत देऊन त्यांना ताजेतवाने केले. झांझिबारहून निघालेल्या ३५६ लोकांच्यापैकी ११४ लोक कांगोच्या मुखापर्यंत पोहचले. त्या सर्वांना समुद्रमार्गे झांझिबार-ला नेण्यात आले.

स्टॅनलेच्या या प्रवासापूर्वीच खार्टूममधील जनरल गॉर्डनच्या लोकांनी नाईल नदीच्या उगमापासून सुदानपर्यंतचा प्रवाह शोधून काढला होता. चैले लाँगने उगमापासून ते मध्य युगांडातील करूमा धबधब्यापर्यंतचा नाईलचा प्रवाह शोधुन नकाशाबद्ध केला होता. आणि त्याचवेळी त्याने कायोगा सरोवर शोधून काढले होते. रोमोनो गेसी या इटालियनाने अल्बर्ट सरोवराला प्रदक्षिणा घातली होती. आणि तेथून निघणारा नाईलचा फाटा शोधला होता

परतु स्टॅनलेने सर्वात महत्त्वाचे सशोधन केले होते. त्यावेळी भूगोल शास्त्रज्ञापुढे असलेल्या सर्व प्रश्नाची उत्तरे आता मिळाली होती. लुलाबा नदी कांगो नदीला मिळत होती आणि शेवटी अटलांटिक महासागरात जात होती नाईल नदी व्हिक्टोरिया सरोवरात उगम पावत होती आणि उत्तरे-कडे वाहत जाऊन भूमध्य समुद्राला मिळत होती. तसे पाहिले तर व्हिक्टो-रिया सरोवरात पाणी आणणारी कागेरा नदी ही नाईल नदीचा उगम म्हणता येईल आणि या नदीला टांगानिकाच्या उत्तरेकडे सहा हजार फूट पर्वतावरील पाणी मिळत होते या दृष्टीने बर्टनचे म्हणणे बरोबर होते पण या तऱ्हेने वादच करावयाचा ठरला तर कोणत्याही नदीचा उगम आका-शात होते असे म्हणावे लागेल ! कारण तेथूनच सर्व नद्यांना पाणी मिळते ! परतु नाईल नदीचा खरा प्रवाह रिपन धबधब्यापासून सुरू होतो ( जल-विद्युत योजनेमुळे आता रिपन धबधबा इतिहासजमा झाला आहे ) तेथून उत्तरेकडे तो प्रवाह कारुमा आणि मर्चिसन धबधब्यातून अल्बर्ट सरो-वराला मिळतो आणि तेथून उत्तरेकडे निघून सुदच्या दलदलीतून खार्टूम-जवळ निळया नाईलला मिळतो येथून काही हजार मैल वाळवटातून जाऊन नाईल नदी भुमध्य समुद्राला मिळते

स्टॅन्ले मोहिम आटपून झांझिबारला परतला तोपर्यंत नाईल नदीच्या शोधाचा काळ मानला जातो. अनेक सशोधकाच्या प्रयत्नामुळे ही नवीन विस्तीर्ण आणि विशाल भूमी पाश्चात्यांना उपलब्ध झाली होती अश्मयुगात राहणाऱ्या रानटी टोळयांच्या या प्रदेशात सुसंस्कृत पाश्चात्यानी साम्राज्याच्या आणि व्यापाऱ्यांच्या तृष्णेमुळे कसा नगानाच घातला हे पाहणे मनोरजक ठरेल

★

## प्रकरण नववे

# १८७० मधील सुदान

१८७० च्या सुमारास इजिप्तचा खेदिव इस्माईल वैभवाच्या शिखरावर होता १८६९ मध्ये त्याचे वय ३९ वर्षांचे होते आणि राज्यावर येऊन त्याला सहा वर्षे झाली होती. तात्त्विक दृष्ट्या तो कॉन्स्टंटिनोपलच्या ऑटोमान साम्राज्याचा प्रतिनिधी होता पण प्रत्यक्षात इजिप्तवर त्याची अनियंत्रित सत्ता होती त्याचेकडे विपुल संपत्ती जमा झाली होती आणि तो त्या संपत्तीची उधळपट्टीही भरमसाट करत असे

त्याचे व्यक्तिमत्व आकर्षक होते. ज्या युरोपियनांनी त्याच्या हाताखाली काम केले त्यांनी खेदिव इस्माईलची भलावणच केली आहे बेकर आणि गॉर्डन या दोघांचाही त्याच्यावर विश्वास होता इस्माईलला दोन उद्दिष्टे साधावयाची होती इजिप्तमध्ये पाश्चात्य सुधारणा आणावयाच्या हाच्या आणि पूर्व मध्य आफ्रिकेत इजिप्तचे साम्राज्य स्थापावयाचे होते ही दोन्ही उद्दिष्टे पूर्ण करण्यात बेकरने आणि गॉर्डनने त्याला चांगली साथ दिली

इस्माईल १८६३ मध्ये चुलत्याच्या मागे राज्यावर आला त्यावेळी इजिप्तची आर्थिक परिस्थिती भरभराटीची होती अमेरिकन यादवी युद्धामुळे इजिप्तमधील कापसाची किंमत वाढून पन्नास लाख पौंडाऐवजी अडीच कोटी पौंड मिळू लागले होते इस्माईलने आपली खाजगी कर्जे सरकारकडे बदली केली आणि कर वाढवले सध्याचे खनिज तेलामुळे समृद्ध झालेले शेख जशी उधळपट्टी करतात त्याप्रमाणे इस्माईल खर्च करत असे बेकर

आणि गॉर्डनमारखे काही प्रामाणिक लोक सोडले तर अनेक लबाड लोक इस्माईलचा पैसा कमी करायला त्याचेभोवती जमले होते । अशा रितीने वागल्यास त्याचे एक दिवस दिवाळे वाजणार हे उघड होते

पण हे आर्थिक संकट यायला अवकाश होता आपली संपत्ती वापरून खेदिवला पाश्चात्य सुधारणा आणावयाच्या होत्या नवीन कालवे, पोष्टाची स्थापना, साखरेचा एकाधिकार उद्योग, अशी कामे त्याने हाती घेतली. त्याने आबादीन राजवाडा बांधला आणि कैरोची सुधारणा करून त्या शहराचा चेहरा त्याने बदलून टाकला. रेल्वे बांधणीची सुरुवात केली आपला सर्व लवाजमा घेऊन तो युरोपला भेटी देऊ लागला

१८६९ मध्ये आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याची व हौसमौज भागवण्याची उत्तम संधी त्याला मिळाली सुवेझ कालवा आता पूर्ण झाला होता या कालव्याचा उद्‌घाटन समारंभ थाटाने साजरा करावा आणि जगाला इजिप्तचे महत्त्व पटवून द्यावे असा त्याने बेत केला. हा कालवा इजिप्तने खोदलेला नव्हता पण इंजिनियर फर्डिनंड द लेसेप्स याने कालव्यासाठी जी कंपनी १८५४ मध्ये स्थापली होती त्यामध्ये इजिप्तचे बरेचसे शेअर्स होते कंपनीने कालवा नव्याण्णव वर्षे ताब्यात ठेवायचा होता त्यानंतर तो इजिप्तच्या मालकीचा होणार होता लेसेप्सला सुरुवातीपासूनच सगळ्या बाजूनी अडचणी आल्या अनेक लोक हा कालवा होणे शक्य नाही, असे म्हणाले होते नेपोलियनने जेव्हा १७९८ मध्ये इजिप्तवर स्वारी केली होती तेव्हा या कालव्यासाठी पाहणी करावयाचा आदेश त्याने दिला होता. नेपोलियनच्या इंजिनियरांनी पाहणी करून सांगितले की भूमध्य समुद्र आणि तांबडा समुद्र यांच्या पातळीत ३३ फुटाचा फरक आहे त्यामुळे ही कल्पना सोडून देण्यात आली वास्तविक समुद्राची पातळी सगळीकडे सारखीच असते । पण हे सिद्ध झालेले नव्हते कालवा खणायला अठ्ठावीस कोटी सत्तर लाख फ्रँक खर्च आला मूळ अंदाजापेक्षा हा खूपच जास्त होता काम संपवायला सहा वर्षांच्या ऐवजी दहा वर्षे लागली ब्रिटिश भांडवलदारांना या कामात रस नव्हता भांडवलाचा पुरवठा फ्रान्स आणि तुर्कस्थान येथील सावकारांनी केला इजिप्तला ४० टक्के शेअर्स मिळावयाचे होते.

हा कालवा खोदायला राजकीय कारणामुळे विरोध झाला ज्या राष्ट्राचा जास्तीत जास्त फायदा या कालव्यामुळे पुढच्या काळात झाला, त्या इग्लडने कालव्याला विरोध करावा त्याचे आज आश्चर्य वाटते परतु इग्लडचा त्यावेळचा पतप्रधान पार्मस्टन याला हा कालवा म्हणजे फ्रेंचाचा मध्यपूर्वेतील हस्तक्षेप वाटत होता फरान्समध्ये सुद्धा कालवा अनावश्यक आहे असे मानणारे होते कालवा होण्यापूर्वी अलेक्झाड्रिया बदरापर्यंत प्रवासी लोक बोटीतून येत तेथे रेल्वेत बसून सुवेझ बदरावर जात व पुन्हा बोटीत बसत ही व्यवस्था काय वाईट आहे असे काही लोक बोलत. त्यावेळचे एक भाकित मात्र खरे ठरले असा कालवा खणला तर तो कालवा राजकीय प्रश्न निर्माण करेल व ती युद्धभूमी बनेल हे भाकित मात्र पूर्णांशाने खरे ठरले

पण लेसेप्सच्या उत्साहाला अत नव्हता त्याने पैसे जमवले आणि सपूर्ण योजना तयार केली. ( हा कालवा शभर मैल लाबीचा आहे त्याची तळात रुदी २२ मीटर व खोली ८ मीटर आहे ) खेदिवाने वेठबिगारीने त्याला मजूर पुरवले काम होत गेले तसतशा तात्रिक अडचणी उपस्थित होऊ लागल्या त्यावर उपायही सापडू लागले. कोरड्या जमिनी खणण्यापेक्षा पाणी सोडून ओल्या केलेल्या जमिनीत खोदकाम करणे सोपे जाते असे आढळले कॉलऱ्याच्या साथीमुळे खूप लोक दगावले आणि अनेकदा काम बद पडले. मध्यपूर्वेतील त्या वाळवंटात काम करणे फार कष्टाचे होते तरीही १८६९ सपत आल्यानतर कालव्याचे मुख्य काम सपत आले आणि टीकाकारांची तोंडे बद झाली.

सागरी शक्ती असलेल्या कुठल्याही राष्ट्राला या कालव्याकडे दुर्लक्ष करून चालणार नव्हते इग्लडला हा कालवा फारच महत्त्वाचा ठरणार होता. युरोपातून हिंदुस्थानच्या प्रवासाचे अतर निम्म्याने कमी होणार होते, त्यामुळे कोळशात बचत होणार होती हिंदुस्थान व अतिपूर्व या प्रदेशाचे सरक्षण करण्याचा जुना साचाच बदलून जाणार होता आशिया आणि आफ्रिकेच्या अविकसित प्रदेशात पाश्चात्य सुधारणा आता वेगाने पोहोचू शकणार होत्या इग्लडच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाचा मुद्दा होता सुवेझ कालवा फ्रेंच माणसाने बाधला होता आणि फरान्समधील पैसा त्यासाठी

वापरला गेला होता फ्रान्सच्या मनात याचा फायदा घेऊन ब्रिटिशांना इजिप्त आणि मध्यपूर्वेतून हुसकावून लावायचे होते. इजिप्तच्या राजकारणामध्ये हस्तक्षेप करण्याचा हक्क या कालव्यामुळे आपल्याला मिळाला आहे असे फ्रान्सला वाटत होते

खेदिव इस्माईलने कालव्याचे उद्घाटन भव्य प्रमाणात करावयाचे ठरविले अरेबियन नाइटस्मध्ये हरून–अल–रशिदच्या वैभवासारखे वैभव दाखवायचे त्याने ठरविले १७ नोव्हेंबर १८६९ रोजी कालव्याचे उद्घाटन होणार होते आणि हा सोहळा सुवेझ कालवा व कैरो या दोन्ही ठिकाणी चार दिवस चालणार होता कैरोमध्ये त्याने नाटचगृह बांधले आणि उद्घाटना-निमित्त एक नवीन नृत्यनाटचाचा प्रयोग बसविण्यात आला कैरोतील जमिनी विकून उद्घाटन समारंभासाठी पैसे उभे करण्यात आले मॅग्नेशियम ताराच्या प्रकाशाने पिरॅमिडवर रोषणाई करण्यात आली. पोर्ट सैद येथे तीन मंडप उभारले खास पाहुण्याकरिता एक, मुसलमान सरदारांकरिता दुसरा आणि ख्रिश्चनाकरिता तिसरा मंडप एकंदर सहा हजार पाहुणे आले होते त्याची सरबराई करण्यासाठी फ्रान्स व इटली येथून पाचशे आचारी आणले होते उत्तमातील उत्तम भोजन आणि सर्वोत्तम मद्य पाहुण्यांना दिले गेले ईस्मालिया येथे नवीन शहरच वसवले गेले राजवाडा व हॉटेले यांच्या इमारती तयार झाल्या ईस्मालिया कालव्याच्या मध्यभागी होते पोर्ट सैदहून प्रमुख पाहुण्यांना घेऊन जहाजांचा तांडा ईस्मालिया येथे येणार होता तसाच एक तांडा अरबी समुद्रातून व सुवेझ येथून उत्तरेकडे निघून ईस्मालियाला येणार होता अशा तऱ्हेने ईस्मालिया येथे अरबी समुद्र व तांबडा समुद्र जोडले जाणारे होते. पोर्ट सैदला उद्घाटनाचे वेळी प्रचंड दारूकाम होणार होते

अशा प्रकारचा प्रचंड व गुंतागुंतीचा उद्घाटनचा कार्यक्रम सुरळीत पार पाडु शकेल अशी यंत्रणा व व्यवस्था इजिप्तमध्ये नव्हती. त्यामुळे ऐन वेळी काही घोटाळे झालेच ! दारूकामासाठी जी रोषणाईची दारू साठविली होती तिचा गुदामातच स्फोट झाला आणि पोर्ट सैदमधील बऱ्याचशा

इमारती पडल्या. शेवटच्या क्षणी कालव्यात एक बोट बुडाली आणि काल-व्याच्या मार्गात अडथळा निर्माण झाला. लेसेप्स तिकडे धावला आणि त्याने ती बोट सुरुंग लावून उडविली आणि मार्ग मोकळा केला.

१७ नोव्हेंबरला सर्व तयारी पूर्ण झाली. पोर्ट सैदजवळ बऱ्याच बोटी जमल्या होत्या. त्या बोटी व शहर शृंगारले होते. कालव्याला मुस्लीम, कॅथॉलिक आणि ग्रीक धर्मगुरुंचे शुभाशीर्वाद घेण्यात आले. जितक्या तोफा उपलब्ध होत्या त्या सर्व तोफांची सलामी देण्यात आली. वीस लष्करी वाद्यवृंद एकाच वेळी वाद्यांचा गजर करू लागले आणि सलामीच्या तोफांचा धूर दाटला असतानाच फ्रान्सची महाराणी युजिनी हिची शाही नौका प्रथम कालव्यात शिरली. त्या नौकेच्या मागोमाग खेदिव इस्माईल आपला सर्व राजवेष आणि मौल्यवान रत्ने घालून आपल्या नौकेतून निघाला. त्या मागोमाग ऑस्ट्रियाचा सम्राट आणि इतर राजेरजवाडे होते. एकंदर सत्तर जहाजांचा तांडा कालव्याचे उद्‌घाटन करण्यासाठी कालव्यामध्ये शिरला.

संध्याकाळपर्यंत हा तांडा इस्मालियाला पोहोचला. थोड्या वेळात सुवेझ-कडून तसाच पण लहान तांडा इस्मालियाला आला. आफ्रिकाखंड आता बेट झाले आहे असे समारंभपूर्वक जाहीर करण्यात आले. नंतर पाहुणे जहाजा-वरून उतरले व त्यांना मेजवानी देण्यात आली. प्रचंड दारूकाम झाले. तेथील शामियानामध्ये दहा हजार बत्त्या लावण्यात आल्या होत्या. इस्मा-लिया येथे असताना महाराणी युजिनने उंटावर बसण्याची मौज अनुभवली. नंतर हा तांडा तांबड्या समुद्राकडे गेला.

या सर्व शाही पाहुण्यांत इंग्लंडच्या राजघराण्यापैकी कोणी नव्हते आणि ते अपेक्षितच होते. काही महिन्यापूर्वीच प्रिन्स ऑफ वेल्सने इजिप्तला भेट दिली होती. त्या वेळी त्यांनी कालव्यामधील बिटर सरोवराची दारे उघड-ण्याचा समारंभ पाहिला होता. त्या वेळी भूमध्य समुद्राचे पाणी सरो-वराच्या गोड्या पाण्यात शिरले. त्या समुद्राच्या पाण्याबरोबर माशांचे थवेही आले. गोड्या पाण्यातील मासे मात्र ताबडतोब मेले. त्याच भेटीच्या वेळी बेकर पत्नीसह तेथे आला होता. अरबी भाषेच्या ज्ञानामुळे प्रिन्स ऑफ वेल्सचा दुभाषा म्हणून काम करण्यासाठी त्याला बोलावून घेतले होते. त्या वेळी

लेसेप्सने दिलेल्या एका मेजवानीच्या प्रसंगी खेदिव इस्माईलने बेकरला एका बाजूला बोलावले आणि अतिशय महत्त्वाचा प्रस्ताव त्याच्यापुढे मांडला. इस्माईलने त्याला सांगितले की, ' नाईल नदीचा उगमाकडील विषुववृत्तीय प्रदेश इजिप्तला जोडुन देण्यासाठी आणि गुलामाचा व्यापार नष्ट करण्यासाठी मी एक लष्करी मोहीम काढणार आहे तू त्या लष्करी मोहिमेचे नेतृत्व स्वीकारशील काय ?'

नोकरीच्या अटी फारच आकर्षक होत्या. बेकरला 'पाशा' ही पदवी मिळणार होती व मेजर जनरल करण्यात येणार होते. बाकीचे सैनिक अधिकारी बेकरने निवडावयाचे होते एकदर चार वर्षांचा हा करार होता. व त्याला दरवर्षी १० हजार पौंड म्हणजे २ लाख रुपये पगार मिळणार होता सैन्याच्या तुकडीत १७०० जवान राहणार होते. तुकडीसाठी लागणारी शस्त्रे व इतर सामुग्री खरेदी करण्याचे सर्व अधिकार बेकरलाच मिळणार होते

राजकारणात मुरलेल्या माणसाला या अटींमधील लबाडी समजली असती उदाहरणार्थ खेदिव इस्माईलला गुलामाचा व्यापार मनापासून थांबवायचा होता का ? स्वत खेदिवाकडे शेकडो गुलाम होते विषुववृत्तीय प्रदेशात गुलाम पकडणाऱ्या व्यापाऱ्याना त्याने पैसे स्वीकारून ठेके दिले होते झांजीबारप्रमाणेच इजिप्तमध्येही गुलाम पाळणे व विकणे ही राजकर्त्या वर्गाची सवयीची बाब झाली होती, व त्यापासून त्याना मोठे उत्पन्नही मिळत होते गुलामगिरीविरुद्ध युरोपात आणि अमेरिकेत बरेच वातावरण तापवले गेले होते पाश्चात्यांचा पाठिंबा मिळवायचा असेल तर गुलामगिरी बद करण्याची मोहीम आपण सुरू केली आहे, असा बाह्य देखावा तयार करणे जरूर आहे, हे इस्माईलला समजले होते ! पाश्चात्याचा पाठिंबा त्याला जरूरीचा वाटत होता त्याला त्यांच्याकडून पैसा कर्जाऊ हवा होता. आणि दक्षिण सुदान व अबिसिनिया येथे आपले साम्राज्य वाढवण्यासाठी त्याला पाश्चात्याची मदत हवी होती आपले साम्राज्य पसरवताना तेथील नव्या जमातीची सुधारणा व विकास करत आहोत असा देखावाही त्याला करावयाचा होता

म्हणून अशा लष्करी मोहिमेला कोणी हरकत घेणार नाही, अशी त्याची

खात्री होती त्याने बेकरला दिलेले आमत्रण बेकरने स्वीकारले आणि इस्माईलनेही पैशाचा विचार न करता या लष्करी मोहिमेची तयारी सुरू केली बेकरने या प्रदेशात शिकारीसाठी आणि सशोधनासाठी अनेक दिवस काढले होते तेथेच तो आता प्रशासक व सैनिकी अधिकारी म्हणून जात होता.

बेकरबरोबर दहा युरोपीय अधिकाऱ्यांनी जायचे ठरविले त्यातच बेकरचा पुतण्या लेफ्ट ज्युलियन बेकर हाही होता मागच्या मोहीमेप्रमाणेच बेकरची पत्नी त्याच्याबरोबर या मोहीमेवर जाणार होतीच सर्व सैन्याच्या दोन तुकड्या राहणार होत्या. एक सुदानी सैनिकाची तुकडी आणि दुसरी इजिप्तशियन सैनिकाची तुकडी ( हे सर्व सैनिक कैरो येथील तुरुगामधील शिक्षा झालेले खुनी गुड होते, असे नंतर आढळून आले ! ) यातून पुढे बेकरने ४० नेमबाज आपले अंगरक्षक म्हणून निवडले त्याने या अंगरक्षकाना उत्तम गणवेश दिला आणि तो स्वत त्यांना ' बेकरचे चाळीस चोर म्हणू लागला ' त्याशिवाय २०० घोडेस्वाराची एक तुकडी आणि तोफखान्याची दोन पथके त्यानी उभी केली बेकरने इग्लडहून सुट्या भागात नेता येण्याजोग्या बोटी मागवल्या त्यांतील सर्वांत मोठी शभर फूट लांब व २५१ टन वजनाची होती दोन बोटी १०८ टनाच्या, व १३८ टनाच्या होत्या आणि दोन दहा टनाच्या लहान बोटी होत्या नऊहजार पौंड खर्च करून चार वर्ष पुरेल इतके सामान व दारूगोळा इग्लडमध्ये खरेदी करण्यात आला त्यामध्ये मुक्कामासाठी तबू, नळीचे जस्ती पत्रे, पन्नास हजार पौंड दारूगोळा, औषधे, गणवेश असे अनेक प्रकारचे सामान होते सुईपासून पहारीपर्यंत आणि हातरुमालापासून जहाजाच्या शिडापर्यंत सर्व सामान त्यात होते स्थानिक टोळीवाल्यांचे मनोरजन करायला खेळणी, ढोल व लोहचुबकही नेले होते

कैरोहून खार्टूमला नऊ आगबोटी व पचावन्न गलबते यातून सैनिक व सामान नेण्यात आले त्या शिवाय शेकडो उटांचा तांडा पाठवला होताच बेकर व त्याची पत्नी तांबड्या समुद्रमार्गे खार्टूमला गेली मध्य आफ्रिकेत एवढ्या मोठ्या प्रमाणात लष्करी मोहीम प्रथमच निघत होती अर्थातच इतके सामान नेण्यात घोटाळे झालेच. गुलाम पकडण्याचा व्यवसाय करणाऱ्या

लोकांच्या मनात या मोहिमेमुळे घबराट झालीच होती त्यांनी बरेच अडथळे आणले. सुवेझ कालव्याच्या उद्घाटनामुळे बोटी मिळायला विलंब झाला

तरीही फेब्रुवारी १८७० मध्ये बेकरने आपले सैनिक खार्टूमला एकत्र केले त्या काळाच्या मानाने प्रवासाचा हा वेग आश्चर्यकारक होता खार्टूमहून बेकर गोंडोकोरोला जायला सिद्ध झाला गोंडोकोरो येथे मुख्य ठाण्याजवळ बेकरने स्वत राहणे आवश्यक आहे असे त्याला वाटले.

मागच्या मोहिमेवर बेकर आला होता तेव्हा गुलामांचा व्यापार जोरात होताच पण यावेळी तो दहापट वाढलेला आढळला सर्व प्रदेश गुलाम-पकड्या अरबानी उद्ध्वस्त केला होता खुद्द खार्टूमला इजिप्शियन अधिकाऱ्यांनी जबरदस्त कर उकळणे सुरू केले होते या जुलमाला कटाळून खार्टूमची तीस हजाराची लोकसंख्या निम्मी झाली होती ! आजूबाजूच्या खेड्यातील आफ्रिकनांनी शेती करणे सोडून दिले होते कारण पीक आले की कोणीतरी बळकावून घेत असे नदी किनाऱ्याने ओसाड पडलेली शेती व स्तब्ध राहिलेली रहाटगाडगी दिसत असत

खार्टूमच्या दक्षिणेकडील प्रदेशातून नाईल नदीच्या मार्गाने दरवर्षी पन्नास हजार गुलाम पकडून आणत असत पधरा हजार अरब या व्यवसायात गुतले होते त्यातील काही व्यापारी स्वतत्र राजासारखे राज्य करीत आगाद नावाच्या व्यापाऱ्याने नव्वद हजार चौरस मैलात व्यापार करण्याची सनदच मिळविली होती आणि त्याने स्वत चे खाजगी सैन्य बाळगले होते. या सर्व लोकाना बेकर आपला शत्रू वाटला यात नवल नाही खार्टूममध्ये बेकरला काही अधिकार नव्हते. खार्टूमच्या दक्षिणेला विषुववृत्तीय प्रदेशाचे मात्र खेदिवाने त्याला सर्व अधिकार दिले होते. आणि तेथेच अरब गुलाम पकडत असत नदीतील बोट पकडून गुलामाना मुक्त करणे आणि त्यांना पकडणाऱ्या लोकाना अटक करणे हे काम बेकरला दिले होते. तो झटपट न्याय देऊन मृत्यूदडही देऊ शकत होता आठ फेब्रुवारी १८७० रोजी बेकर खार्टूमहून दक्षिणेला निघाला त्याचे बरोबर एक हजार सशस्त्र सैनिक होते. आणि ते कुठल्याही शत्रूला तोड देण्यास समर्थ होते

परतु नाईल नदीच आता बेकरचा प्रमुख शत्रू बनली ! त्याच्या पहिल्या

मोहीमेला पाच वर्षं झाली होती आणि सुद-गवताच्या दलदलीतील नदीचा मोकळा प्रवाह आता लुप्त होऊन गेला होता त्या दलदलीतून पाण्याचा मोकळा प्रवाह तयार करण्यासाठी बेकरचे सैनिक दोन महिने धडपडले पण ते थोडेसेच मैल पुढे जाऊ शकले बोटी पुढे गेल्या की वाहत येणारे गवताचे व चिखलाचे पुजके मागे एकत्र येत आणि त्यांची बेटे बनत अशी सभोवार बेटे तयार होऊन त्या बोटीला पुढे किंवा मागे कुठेच जाता येईनासे होई ! त्यातच एप्रिल महिन्यात नदीचे पाणी उतरू लागले तेव्हा बेकरने पुढे जाण्याचा बेत स्थगित केला आणि सध्याच्या मलाकाल शहराजवळ तो नदीतून उतरला आणि नाईल नदीला पूर यायची वाट बघू लागला

मलाकाल येथे त्याने सात महिने काढले या कालावधीत गुलाम घेऊन येणाऱ्या अनेक बोटी त्यानें पकडल्या डिसेंम्बर १८७० मध्ये नाईल नदीला पूर आल्यानंतर ५९ गलबते व १६०० सैनिक घेऊन बेकर पुन्हा दक्षिणेकडे निघाला पण प्रवासाला दोन महिने झाले तरी तो दलदलीतून बाहेर पडेना ! सगळीकडे गवत व चिखल माजला होता हवेत उष्णता फार होती अनेकदा बोटी बुडत, किंवा चिखलात अडकून बसत रात्री डासाचा फार त्रास असे जमिनीवर उतरून शेकोटी पेटवून धूर करून झोपले तरच झोप मिळे पण जमीन होती कुठे ? सगळीकडे पापीरस गवताची बेटे माजली होती व खाली दलदल व चिखल होता सध्या नाईल नदीच्या या दल-दलीतून बार- एल- जंबल हा पाण्याचा प्रवाह मोकळा केला आहे व येथून बोटीला जायला तीन दिवस लागतात तरीही हा प्रवास कंटाळवाणा होतो मग त्याकाळी तेथे महिनोंमहिने या डासाच्या साम्राज्यात त्यांनी कसे काढले असतील याची कल्पनाही करता येत नाही

मार्च १८७१ पर्यंत बेकरचे सैन्य या दलदलीतून बाहेर पडले नव्हते आणि आता बेकरचा आत्मविश्वासही ढासळू लागला होता बेकर आपल्या रोजनिशीत लिहितो

'आम्ही कुठे आहोत हे समजणे अशक्य होते मी तर सर्व आशा सोडली आहे इजिप्शियन सैनिकांनी जगण्याची आशा सोडली आहे कित्येकजण मरत आहेत डॉक्टर आजारी पडून पूर्वीच खार्टूमला गेला आहे. शेकडो लोकाना मलेरिया आणि हगवण झाली आहे पण उपचार करायला कोणी

नाही '

सुदैवाने बेकर व त्याची पत्नी याची प्रकृती मात्र चांगली राहिली

नऊ मार्च १८७१ ला नाईलचे पाणी उतरू लागले व बहुतेक बोटी चिखलात रुतल्या. परंतु त्याच दिवशी पाहणी करायला गेलेल्या एका बोटीने बातमी आणली होती की, बार एफ- जिराफ हा नदीचा मोकळा प्रवाह जवळच आहे बेकरला उत्साह आला आणि त्याने आपल्या दमलेल्या लोकाना पुन्हा एक प्रयत्न करायला सांगितला त्याच्या बोटी अडकल्या होत्या त्याच्या खालच्या भागात नदीमध्येच एक बधारा घालायला बेकरने सांगितले इमारत बांधणीसाठी त्याच्याजवळ लाकडाचे वासे होतेच ते त्यानी पुरायला सांगितले आणि त्यामध्ये माती व वाळूने भरलेल्या पिशव्या व गवताचे गठ्ठे एकदम भरावयाचे ठरले दोन दिवस १५०० सैनिक वाळूची आणि मातीची पोती भरत होते आणि मळखाचे आणि गवताचे गठ्ठे बाधत होते १३ मार्चला सर्व तयारी पूर्ण झाली

बेकर लिहितो, ' मी एका अडकलेल्या बोटीवर आणि रोवलेल्या लाकडी वाशाच्या जवळ उभा राहिलो. घोष पथकाने ब्युगूल व ड्रम वाजवून काम सुरू करण्याची खूण केली त्याबरोबर एका क्षणांत ५०० पोती २ वाशांच्या मध्ये पडली ती सैनिकानी पायानी तुडवून आत दाबली आता काम जोरात सुरू झाले सैनिक जोरजोरात ओरडत होते आणि घोषपथक ब्युगूल वाजवीत होते सैनिकाच्या दोन ओळी करून पोती नेली जात होती दुपारी दोन वाजून पधरा मिनिटांनी वाजता नदी बद झाली ! बधाऱ्याची उची सैनिकांनी आणखी थोडी वाढवली हा बधारा ११० यार्ड लांबीचा झाला होता पाण्याची पातळी वाढू लागली त्यामुळे काम करणाऱ्या लोकाना पोहावे लागले चिखलात रुतलेल्या बोटी आता पाण्यात तरगू लागल्या '

शेवटी एकदाच्या अडचणी सपल्या आणि एकेक बोट स्वच्छ प्रवाहात जाऊ लागली एका महिन्यानतर हा सर्व ताडा गोंडोकोरो येथील आता उद्ध्वस्त झालेल्या ऑस्ट्रीयन मिशन जवळ पोहचला. हे ठिकाण तसे भयानकच होते पण बेकरने तेथेच सामान उतरवून घेतले आणि किल्ला बांधण्याच्या तयारीला लागला दलदलीतून सुखरूप बाहेर पडल्याचा आनद

सर्वांनाच झाला होता मे महिन्यापर्यंत बेकरने झोपड्याची रांग उभी केली आणि जवळच शेते तयार करून भाजीपाला लावला व मका तयार केला २६ मेला बेकरने त्या रानात एक समारंभ केला १२०० सैनिकांची त्याने गणवेशात परेड घेतली व ८० फूट उंच ध्वजस्तंभावर ऑटोमन साम्राज्याचा ध्वज लावला. हा सर्व प्रदेश इजिप्तला जोडला आहे आणि याचे नाव इक्वोटारिया– विषुववृत्तीय प्रदेश– असे ठेवण्यात आले आहे असे त्याने जाहीर केले गोंडोकोरोचे नामकरण इस्मालिया असे करण्यात आले पण हा समारंभ पाहयला बारी टोळ्यातील नग्न लोकांशिवाय कोणीही नव्हते ! आणि त्यांना हे काय चालले आहे हे समजण्यासारखे नव्हते पण बेकर व त्याचे सैनिकांना या सर्व औपचारिकपणाने हुरूप आला त्या रात्री सर्वांना मेजवानी देण्यात आली

बेकर येथून पुढे दोन वर्षे तेथे राहणार होता तेथून पुढची कहाणी म्हणजे वसाहत करणाऱ्यांच्या युद्धाच्या हकिकती आहेत. ही एक लहानशी लष्करी मोहीमच होती या प्रदेशात ही मोहीम शांतता व सुव्यवस्था आणणारी होती

शांतता व सुव्यवस्था या गोड शब्दांचा खरा अर्थ १९०० च्या शतकात निराळाच होता ! असहाय्य व असंघटित वन्य जमातीवर केलेले पाशवी अत्याचार या शब्दांनी झाकले असत ! बेकरच्या या मोहिमेच्या हकिगती कळल्यानंतर इंग्लंडमधील उदारमतवादी लोकमत त्याच्याविरुद्ध झाले पण बेकर याशिवाय दुसरा मार्ग स्वीकारू शकतच नव्हता मानवी संस्कृतीच्या प्राथमिक अवस्थेत असलेल्या या प्रदेशात बळी तो कानपिळी आणि अजापुत्र बलीं दद्यात् देवो दुर्बलघातक हाच न्याय चालणारा होता ! वसाहती करण्याची हीच तऱ्हा होती

मध्य आफ्रिकेचा हा विस्तीर्ण मुलूख अनेक शतके मानवी संस्कृतीपासून अलग राहिला होता. तेथील समाजव्यवस्था अजूनही अश्मयुगातील समाज-व्यवस्था होती ही व्यवस्था जरी पाशवी, अनिश्चित आणि दु:खदायक असली तरी तिचे स्वत:चे काही नियम होतेच परंतु अरब व्यापाऱ्यांनी ती व्यवस्था मोडत आणली होती एखादा खाणवाला जसा जमिनीतून खनिज

काढतो त्याप्रमाणे हे अरब त्याप्रदेशातून मुले आणि माणसे उचलत असत । त्यामुळे तेथील समाजात पूर्वी जी थोडी व्यवस्था होती तीही शिल्लक राहिली नव्हती त्यामुळे तेथे सुसस्कृत शासन स्थापन करणे व व्यवस्था लावणे हे बेकरला आपले कर्तव्य वाटले. त्यासाठी निर्दय अरबाना पळवून लावणे व स्थानिक टोळयांना शांततेत व शिस्तीत राहायला भाग पाडणे बेकरला आवश्यक वाटले स्थानिक आदिवासी टोळयाना ते काही नीट समजेना बेकर त्याना गुलाम पकडणाऱ्यापैकीच एक वाटला । आणि त्यांनी बेकर बरोबर युद्ध सुरू केले मग बेकरलाही सामर्थ्य वापरावे लागले आणि त्यांच्या हिताचेच कायदे जबरदस्ती करून त्यांच्यावर लादावे लागले. अशा-प्रकारे एक नवी वसाहत सुरू झाली त्याने मऊ धोरण स्वीकारले असते तर तो नष्ट झाला असता मोहीमेतील सैन्य तर प्रथम टिकले व जगले पाहिजे । मग त्यांना शस्त्रे वापरावी लागली

त्याचा पहिला सघर्ष गोंडोकोरोजवळील बारी जमातीशी झाला त्यानी विषारी बाण मारले, तेव्हा बेकरने गोळीबाराने उत्तर दिले त्यानी धान्य व गुरे विकत द्यायला नकार दिला तेव्हा छापे घालून ती सामुग्री मिळवावी लागली अबु सौद नावाचा अरब बारी जमातीच्या बाजूने लढू लागला आणि गोडोकोरो येथील किल्ल्यातील सैनिकात बडाळी माजली इजिप्शि-यन सैनिकामध्ये पुष्कळ लोक माजी गुन्हेगार होते. आणि ते नीतिमत्ता नावाची गोष्ट जाणत नव्हते । एके दिवशी बेकर छोटासा हल्ला करून परत आला तेव्हा ११०० सैनिक तीस बोटी पकडून त्यातून जाऊ लागलेले त्याला दिसले । त्यामुळे बेकरजवळ पाचशे सैनिक उरले त्याने आता कमरासीचे राज्य बन्योरोमध्ये घुसायचे ठरवले बेकरचे 'चाळीस चोर' त्याचे उत्तम अगरक्षक झाले होते आणि सुदानी सैनिक एकनिष्ठ होते त्यानी धान्य, मेंढया, गुरे मोठया प्रमाणात जमवली होती. बेकरने राऊ बे ह्या इजिप्शियन अधिकाऱ्याला एका सैनिक तुकडीसह मागे ठेवले लिव्हिंग्स्टन आला तर त्याचे स्वागत करायला बेकरने सांगितले पण लिव्हिंग्स्टन तेथून शेकडो मैलांवर टांगानिका सरोवराकाठी होता । पण बेकरला त्याची बातमी समजायला काहीच मार्ग नव्हता

२२ जानेवारी १८७२ रोजी त्यांची ही मोहीम निघाली बेकरबरोबर त्याची पत्नी व पुतण्या होता. ते तिघेही घोड्यावर बसून जात होते मार्च महिन्याच्या मध्याला ते बन्योरो राज्याच्या हद्दीवर आले या सर्व मार्गातला मुलूख अरब व्यापाऱ्यांनी उध्वस्त केलेला आढळला फटिको या ठाण्याजवळ ते पोहचले या ठिकाणाला बेकरने १८६४ मध्ये भेट दिली होती तेथे गुलामांचा व्यापार सध्याही नियमित भरत होता. तेथे सशक्त तरुण मुलगी हत्तीच्या एका लांब सुळयाच्या मोबदल्यात मिळत असे. किंवा एका सदऱ्याचे कापड देऊनही ती उपलब्ध होई, किंवा तेरा विणण्याच्या इग्रजी सुयांच्या मोबदल्यात त्या मुलीला विकत असत या बाजारात अनेकदा मुलीचे आईबापच तिला विकायला घेऊन येत।

बेकरने नाईल नदीच्या प्रवाहाचे सशोधन करण्याचा प्रयत्न केला नाही तो धीमेपणे दक्षिणेकडे निघाला आता त्याच्या सैनिकी तुकडीला बन्योरो राज्यात प्रवेश करण्यासाठी राजाची परवानगी मिळविण्याची जरुरी नव्हती. २५ एप्रिल १८७२ रोजी तो सध्याच्या मशिंडी गावाच्या जवळ असलेल्या बन्योरोच्या राजधानीत पोहोचला तेथे त्याला मधमाशाच्या पोळयाच्या आकाराच्या हजारो झोपड्या दिसल्या कमरासी आता मृत्यू पावला होता. आणि त्याच्या गादीवर त्याचा मुलगा कबारेगा आला होता. तो बन्योरोचा सोळावा राजा होता त्याचे वय वीस वर्षांचे होते आणि तो स्वत:ला सम्राट समजत असे पण बेकरच्या मते तो भित्रा, क्रूर, लबाड आणि विश्वासघातकी होता.

हा तरुण राजा बेकरला भेटायला त्याच्या मुक्कामावर आला दोन हजार अनुयायी घेऊन तो जिराफासारखा चालत आला। बेकरला त्याचा रागडेपणा मुळीच आवडला नाही बेकर म्हणतो की, 'तो नेहमी दारू प्यालेला असे आणि तो व त्याचे दरबारी दारू पिऊन रात्रभर धुमाकूळ घालत असत।'

पण पाश्चिमात्य सस्कृतीपासून दूर राहिलेल्या या राजाने सभ्य रीतीरिवाज पाळावेत ही बेकरची अपेक्षाच चुकीची होती. बेकरला बन्योरो राज्यावर इजिप्तचे स्वामित्व हवे होते आणि ते काम मित्रत्वाने करण्याची

त्याची इच्छा होती. बेकरने आपले हेतू कबारेगाला आडपडदा न ठेवता सांगितले

बेकरने आपला तंबू एका प्रचंड वडाच्या झाडाखाली लावला आणि जवळच आपले राजभवन बांधायला सुरुवात केली ही एक मोठी झोपडीच होती। पण त्याने ती चांगली सजविली होती व्हिक्टोरिया महाराणी आणि प्रिन्स ऑफ वेल्स याची चित्रे तेथे लावली होती जमिनीवर गालिचे घातले होते. जवळच जमीन तयार करून तेथे काकड्या, तांबडे भोपळे, कापूस वगैरेंची लागवड केली होती १४ मे ला त्याने एक समारंभ भरविला आणि बन्योरो राज्य इजिप्तच्या खेदिवाच्या राज्याला जोडून घेतले आहे असे जाहीर केले

बेकर समजत होता तसा कबारेगा हा निव्वळ दारुड्या नव्हता। त्याचे वडील मृत्यू पावल्यानंतर राज्यावर येण्यासाठी त्याला चांगला झगडा करावा लागला होता. त्यावेळेला त्याचे गुण दिसून आले होते त्याला अनुभव नव्हता हे खरे। पण बेकरने त्याच्या राज्यात हस्तक्षेप केल्याबद्दल त्याने निषेध व्यक्त करावा हे योग्यच होते बेकरच्या म्हणण्याप्रमाणे तो कबारेगाशी मैत्री करायला आला होता पण या रानटी जगात कोणताही समर्थ पुरुष उगाच मैत्री करायला येत नाही हे कबारेगाला चांगले माहीत होते अशी मैत्री म्हणजे आक्रमणच असते। आपले बन्योरोचे राज्य टिकवायचे असेल तर बेकरला येथून सुट्टी दिली पाहिजे हे कबारेगाला तावडतोब समजले तो उतावळा व आक्रमक होता म्हणून त्याने हे काम तावडतोब हाती घ्यायचे ठरविले रात्रभर चालणारा ढोलाचा आवाज म्हणजे दारूड्यांचे चाळे आहेत असे बेकरला वाटले पण तसे नव्हते। युद्धासाठी वातावरण करण्याची ही प्राथमिक अवस्थेतील मानवसमाजाची पद्धत होती ती पोरकट, रानटी आणि कीव येणारी असेल कदाचित, पण वन्य जमातीची भावना व्यक्त करण्याची ती पद्धत होती. कबारेगाचे सर्व सरदार व सैनिक यांचा त्याला पूर्ण पाठिंबा होता त्यांचा हा हल्ला व युद्ध म्हणजे एक प्रकारे जनतेचा उठाव होता, हे बेकरला समजले नाही तसे अनेक पुढच्या इंग्रजानाही याचे आकलन झाले नाही मेच्या शेवटी-

शेवटी बेकर आपला किल्ला बांधण्यात गुग होता आणि कबारेगा युद्धाचे वातावरण तयार करीत होता शेवटी ८ जूनला मशिडींची लढाई सुरू झाली त्यापूर्वी कबारेगाने इतर आफ्रिकन टोळीप्रमुखात सहसा न सापडणारे डावपेच वापरले त्याने बेकरच्या सैन्याला विष घातलेली फळे भेट म्हणून आदल्या दिवशी पाठविली लढाई सुरू झाली तेव्हा बेकरचे अनेक सैनिक त्या विषामुळे आजारी पडले होते.

मशिडीची लढाई फक्त सव्वा तास चालली ! बेकरने त्याचे सविस्तर वर्णन केले आहे

तो लिहितो, ' कित्येक हजार रानटी टोळीवाले, एकदम भयंकर आवाजात ओरडू लागले ! त्यामुळे आम्ही दचकलोच मीही आपल्या ब्युगलवाल्याला धोक्याचा ब्युगुल वाजवायची आज्ञा दिली आणि माझे सैनिक व माझे ' चाळीस चोर ' रायफल घेऊन सज्ज झाले इतक्यात टोळीवाले आमच्या छावणीच्या नजीक आले होतेच. अगदी जवळून आम्ही त्यांच्यावर गोळ्यांचा भडीमार केला ' टोळीवाल्यांनी बेकरच्या सैन्याला बेसावध घेरले असते तरच त्याना विजयाची थोडीफार आशा होती शत्रूवर गोळीबार करता करताच जळते बाण सोडून बेकरने गावातील सगळ्या झोपड्यांना आगी लावून दिल्या कबारेगाची झोपडी ऐंशी फूट उंच होती व गवताची होती ती पेटून उठली आणि त्यामुळे इतर झोपड्याही पेटल्या व जळू लागल्या ! गोळीबारानंतर लगेच कबारेगाचे टोळीवाले पळू लागले आणि त्यांचा पाठलाग बेकरच्या सैन्याने सुरू केला आगीत सापडलेल्या लोकांचे आर्त आवाज ऐकू येत होते. संध्याकाळपर्यंत बन्योरोची राजधानी स्मशानभूमी होऊन गेली ! तेथे एकही घर शिल्लक उरले नाही. राखेचे ढीग आणि त्यातून कोठे कोठे निघणारा धूर हे दृष्य सगळीकडे दिसत होते टोळीवाले इतस्तत चारी बाजूला पळून गेले त्यांचे शिंगाचे आणि ढोलांचे आवाज आता शांत झाले होते.

जवळपासच्या गवतामध्ये मेलेले आणि जखमी झालेले कित्येक आफ्रिकन पडले होते किती लोक ठार झाले, याचा हिशेब करणे कठीण होते ! पण बेकरने ऐकले की कबारेगाचे नऊ सरदार मारले गेले, बेकरचे फक्त चार

लोक ठार झाले होते. थोड्याच वेळात त्या नष्ट झालेल्या शहरावर चारी बाजूनी शेकडो गिधाडाचा थवा उतरला !

परंतु ही केवळ सुरुवात होती. बेकरच्या तुकडीला आता नेहमीच त्रास होणार होता बन्योरोचे लोक गप्प बसले नाहीत उंच गवतामागून ते टोळीवाले छुपे हल्ले चढवतच राहिले. दररोज कोणीतरी मारला जाई. अन्नपुरवठा संपू लागला. थोडक्यात आक्रमकानी लढाई जिंकली होती, पण ते युद्ध हरले होते !

१३ जूनला बेकरने तेथून साठ मैलावरील फॉवेरा येथे माघार घ्यायची ठरवली हे व्यापारी ठाणे नाईल नदीवर होते. तेथे त्यांना हमाल मिळाले नाहीत त्यातच तीन हजार मैल अंतरावरून आणलेले त्याचे बरेचसे सामान जळून गेले १४ जूनला त्यानी भर पावसात परत जायचे ठरवले इथून पुढच्या त्याच्या दहा दिवसांच्या माघारीची तुलना नेपोलियनने मास्कोतून घेतलेल्या माघारीशीच करता येईल !

दररोज बेकरच्या सैनिकावर भालाईत छुपे हल्ले करीत आणि रस्त्याच्या प्रत्येक वळणावर चकमकी होत. रात्रभर टोळीवाल्यांच्या ढोलांचे आवाज त्याना ऐकू येत बेकरच्या पत्नीचे धैर्य विलक्षण होते या संकटात ती डगमगली नाही पण स्थानिक सैनिकाच्या बायका फार घाबरत. जी मागे राहिली तिचा मृत्यू ठेवलेलाच ! लवकरच सर्व घोडी आणि गाढवे मरून गेली त्यामुळे जखमींना डोलीत घालून न्यावे लागले काही सामान आणि गुरेही सोडून द्यावी लागली प्रत्येकाला गोळीबाराच्या चाळीस फैरी देण्यात आल्या कारण गवतात थोडी हालचाल दिसली तरी सैनिक उगीचच गोळीबार करत २४ जूनला दमलेल्या सैनिकांसह बेकर फॉवेराला येऊन पोहचला माघार घेताना त्याचे दहा लोक ठार झाले आणि अकरा जखमी झाले मशिंडीच्या मोहिमेतील २०० लोकापैकी १५० लोक फॉवेराला परत आले फॉवेरा येथील किल्ला जळून गेला होता व तेथील शेती नष्ट झाली होती परंतु आता कबारेगाच्या छुप्या हल्ल्यांचा त्रास नव्हता. बन्योरो राज्याचा हाडवैरी रायगा याचे बरोबर बेकरने दोस्ती केली ऑगस्ट १८७२ मध्ये बेकर फटिगो ठाण्यावर परतला तेथे काही चकमकी झाल्या-

नंतर त्याने आपले मुख्य ठाणे फटिगो येथेच ठेवायचे ठरवले

हा फार चांगला निर्णय होता फटिगो हे ठाणे लष्करीदृष्ट्या बळकट होते. आता बेकरच्या भाग्यात बरे दिवस आले. १८७२ च्या शेवटी त्याने पुन्हा एकदा कबारेगावर उत्तरेकडून हल्ला चढवला गोंडोकोरोच्या दक्षिणेस टोळीवाल्यांचा विरोध संपत आला होता. आपल्या कारकीर्दीचे शेवटचे सहा महिने त्याने फटिगो किल्ल्याचे बांधकाम करण्यात घालविले. फटिगो येथील सैन्यबळाच्या धाकामुळे व त्याच्या अस्तित्वामुळे त्याने जिंकलेला हा प्रदेश शांत राहात होता. त्या प्रदेशापैकी निम्म्या भागाचे संशोधन अजून व्हायचे होते.

मार्च १८७३ मध्ये तो बायको व पुतण्यासह जायला निघाला, तेव्हा त्याने लिहिले,

'शेवटी मी सर्व विरोधावर मात केली आहे द्वेष व उद्धटपणा जाऊन शिस्त व व्यवस्था लागली आहे आजपर्यंत ज्या भूमीत अराजक आणि गुलामी होती. तेथे आता प्रजा दयाळू सरकारच्या छत्राखाली आली आहे. खार्टूमपासून दक्षिणेस १६०० मैलपर्यंत नाईल नदी स्वच्छ केली आहे व तेथे धोका उरला नाही माझी मुदत संपत आली असताना संकटाचे ढग निघून गेले आहेत आणि शांतता अवतरली आहे ही सर्व परमेश्वराची कृपाच आहे असे मी मानतो.'

इजिप्शियन अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली काही फौज फटिगो येथे ठेवण्यात आली आणि बेकर मंडळी कैरोला ऑगस्ट १८७३ मध्ये परतली वर्ष संपले तेव्हा ते लंडनला पोचले. तेथे पोहचल्यावर त्याला चार वर्षांचा पगार म्हणून ४० हजार पौंड म्हणजे आठ लाख रुपये मिळाले

बेकरने फटिगो येथील किल्ला जणू आपले स्मारक म्हणून आफ्रिकेत ठेवला सध्या तेथे थोडेसे शेतकरी राहतात परंतु अजूनही बेकरच्यावेळी होता तसाच किल्ला ठेवला आहे सध्या तेथे गुलू या शहरावरून जाता येते किल्ल्याची १००-२०० फूट उंचीची टेकडी आजूबाजूच्या सपाट मैदानावरून कित्येक मैलांवरून दिसू लागते अफाट पसरलेल्या विस्तीर्ण गवताळ प्रदेशात हा किल्ला डोके वर काढून उभा आहे बेकरला हा प्रदेश फार

आवडे व येथे बसून तो या प्रदेशात नवी संस्कृती उभारण्याची स्वप्ने पाहत राही. पण गेल्या १०० वर्षांत येथील परिस्थिती फारशी बदलली नाही ! थोडीफार खेडी दिसतात कपाशीची थोडीशी शेते दिसतात आणि रानटी जनावरे वाटेल तेथे आढळत नाहीत तरीही येथे १०० वर्षांपूर्वीप्रमाणेच गवताच्या झोपड्या आहेत व सगळीकडे शांतता पसरली आहे. जमिनीचा अफाट विस्तार आणि तेथील अफाट पोकळी याचाच ठसा मनावर उमटतो!

किल्ल्याचे आकार चौरस आहे आणि त्याभोवती खदक आहे नाईल नदीच्या बाजूला बेकरने बांधलेली गुदामे आहेत. 'सर सॅम्युअल बेकर याने हा किल्ला स्थापन केला,' अशी पाटीही तेथे अद्याप आहे

बेकर नंतर गॉर्डन आणि अमीन या किल्ल्यात येऊन राहणार होते. येथून जवळच नाईल नदी वाहते या तिघांची जीवने नाईलशी निगडित झाली होती नियतीनेच त्यांना नाईलशी बांधून टाकले होते !

★

प्रकरण दहावे

## मध्य आफ्रिकेत गॉर्डन

१९ व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास युरोपातून लाखो लोक ऑस्ट्रेलिया, कॅलिफोर्निया, अमेरिका, या भागात सोने सापडण्याच्या आशेने गेले आणि तिकडेच कायमचे राहिले. ही नवी भूमी उपलब्ध असल्याने मध्य आफ्रिकेकडे युरोपियनांचे स्थलांतर झाले नाही संशोधक आणि मिशनरी यांच्याशिवाय इतरांचे या भागाकडे लक्ष नव्हते मध्य आफ्रिकेत स्थाईक होण्यासाठी तर कोणीच गेले नाही सुवेझ कॅनालमुळे पूर्व आफ्रिकेशी व्यापार वाढेल अशी अपेक्षा होती पण तसे झाले नाही सुवेझ कॅनालचा उपयोग हिंदुस्तान, आणि अतिपूर्वेकडील देश यांनाच होत होता आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर इजिप्त आणि झांझिबार या दोनच महत्वाच्या सत्ता होत्या आफ्रिकेतील भूप्रदेशावर स्वामित्व मिळविण्यासाठी या दोन्ही सत्तांची धडपड होती पण लवकरच युरोपीय सत्ता या भागात उतरल्या आणि त्यांचे काही चालेनासे झाले

यापैकी झांजीबार हे फारच दुर्बळ राष्ट्र होते तेथील लोकसंख्या पाच लाख होती आणि १८६९ मध्ये कॉलऱ्याच्या साथीने आणि १८७२ मध्ये वादळाने झांझिबारचे फार नुकसान झाले होते झांझिबारची सत्ता पूर्व आफ्रिकन किनाऱ्यापुरती मर्यादित होती आंतरराष्ट्रीय बंधनांचा गुलामांच्या व्यापाऱ्यावर परिणाम होऊ लागला होता परंतु लवंगांचा व्यापार वाढत होता.

१८७० मध्ये सुलतान मजीद मरण पावल्यानंतर बरघाश राज्यावर आला होता सुल्तान मजीदला इतरही वारस होतेच त्यांना दूर सारून

तो राज्यावर आला होता राज्याचा वारसा तलवारीच्या लांबीवर ठरला जातो, असे तो म्हणत असे तो धूर्त, साहसी आणि वचनाचा पक्का होता त्याच्यावर विश्वास न ठेवणारा पहिला ब्रिटिश वकील जाऊन तेथे आता किर्कची नेमणूक झाली होती किर्क तेथे फार यशस्वी वकील ठरला. बरघाशची आणि त्याची चांगली मैत्री जमली. या मैत्रीतूनच पुढे मध्य आफ्रिकेतील ब्रिटिश साम्राज्याचा पाया घातला गेला.

पण बरघाशची मैत्री सोपी नव्हती स्वत:च्या फायद्यासाठी बरघाशला गुलामाचा व्यापार बंद करावयाचा नव्हता ब्रिटिशानी हा व्यापार थांबवयाची प्रतिज्ञाच केली होती मध्यतरी ब्रिटिश वकिलातीचा प्रमुख म्हणून १८७३ मध्ये फायर झांझिबारला आला होता त्याने झांझिबारचा गुलामांचा व्यापार बंद करण्याबाबत करार करण्याचा प्रयत्न केला पण बरघाशने नकार दिला फायर गेल्यानंतर किर्कने युक्ती प्रयुक्तीने कधी त्याची मनधरणी करून तर कधी धमकी देऊन गुलामांचा व्यापार बंद करण्याच्या करारावर सही करायला लावलीच जून १८७३ मध्ये झांझिबारचा गुलामांचा बाजार अधिकृतपणे बंद झाला तरीही चोरून आणि गुप्तपणे तो व्यापार पुढे अनेक वर्षे चालू राहिला होता

बरघाशनें हे मान्य केल्यानंतर मग मात्र किर्कने त्याचे झांझिबारचे लहानसे राज्य सुरक्षित राहील याकडे लक्ष दिले.

असे करताना किर्कने मध्य आफ्रिकेत थैमान घालणाऱ्या गुलाम पकड-णाऱ्या व्यापाऱ्यांनाही ते सुलतानाचे प्रजाजन आहेत म्हणून संरक्षण दिले. त्यामध्ये सुलतानाचा मित्र महमद बीन सय्यद हाही होता. त्याचे टोपण ‘टिपू टिप’ असे होते तो एक सरावलेला आणि क्रूर दरोडेखोर होता. पण तो तीक्ष्ण बुद्धिमत्तेचा होता. आणि सुसंस्कृत जगात तो फार सभ्यतेने वागत असे तो देखणा आणि भव्य शरीराचा होता आणि संभाषणात चतुर होता या सभ्य दरोडेखोराजवळ अगणित संपत्ती होती त्याचा वाडा झांझिबार मध्ये अजूनही आहे गुलाम पकडणाऱ्या त्याच्या टोळ्या कांगोपर्यंत जात असत तो झांझिबारमध्ये फारसा दिसत नसे त्याचा मुक्काम टांगानिका

सरोवर आणि लुलाबा नदी या दरम्यान असे तेथे तो एखाद्या अनभिषिक्त सम्राटाप्रमाणे वागत असे. त्यानेच लिव्हिंग्स्टनला उपासमारीतून वाचवले होते, आणि स्टॅन्लेला हमाल पुरवले होते आपला खिसा पूर्ण भरल्यानंतर इजिप्तविरुद्धच्या झगड्यात बरघाश व किर्कला मदत करण्यासाठी त्याने आपले सर्व सामर्थ्य देऊ केले होते

झांझिबार बेटावरचे चित्र आता बदलत होते गुलामांचा व्यापार जेथे भरे तेथे आता एक चर्च उभारण्यात आले होते. बंदरावर बोटींची ये जा जास्त वाढली होती सोनार, लोहार, तांबट यांची बरीच दुकाने दिसत असत तरी पण पैसे व्याजाने देणारे सावकार हेच बेटावरील सर्वात श्रीमंत लोक होते तेथील बाजारात हिंदुस्थानी रुपाया, इंग्रजी पौंड, अमेरिकन डॉलर, अशी अनेक नाणी चालत असत पण मराया थेरेसाचा शिक्का असलेला ऑस्ट्रियन डॉलर सर्वांत जास्त चालत असे.

श्रीमंत अरब आपल्या गाढवावर बसून जात असे आणि त्याचा गुलाम गर्दीतून रस्ता करण्यासाठी पुढे धावत असे. एका बाजूला भयंकर गरिबी आणि दुसऱ्या बाजूला श्रीमंत अरबांचे सुखविलास झांजिबारमध्ये पहावयास मिळत ख्रिश्चन आणि मुसलमान धर्मांची स्पर्धा तेथे चाले राज्याची व्यवस्था एकंदर वेताबाताचीच होती. तरीही झांझिबार आपले स्वातंत्र्य १८७० मध्येही टिकवून होते

याच काळामध्ये कैरो शहर समृद्ध होत होते व वाढत होते १८६९ मध्ये सुवेझ कालवा सुरू झाल्यानंतर कैरोवर पाश्चात्त्यांचा प्रभाव वाढू लागला होता युरोपातून हौशी प्रवासी तेथे येत असत आणि ते एक उत्पन्नाचे प्रमुख साधन होऊ लागले होते त्यामुळे प्रवाशांचे तेथे स्वागत केले जात असे शहरामध्ये रोज नव्या इमारती उठत होत्या आणि रस्त्यावर गसचे दिवे लागले होते इजिप्तचे राज्य खेदिवाच्या ताब्यात होते वरून जरी देखावा समृद्धीचा दिसत असला तरी खेदिव पैशाच्या मागे लागला होता त्याचा खर्च अफाट होता व कर्जही पुष्कळ होते इजिप्तमधील पेरणी-योग्य जमिनीपैकी १५ टक्के जमीन खेदिव इस्माईल याच्या ताब्यात होती त्याने जमीनसारा चौपट केला होता. पण तरीही त्याचा खर्च भागत नव्हता

अमेरिकन यादवी युद्धानंतर कापसाचे भाव गडगडले होते आणि इजिप्त दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा होता शेवटी खेदिवाला पैशाची नड भागविण्यासाठी सुवेझ कॅनॉलचे शेअर्स ४० लाख पौंडांना इंग्लडला विकून टाकावे लागले आर्थिकदृष्ट्या सुवेझ कालवा चांगलाच फायदेशीर ठरत होता उद्‌घाटन झाल्यापासून पहिल्या वर्षातच पाचशे जहाजे कालव्यातून गेली परंतु शेअर्स विकल्याने इजिप्तला कालव्यापासून फारसे उत्पन्न मिळत नव्हते

अशा अनंत अडचणी असल्या तरी नाईल नदीच्या संपूर्ण खोऱ्यात आपले साम्राज्य स्थापण्याची स्वप्ने खेदिव इस्माईल पाहत होता

स्वतः दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा असता साम्राज्य वाढविण्यासाठी अफाट खर्च करणे यात कोणता शहाणपणा होता ? पण हे शहाणपण इस्माईलला सुचणार नव्हते ! बेकरने त्यागपत्र दिल्यानंतर सुदान आणि विषुववृत्तीय प्रदेश यांचा राज्यपाल म्हणून कोणाला निवडावे याचा खेदिव विचार करत होता आणि त्याला कर्नल गॉर्डनचे नाव सुचले

गॉर्डन त्यावेळी ४१ वर्षांचा होता, आणि शौर्याबद्दल प्रसिद्ध होता. त्याने क्रिमियन युद्धात शौर्य दाखवले होते आणि चीनमधील मोहीम त्याच्याच नेतृत्वाखाली यशस्वी झाली होती ब्रिटिश लष्करी परंपरेमध्ये तो वाढला होता आणि त्यातील सर्व गुणदोष त्याच्या अंगी होते खार्टूमच्या लढाईत मरण पावल्यानंतर इंग्लंडमध्ये त्याला हुतात्मा समजण्यात येऊ लागले आणि त्याची लोकप्रियता फार वाढली

त्याच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालेले 'खार्टूम जर्नल्स्' हे पुस्तक प्रत्येक सुशिक्षित इंग्रजाने वाचले होते अजूनही इंग्लंडमध्ये गॉर्डनची लोकप्रियता टिकून आहे तरीही इंग्लंडमध्ये त्याच्यावर काही लोकांनी टीका केलीच तो ब्रह्मचारी होता आणि जबरदस्त धूम्रपान करत असे निराशेने त्याला ग्रासले की अनेक दिवस तो एकांतवासात काढत असे तरीही गॉर्डनजवळ दोषापेक्षा गुण जास्त होते त्याच्या संगतीत जे जे आले त्याचे त्याने प्रेमच मिळवले तो उपासना करायला कोणत्याही चर्चमध्ये जात नसे. परंतु त्याची ईश्वरावर गाढ श्रद्धा होती त्याला स्वतःचा स्वार्थ ठाऊकच नव्हता. तो इतरांना

मदत करायला नेहमी तयार असे

गॉर्डन कॉन्स्टंटिनोपलमध्ये १८७२ मध्ये होता तेथे त्याला इजिप्तचा मुख्यमंत्री नुबारपाशा भेटला. आणि विषुववृत्तीय प्रदेशाचा राज्यपाल पदाविषयी त्याने गॉर्डनला विचारले ब्रिटिश सैन्यातून रजा मिळाल्यास मी ती नवीन जागा स्वीकारायला तयार आहे, असे त्याने शेवटी सांगितले. त्याच्या नेमणुकीचे पक्के ठरले आणि जानेवारी १८७४ मध्ये तो आपल्या नवीन जागेवर रुजू होण्यासाठी कैरोला निघाला खेदिव इस्माईल व गॉर्डनची पहिली भेट झाली तेव्हा खेदिवाने आपले साम्राज्य विषुववृत्तावरील सरोवरापर्यंत वाढवावयाचा बेत त्याला सांगितला गॉर्डनला हा बेत पसंत पडला अर्थात गुलामाचा व्यापार बंद करण्याचे कलम त्यात घालण्यात आले हे सांगायला नकोच.

गॉर्डनच्या वागणुकीमुळे कैरोमधील स्वार्थी अधिकारी आश्चर्यचकित झाले बेकरला याच पदासाठी पूर्वी वर्षाला दहा हजार पौंड पगार होता गॉर्डनने हा पगार नाकारला आणि दर वर्षाला दोन हजार पौंड पगार पुरेसा आहे असे सांगितले. आपला अधिकारी वर्ग निवडायचे त्याला स्वातंत्र्य होते त्या वेळी इजिप्तमध्ये आपले नशीब काढण्यासाठी सर्व जगातून अनेक साहसी वीर जमा होत होते काहींना मध्य आफ्रिकेच्या प्रवासाचा अनुभव होता. फ्रेंच, अमेरिकन, इटालियन, ऑस्ट्रियन साहसी सैनिक त्याचे भोवती जमा झाले त्याच्या सैनिकात तुर्की, इजिप्शियन, सुदानी सैनिकांचा भरणा होता कोणत्या जागेसाठी कोणाला निवडावे याची गॉर्डनला उपजतबुद्धी होती त्याने अबूसौद नावाच्या पूर्वीच्या गुलाम पकडणाऱ्या कुप्रसिद्ध माणसाला महत्त्वाच्या जागेवर नेमले. खाटकाला गुराखी बनवण्यासारखेच हे झाले ! पण सुदानमधील स्थानिक माहिती अबूसौदला होती. आणि गुलाम पकडणाऱ्यांविरुद्ध कारवाई करायला तोच उपयोगी पडेल अशा हिशेबाने गॉर्डनने त्याला घेतले होते

गॉर्डनने आपल्या सैनिकांचे दोन भाग केले होते. एक भाग इटालियन सैनिक गेसी शिधासामुग्री घेऊन नाईल मार्गाने घेऊन येणार होता व गॉर्डन आणि चैले-लॉग हे दोघे तांबड्या समुद्राच्या मार्गाने खार्टूमला जाणार होते

ते न्युबियन वाळवटातून उटावर बसून एकवीस दिवसात खार्टूमला पोहचले तेथे इजिप्तचा गव्हर्नर जनरलने त्याचे स्वागत केले आणि त्याच्या स्वागतासाठी रात्री एक मेजवानी दिली

गॉर्डन खार्टूममध्ये नऊ दिवस थांबला आणि लागलीच विषुववृत्तीय प्रदेशाची नियोजित राजधानी गोंडोकोरो येथे जायला निघाला. खार्टूमपासून गोंडोकोरो एक हजार मैल लाब आहे. नाईल नदीतून गोंडोकोरोला पोचायला त्याला बत्तीस दिवस लागले बेकरने गोंडोकोरो सोडले त्याला वर्ष झाले होते आणि तेथील सर्व शिस्त बिघडली होती लाचलुचपत फार वाढली होती. सैनिकांना पगार देण्यास पैसे नसले की त्याऐवजी त्यांना दारू आणि तरुण गुलाम मुली पगार म्हणून देण्याची पद्धत पडली होती ! चार-पाच दिवसातच गॉर्डनने झटपट निर्णय घेतला. गुलामांच्या व्यापारात गुतलेल्या व्यापाऱ्याना त्याने काढून टाकले युगाडाच्या मुटेसाकडे त्याने चैलेलॉगला पाठविले आणि तो स्वत खार्टूमला परतला खार्टूमच्या इजिप्शियन गव्हर्नर जनरलकडे विषुववृत्तीय प्रदेशाबाबत सपूर्ण अधिकार मागितले इजिप्शियन गव्हर्नर जनरलने नकार दिला. तेव्हा त्याने खेदिवाला तार करून ते अधिकार मागितले व खेदिवानेही समती दिली. नतर तो बेर्बेरपर्यंत नाईल नदीतून उत्तरेकडे गेला. तेथे त्याला गेसी व इतर अधिकारी भेटले ते साहित्यसामुग्री घेऊन आले होते सैनिकाना पगार देण्यासाठी गॉर्डनने मराया-थेरेसा-ऑस्ट्रियन डॉलर बरोबर घेतले आणि ते सर्वजण मे १८७४ मध्ये चार आगबोटीत बसून गोंडोकोरोला पोहचले

येथील कामगिरी फारच कठीण आहे हे गॉर्डनला लवकरच समजले गोंडोकोरोच्या दक्षिणेस नदीमध्ये अजूनपर्यंत कोणीही बोटी चालवल्या नव्हत्या किंवा त्या भागाचा नकाशाही तयार झाला नव्हता गोंडोकोरोच्या आसपास वन्य जमातींमध्ये इजिप्शियन सैनिकानी असे काही थैमान घातले होते की त्या जमाती खवळून गेल्या होत्या आणि सैनिकी सरक्षण असल्याशिवाय अतर्भागात जाणे कोणालाच शक्य नव्हते तेथील हवा वाईट होती मलेरियाचा फार प्रसार होता अनेक युरोपियन अधिकारी मलेरियाला बळी पडले गॉर्डनला मात्र कोणताच आजार झाला नाही तो सतत काम करत असे

आणि त्याने एकही दिवस आळसात काढला नाही. म्हणूनच कदाचित त्याचे आरोग्य चागले राहिले असेल तेथील परिस्थिती भीषण होती ती परिस्थिती जाणून घेणे हे विसाव्या शतकातल्या वाचकांना कठीणच आहे । त्याने जमवलेले सर्व अधिकारी लवकरच सपले कोणी आजारी पडून मेले, कोणी नोकरी सोडून परत मायदेशी गेले, तर काहीजण स्थानिक टोळीवाल्यांच्या चकमकीत मारले गेले फक्त गेसी हा अधिकारी शेवटपर्यंत गॉर्डनजवळ राहिला.

विषुववृत्तीय प्रदेशाचा ताबा मिळविण्यासाठी खार्टूमहून पुरवठा व स्टिमरबोट येणे जरुरीचे होते तेव्हा गॉर्डनने आपल्या सर्व सहकाऱ्याना ती व्यवस्था पाहण्यासाठी खार्टूमला पाठवून दिले. आणि तो एकटाच स्थानिक सैनिकाबरोबर गोंडोकोरो येथे राहिला. याच दिवसांमध्ये तो एकातवासात राहू लागला

त्याने आपली राजधानी गोंडोकोरोहून हलवून आणखी दक्षिणेकडे लाडो येथे नेली येथील हवा गोंडोकोरोपेक्षा बरी होती नतर त्याने नाईल नदीतून दक्षिणेकडे स्टिमरबोटी नेण्याचा प्रयत्न केला. पण गोंडोकोरोच्या दक्षिणेस नाईल नदीमध्ये खूपच धबधबे होते. त्यामुळे त्याला या बोटी नेणे शक्य झाले नाही तेथे जातानाच नाईल नदीतील फोला धबधबा त्यांना सापडला

गॉर्डनने दक्षिणेकडील आपली कुच तशीच चालू ठेवली आणि बेकरने स्थापन केलेल्या फटिको या ठाण्याजवळ तो पोचला. हा सर्व उजाड प्रदेश होता तेथे मनुष्यवस्ती अजिबात नव्हती आणि सगळीकडे गवत व छोटी झुडपे पसरली होती त्याने फटिकोजवळ काही सैन्य ठेवले आणि तो आणखी दक्षिणेकडे निघाला कायोगा सरोवरावरील सध्याच्या मशिंडी बदराच्या पूर्वेकडे दहा मैलांवर त्याने शेवटचे ठाणे स्थापन केले. या मोहीमेत स्थानिक टोळयाशी त्याच्या किरकोळ चकमकी होतच होत्या शेवटच्या मशिंडी जवळच्या ठाण्यावर गॉर्डन पोहचला तेव्हा तेथील राजा कबारेगा पळून गेला आणि व्हिक्टोरिया सरोवरापर्यंतचा प्रदेश गॉर्डनच्या आटोक्यात आला त्याने न्यूबेरपाशा नावाच्या आपल्या अधिकाऱ्याला १६० सैनिकासह

युगांडात ठाणे स्थापण्यासाठी पाठवले आणि पूर्वीच्या ठाण्यांची व्यवस्था पाहण्यासाठी गॉर्डन उत्तरेकडे परतला गॉर्डनने दुफिले गावाजवळचा धब-धबा टाळण्यासाठी दोन आगबोटी सुटया करून वरच्या बाजूला आणायला सांगितले होते पण ते काम जमले नाही, म्हणून त्याने दोन दहा टनाच्या लहान बोटी वर आणवल्या आणि त्या अल्बर्ट सरोवराकडे पाठवायचे ठरवले

या दोन बोटींतून नाईलच्या वरच्या भागात संशोधन करण्याची संधी इटालियन संशोधक रोमीलो गेसी आणि पायगिया यांना दिली ते दोघे नाईल नदीतून अल्बर्ट सरोवराकडे गेले आणि गॉर्डन लाडो येथे परतला गेसी आणि पायगिया एप्रिल १८७६ च्या शेवटी परत आले त्यांनी महत्वाची माहिती आणली होती दुफिलेपासून अल्बर्ट सरोवरापर्यंत नाईल नदीमध्ये धबधबे नव्हते अल्बर्ट सरोवर बेकरने वर्णन केले त्यापेक्षा लहान होते पायगिया होडीत बसून पूर्वेकडे मर्चीसन आणि करुमा धबधब्याकडे गेला आणि तो कायोगा सरोवरावर पोहचला पण ते दोघेही नाईल नदीचे आणखी फाटे पाहिल्याचे सांगत होते तेव्हा नाईल नदीचा मुख्य प्रवाह कोणता याबाबत गोंधळ होऊ लागला.

तेव्हा गॉर्डनने हे सर्व संशोधन स्वत च करावयाचे ठरवले गोंडोकोरो पासून ते उगमापर्यंत नाईलचा प्रवाह निश्चित ठरवायचे काम त्यानी हाती घेतले धबधब्यापासून वर आणलेल्या ' न्याझा ' या आगबोटीत बसून वीस जुलै १८७६ रोजी तो दक्षिणेकडे निघाला गेसीने शोधलेली उपनदी अस्ति-त्वात नव्हती असे त्याला आढळले नंतर तो बोटीत बसून पूर्वेकडे निघाला आणि मर्चिसन धबधब्याजवळ पोहचला तेथे बोटीतून उतरून नदीच्या काठाने तो पायी निघाला आणि फॉवेरा येथे पोहचला मर्चिसन धबधब्या-पलीकडे नाईल नदी नौकानयन योग्य नाही हे त्याला स्पष्टपणे समजले नंतर तो कायोगा सरोवरापर्यंत गेला आणि तेथपर्यंत नाईलला दुसरी उप-नदी नाही हे त्याने निश्चितपणे ठरवले तेथे त्याला न्युबेपारशा भेटला आणि युगांडा राज्यावर पाठवलेले सैनिक मुटेसाने पकडून कैदेत टाकले आहेत अशी बातमी दिली

गॉर्डनने विषुववृत्तीय सरोवराचा प्रदेश इजिप्तसाठी काबीज करण्याची एक योजना आखली होती तीही पूर्णपणे फसली त्याने पूर्व किनाऱ्यावरून मोंबासा येथून एक सैनिक तुकडी पाठवायचे ठरवले ही तुकडी व खार्टूमहून दक्षिणेकडे गॉर्डनने पाठविलेले सैनिक एकत्र होऊन सरोवराचा प्रदेश ताब्यात घेणार होते या योजनेत फारसा अर्थ नव्हता, तरीही खेदिवाला ती पसत पडली आणि त्याने ब्रिटिश आरमारातील कॅप्टन मॅकिलॉप याला तात्पुरते बोलावून घेऊन त्याला ही कामगिरी सांगितली चैले-लाँग हा अमेरिकनही त्यात सामील झाला सप्टेंबर १८७५ मध्ये चार लढाऊ जहाजात बसून ५५० सैनिकांसह ते निघाले सध्याच्या सोमालीलँड मधील 'बारावा' येथे ते प्रथम उतरले तेथे त्याना विरोध झाला नाही झांझिबारच्या सुलतानाचे निशाण काढून इजिप्शियन निशाण लावण्यात आले याप्रमाणेच त्याने किसमायू येथील ठाणे प्रतिकाराविना जिंकले आणखी दक्षिणेकडे लामू हे बंदरही त्याच्या ताब्यात आले पण अतर्भागात जायला त्याच्याजवळ उंट किंवा इतर साधने नव्हती किंवा साहित्याचा पुरवठाही नव्हता

झांझिबारचा सुलतान हा ब्रिटिश मांडलिक झाला होता आणि एक ब्रिटिश अधिकारीच इजिप्तच्या वतीने झांझिबारच्या सुलतानाची ठाणी जिंकत होता ! त्यामुळे झांझिबारमध्ये ब्रिटिश अधिकारी किर्कची परिस्थिती बिकट झाली होती त्याने परराष्ट्रखात्याला सर्व वृत्तान्त कळवला खेदिवालाही हे सर्व कळवण्यात आले व त्याने ही तुकडी मागे बोलवण्याचे कबूल केले कॅप्टन मॅकिलापची परिस्थिती फारच केविलवाणी झाली होती त्यांच्या आगबोटीत इजिप्तला परतण्यासाठी कोळसाही नव्हता ! त्याच्या शेवटी त्याला झांझिबारच्या सुलतानाचीच विनवणी करावी लागली अशा तऱ्हेने कॅप्टन मॅकिलापची ही मोहीम मध्य आफ्रिकेकडे न जाता किनाऱ्यावरच संपुष्टात आली ! ही सर्व मोहीम आखण्यात आपली मोठी चूक झाली हे गॉर्डनला कळून चुकले. आपली चूक कबूल करून तसे पत्र त्याने इंग्लंडच्या पतप्रधानाना पाठवले

विषुववृत्तीय प्रदेशात येऊन गॉर्डनला अडीच वर्षे झाली होती हा सर्व भाग इजिप्तसाठी जिंकून घेण्यात त्याला यश आले नव्हते, किंवा व्हिक्टो-

रिया सरोवरात आगबोटही नेता आली नव्हती पण मिळालेले यशही पुष्कळ होते उगमापासून साठ मैलापर्यंत नाईल नदीचा प्रवाह निश्चित झाला होता त्यांच्या बोट अल्बर्ट सरोवरात फिरू लागली होती गुलाम पकडणाऱ्या अरबाना विषुववृत्तीय प्रदेशातून पिटाळून लावले होते आणि लष्करी ठाणी पक्की केली होती त्याने आपल्या सैनिकाना शिस्त लावली होती आणि स्थानिक लोकाची लुटमार त्याना करू दिली नव्हती. नाईल नदीच्या किनाऱ्याने राहणाऱ्या टोळ्याचे प्रेम व मैत्री त्याने मिळवली होती सगळ्यां-मध्ये ही फार महत्त्वाची गोष्ट होती. आता प्रवाशाना वाटमारीची भीती राहिली नव्हती

त्याने जे किल्ले आणि ठाणी स्थापली होती ते काम खूपच महत्त्वाचे होते. त्या ठाण्याच्या अवतीभोवती वस्ती वाढू लागली होती नाईल नदीच्या सहाशे मैलाच्या विस्तारात अशी त्याने बारा ठाणी स्थापली होती त्यांपैकी लाडो, रूफिले, वाडेलाई ही प्रमुख ठाणी होती ती सर्व ठाणी एकसारखीच होती नाईल नदीच्या काठी सोयीस्कर ठिकाणी आठ-दहा एकर जागा निवडत या जागेवरून नाईल नदीचा वरचा आणि खालचा प्रवाह लांबपर्यंत दिसत असे तेथे नाईल नदीला चांगला उतारही असे. ठाण्याच्या तीनही बाजूला मातीचा मोठा भराव घालण्यात येई आणि पलीकडे खदक खोदलेला असे नाईल नदीची बाजू उघडीच असे आणि तेथे एक लहानसा धक्का आणि आगबोटी व नौका दुरुस्त करण्यासाठी लहानसे वर्कशॉप असे नदीच्या वरच्या भागापासून ठाण्याच्या मध्यभागापर्यंत रस्ता केलेला असे आणि दोन्ही बाजूला झोपड्या असत. किल्ल्याच्या मध्यभागी ठाणेदारासाठी विटांच्या इमारती असत तेथेच भांडार, आणि दारूगोळा ठेवलेला असे मातीच्या भरावावर चारी बाजूला तोफा ठेवलेल्या असत. मध्यभागी खेदिवाचा तांबडा झेंडा फडकत असे किल्ल्यात फारशी झाडे नसत हवामान दमट व उष्ण असे सगळीकडे डास भरलेले असत.

गॉर्डनने या किल्ल्याना चागली शिस्त लावली होती दररोज सकाळी साडेपाच वाजता बिग्युल वाजवला जाई त्या जमिनीच्या अफाट विस्तारा-वर हा आवाज लांववर ऐकू जाई (हा बिग्युलाचा आवाज तेथील जमातीच्या

दीर्घकाळ लक्षात राहिला होता. मर्चीसन गेम पार्कजवळ आजही ब्यूगिली नावाचे खेडे आहे नाईलच्या पलीकडच्या तीरावरील एका ठाण्यावरून ब्युगुलाचा आवाज तेथे ऐकू येई म्हणून हे नाव पडले ।) नतर रस्ते स्वच्छ केले जात आणि किल्ल्याबाहेरच्या शेतात सैनिकांच्या बायका कामाला जात रात्री आठ वाजता किल्ल्याचे दरवाजे बद केले जात या किल्ल्यात वस्ती करून राहणे तसे भयानकच होते. त्यांना सर्व पुरवठा नाईल नदीतून येणाऱ्या बोटींतूनच होत असे काही वेळा कित्येक आठवडे किंवा महिने बोट येतच नसे बोटीची ती शिट्टी ऐकली की सर्वजण धावतच किनाऱ्याकडे येत बोटीचे आगमन म्हणजे एक समारभच असे विसाव्या शतकातल्या माणसाला या किल्ल्यातील जीवन तुरुगवासापेक्षा त्रासाचे वाटेल पण त्याही परिस्थितीत ते सैनिक जीवनात मौज व आनद आणण्याचा प्रयत्न करीत रानटी टोळ्यांचा हल्ला केव्हा येईल यांचा नेम नसे नानाप्रकारचे पक्षी आणि रानटी पशू त्यांच्या भोवती आढळत नदीमध्ये पाणघोडे आणि सुसरी खूपच होत्या जवळच्या अरण्यात हत्ती आणि गेंडे याचा स्वैर सचार असे सैनिक नाईल नदीत मासे पकडत आणि स्थानिक टोळ्यातील स्त्रियांना बायका करून घेत पौर्णिमेच्या रात्री ते रात्रभर नृत्य करत आणि मक्केकडे तोंड करून आपली रोजची प्रार्थना म्हणत आगबोट आली नाही तर जगलातील पायवाटानी एका ठाण्यावरून दुसऱ्या ठाण्याकडे ते बातमीदार पाठवत वारुळाखाली मुग्याची जशी सघटना असते तशा प्रकारची ही सघटना होती आणि पूर्वी या भागात कोणत्याच प्रकारची व्यवस्था किंवा शासन नव्हते तेव्हा त्यापेक्षा ही राज्यव्यवस्थेची पद्धत पुष्कळच चांगली होती

पण गॉर्डन आता थकला होता या अडीच वर्षांत एकही दिवस त्याने सुट्टी घेतली नव्हती. बाकीचे लोक आजारी पडून पटापटा मरण पावत असता गॉर्डन मात्र कधीही आजारी पडला नव्हता पण त्याच्या जीवाला नेहमी धोका असे त्याची शारीरिक ताकद सपत आली होती त्याचा विश्वासू सहकारी रोमोनो गेसी याचीही अशीच अवस्था झाली होती ते दोघेही थकले असताना खूप भांडले गॉर्डनच्या इतर अधिकाऱ्याना त्याच्या

कामगिऱ्याबद्दल चांगली बक्षिसे मिळत असताना गेसीला त्यामानाने फारसे मिळाले नव्हते म्हणून तो रुष्ट होता अल्बर्ट सरोवराला प्रदक्षिणा घालून गेसी परत आला तेव्हा गॉर्डनला आनंद झाला त्या बेसावध क्षणी गॉर्डन सहज म्हणाला, 'तू इंग्लिश नागरिक असतास तर किती छान झाले असते ! अरेरे ! पण तू पडलास इटालियन ' हे ऐकून गेसी सतापला. त्याने आपली टोपी जमिनीवर आपटली आणि तो राजीनामा देऊन निघून गेला

त्यानंतर काही दिवसातच गॉर्डनने राजीनामा दिला आणि तो कैरोला परतला गॉर्डनला जे यश मिळाले होते त्यामुळेच तो नाराज होता सुदान आणि मध्य आफ्रिकेची समस्या केवढी प्रचंड आणि गुतागुतीची आहे हेच गॉर्डनने दाखवून दिले होते एखाद्या सर्जनने बारकीशीच शस्त्रक्रिया करून पाहावी आणि ती करताना सर्व शरीरच रोगग्रस्त झालेले आढळावे तशी अवस्था गॉर्डनची झाली होती

कैरोला पोहोचल्यानंतर खेदिव इस्माईलने त्याचे मन वळवण्याचा प्रयत्न केला तेव्हा तो राजीनामा न देता रजेवर इंग्लडला गेला, आणि तेथून त्याने राजीनामा पाठवून दिला अडीच वर्षांच्या श्रमाने तो थकलेला होता. पण हे प्रचंड काम पार पाडण्यास आपण लायक नाही या विचारामुळे तो जास्त निराश झाला होता

★

प्रकरण अकरावे

# सुदानचा राज्यपाल गॉर्डन

सुदानचे क्षेत्रफळ जवळ जवळ १० लाख चौरस मैल आहे. म्हणजे भारता-पेक्षा २ लाख चौरस मैलांनी कमी आणि या विशाल प्रदेशात १८७५ पर्यंत खार्टूम आणि अल् ओबेद ही फक्त दोनच शहरे होती. रेल्वे नव्हतीच ! पण कोठेही रस्ते नव्हते ! नाईल नदीतील बोटींशिवाय दळणवळणाचा दुसरा मार्ग नव्हता कैरोपासून खार्टूमपर्यंत तार टाकली होती आणि बाहेरच्या जगाशी या तारायंत्रानेच संबंध ठेवता येत असे इतर ठिकाणी उंट आणि खेचरे यांच्या सहाय्यानेच मालवाहतूक किंवा प्रवास शक्य असे त्यावेळी या विस्तीर्ण प्रदेशाची लोकसंख्या ९० लाख असावी असा अंदाज होता सुदानला सरहद्दी नव्हत्या पूर्वेकडे तांबडा समुद्र आणि ॲबिसिनीयाचे पर्वत, उत्तरेकडे इजिप्त अशा सरहद्दी सांगता येण्यासारख्या होत्या परंतु पश्चिमेकडे अफाट मैदाने पसरली होती. व निश्चित सरहद्द ठरवलेली नव्हती दक्षिणेकडे य्युगांडाचे राज्य होते आणि मधल्या प्रदेशात आदिवासी टोळ्यांचे राज्य होते. सुदानी लोक अरब आणि स्थानिक रहिवासी यांच्या मिश्रणातून तयार झाले होते बहुतेकांचा मुसलमान धर्म होता. सध्या सुदान-वर इजिप्तचे अधिराज्य चालू होते. त्यांनी १००–१०० मैलावर काही सैनिकी ठाणी ठेवली होती पण ते सैनिक तेथील किल्ल्यातील जणू कैदीच होते कारण किल्ल्यातून बाहेर पडून त्याना करता येण्यासारखे काही नव्हते तेथील भटक्या जमाती आपली गुरे घेऊन चारा आणि पाणी यांच्या शोधात फिरत असत आणि अधूनमधून आपल्या गरजांसाठी व्यापारी

ठाण्याना भेट देत असत ही व्यापारी ठाणी म्हणजे समुद्रावरील बंदराप्रमाणे होती

खार्टूमबाहेर इजिप्तचे राज्य नावालाच होते. टोळीवाले, गुलामपकडे व्यापारी आणि हस्तिदंताचे व्यापारी हे आपल्या मनाच्या कायद्याप्रमाणे वागत आणि हा कायदा म्हणजे 'बळी तो कान पिळी 'चा कायदा असे इजिप्तने दक्षिणेकडे जनरल गार्डन हा राज्यपाल नेमला होता त्याने तेथे थोडी व्यवस्था आणण्याचा प्रयत्न केला पण बाकीचे इजिप्शियन अधिकारी कोणताच विधिनिषेध न बाळगणारे असल्यामुळें गॉर्डनचे फारसे चालले नाही आणि हे ओळखूनच गॉर्डननें राजीनामा दिला

पुन्हा एकदा गुलामगिरीच्या समस्येकडे वळले पाहिजे गॉर्डनपूर्वीचा विषुववृत्तीय प्रदेशाचा राज्यपाल बेकर याने गुलामगिरी नष्ट केल्याची घोषणा केली होती पण त्याने नाईल नदीवरची गुलामाची वाहतूक फक्त थांबवली होती उघडया वाळवटातून गुलामांची वाहतूक पूर्वीपेक्षाही जास्त प्रमाणात होत होती व्यापाऱ्यानी इजिप्तकडे आणि तांबडया समुद्राकडे जाणारे जमिनीवरचे नवे मार्ग शोधून काढले. आणि बार एल् गझाल, दरफूर, आणि कोर्डोफान या प्रांतात मोठ्या प्रमाणात माणसाच्या शिकारी सुरू झाल्या होत्या । तेथे गुलाम पकडणारे पाच हजार लोक आपले काम करत होते आणि गेसी या इटालियन प्रवाशाच्या अंदाजाप्रमाणे या प्रदेशातून १८६० नतर ४ लाख स्त्रिया व मुले पकडून इजिप्त आणि तुर्कस्थानात नेण्यात आली होती मध्यपूर्वेतील अरबाना गुलामाशिवाय आपले कसे निभायचे असे वाटत असे । गुलामाना प्रचड मागणी होती.

गुलामाचा व्यापार थांबवण्यासाठी बेकरने प्रयत्न केले होते. पण तो टोळीवाल्यांशी फार क्रूरपणे वागला असा त्याच्यावर आरोप करण्यात येत होता डॉ स्वाईनफर्थचा उल्लेख मागे आलाच आहे त्याने याच काळात सूदानमध्ये प्रवास केला होता आणि तो हाडाचा संशोधक होता त्याला कोणाचीही बाजू घेण्याचे कारण नव्हते म्हणून त्याची विधाने विश्वसनीय मानावी लागतात गुलाम पकडण्याच्या त्याने सांगितलेल्या हकिगती भयंकर आहेत. गुलामपकडे व्यापाऱ्याना नाईल नदीवरून हाकलल्यानंतर ते आता

बारएल् गझाल प्रांतात जमले होते आणि त्यांच्यात सर्व प्रकार होते. २–४ गाढवे घेऊन एकटाच जाणारा आणि ३–४ गुलाम एकावेळी पकडून परतणारा लहान व्यापारीही त्यात होता आणि हजार–हजार गुलाम पकडणारे व राजासारखे राहाणारे श्रीमंत व्यापारीही तेथे होते स्वाईनफर्थच्या मते इजिप्शियन अधिकाऱ्यांनी ही परिस्थिती आणखी बिघडवली होती गुलामाच्या व्यापाऱ्यावर बंदी आल्यामुळे इजिप्शियन अधिकाऱ्यांचे चांगलेच फावले होते. आणि ते भरपूर लाच खात असत बंदीमुळे गुलामाचा व्यापार आणखीच वाढला होता दारूबंदीमुळे दारूचा प्रसार वाढावा तसेच हे झाले होते ! स्वाईनफर्थच्या मते इजिप्शियन अधिकारी नसते तर सूदानी लोक जास्त सुखी झाले असते व शांततेत राहू शकले असते

सूदानमध्ये परिस्थिती अंदाधुंदीची होती. सरकारी अधिकारी कोण आणि खाजगी व्यापारी कोण हे ओळखताच येत नसे झोबीरपाशाचेच उदाहरण घेऊ या. तो एखाद्या राजासारखा थाटात राहात असे परंतु तो गुलामपकड्या होता त्याचे व्यक्तिमत्त्व भरदार होते आणि दरबारी रितीरिवाज त्याला चांगले माहीत होते विन्स्टन चर्चिल आपल्या तरुण वयात त्याला कैरोमध्ये भेटले होते तेव्हा त्याने त्यांच्यावर चांगलीच छाप टाकली होती बार्–एल्–गझाल आणि दरफूर या सूदानच्या प्रांतात तो गुलाम पकडत असे. अरब घोडेस्वारांचे त्याने खाजगी सैन्यच बाळगले होते ! अंतर्भागामध्ये हे घोडेस्वार मोगलांप्रमाणे शंभर मैलांची दौड मारत त्यांच्याजवळ दयामाया नव्हती त्या प्रांतात त्याच्या घोडेस्वारांची चांगली दहशत बसली होती दरफूर प्रांताचा तो राजाच होता ! आणि इजिप्शियन अधिकारीसुद्धा तेथे जायला भीत असत स्वाईनफर्थने त्याच्या ठाण्याला भेट दिली होती तो लिहितो, 'जोबिरभोवती एखाद्या दरबारात असते तसे सल्लागाराचे कोंडाळे नेहमी असे. उत्तम बांधलेल्या झोपड्यांचा समूह हे त्याचे निवासस्थान होते सभोवार सशस्त्र रक्षकांचा दिवस-रात्र पहारा असे पाहुण्यांचे स्वागत करायच्या दिवाणखान्यात उंची गालिचे घातलेले असत. झगमगीत पोषाख केलेले गुलाम पाहुण्यांना तेथे नेत आणि कॉफी–सरबत वगैरे देत या दिवाणखान्यामध्ये बळकट साखळ्यांना बांधून ठेवलेले सिंह दिसत

असत पडद्यामागे धनी कोचावर बसलेला असे. आणि पडद्याच्या बाहेर फकीर प्रार्थना पुटपुटत बसलेले असत घरगुती कामे करणारे गुलाम आज्ञेची वाट पाहत उभे राहिलेले असत '

गॉर्डनने राजिरामा दिला तेव्हा झोबिरने आपले साम्राज्य त्याचा मुलगा सुलेमानवर सोपविले होते आणि तो कैरोला आला होता खेदिव इस्माईल-कडून दरफूरच्या राज्यपालपदी नेमणूक झाल्याचे फर्मान त्याला हवे होते

इस्माईल नेहमीप्रमाणे अडचणीतच होता सूदान काबीज करण्यासाठी त्याने खूप पैसा ओतला होता पण तो वाया गेला होता ॲबिसिनियातील मोहिमा अयशस्वी झाल्या होत्या खार्टूममध्ये आता इस्माईल पाशा आयूब हा राज्यपाल होता आणि त्याने पैसे उपटण्याची व लाच-लुचपतीची सुरेख व्यवस्था बनविली होती! आणि दरफूर प्रांतामध्ये चालू असलेल्या हैदोसाला कायदेशीर स्वरुप मिळावे म्हणून झोबिरला फर्मान हवे होते.

खेदिव इस्माईल पैशाच्या फार अडचणीत होता आपल्या आहाराबाहेर व्यापार करणाऱ्या माणसासारखी त्याची अवस्था झाली होती वरवर समृद्धी दिसत असली तरी तो दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा होता गुलामाच्या व्यापारात त्याला बराच फायदा दिसत होता परंतु सूदानमधील इतर नैसर्गिक संपत्ती त्यापेक्षा जास्त पैसे देणारी होती हस्तिदंताच्या व्यापारामध्ये कायद्याने त्याला एकाधिकार मिळाला होता दरवर्षी हजारो हत्ती हस्तिदंतासाठी मारले जात ! हिंदुस्थानातल्या हत्तीप्रमाणे आफ्रिके-तल्या हत्तींना शिकवता येत नसे त्यामुळे त्यांचा बाकीचा उपयोग नव्हता युरोपामध्ये बिलियर्डचे चेंडू, पियानोच्या पट्ट्या आणि कलाकुसरीच्या वस्तू यासाठी लागणाऱ्या हस्तीदंताची मागणी प्रचंड होती शहामृगाची पिसे, डिंक, यासारख्या वस्तूमुळे अबकारी उत्पन्नात भर पडण्यासारखी होती

पण हे सर्व कोण करणार ? हा महसूल गोळा करणे, सूदानमध्ये शांतता व सुव्यवस्था आणणे, ॲबिसिनियाशी तह करणे आणि झोबिरपाशासारख्या गुंडाना रोखणे ही कामे कोण करणार ? खेदिवाला एकच नाव आठवले गॉर्डन ! गॉर्डनच हे करू शकेल !

गॉर्डन प्रामाणिक होता व लाचलुचपतीला त्याच्याजवळ थारा नव्हता.

तो शूर सैनिक व उत्तम प्रशासक होता गुलामांचा व्यापार तो बंद करेल व आपले उत्पन्न बुडेल, परंतु ठीक आहे, इतर मार्गांनी तो वाढवून देईल आणि जे कर जमतील ते माझ्याकडे जमा होतील असा विचार करून इस्माईलने गॉर्डनला बोलवायचे ठरविले

१७ जानेवारी १८७७ रोजी इस्माईलने गॉर्डनला तार केली, ' गॉर्डनने एकदा शब्द दिल्यानंतर तो आपले वचन मागे घेईल यावर माझा विश्वास नाही ' खाली सही होती– तुझा स्नेहांकित, ' इस्माईल ! '

इस्माईलच्या या तारेने काम साधले इंग्लंडमध्ये जेमतेम महिना काढून फेब्रुवारी १८७७ मध्ये गार्डन कैरोला पोहोचला गॉर्डनने आपल्या अटी पुढे मांडल्या त्याला सूदानचा राज्यपाल म्हणून संपूर्ण अधिकार हवे होते. गुलामांचा व्यापार नष्ट करण्याचा अधिकार त्याला हवे होते खेदिवाने गॉर्डनच्या म्हणण्याला एकदम मान्यता दिली सूदानच्या राज्यपालाचा पगार वर्षाला ६ हजार पौंड होता तो गॉर्डनने तीन हजार केला फक्त त्याने जरतारी काम केलेला दीडशे पौंडाचा एक झगा खेदिवाकडून स्वीकारला सूदानमध्ये टोळीवाल्यावर छाप टाकायला त्या झग्याचा चांगला उपयोग झाला

इस्माईल गार्डनशी खूपच प्रामाणिकपणे वागला दरफुर प्रांताचा गुड झोविर याला इस्माईलने कैरो येथेच स्थानबद्ध केले दॉर्डनला हवी होती तेवढी शस्त्रे व सैनिक पुरवले कुठल्याही इजिप्शियन अधिकाऱ्याला काढून टाकायचा, बदली करण्याचा किंवा शिक्षा करण्याचा अधिकार इस्माईलने त्याला दिला गॉर्डनला हेच हवे होते

गॉर्डन प्रथम तांबड्या समुद्रावरील मसावा येथे गेला आणि तिथून उंटावर बसून तो खार्टूमला चार मे १८७७ ला पोहोचला पूर्वीचा राज्यपाल इस्माईल पाशा आयूब यापूर्वीच खार्टूमहून निघून गेला होता रागावल्यामुळे व निराश झाल्यामुळे त्याने व त्याच्या बहिणीने राजभवनाच्या १३० खिडक्यांच्या काचा फोडून टाकल्या होत्या ! गॉर्डनचे स्वागत करण्यासाठी सर्व खार्टूम शहर नदीकिनाऱ्यावर जमा झाले होते

त्याने आल्याआल्या बरीच फर्माने सोडली कराचे प्रमाण कमी केले

तुरुगातील अमानुष छळ थांबविला. तक्रार-अर्जासाठी राजभवनाजवळ पेटी ठेवली. लाचखाऊ सैनिक व अधिकाऱ्यांना कैरोला पाठवून दिले लाचलुचपत थांबवली.

गॉर्डन दुसऱ्याला देण्यात उदार असे व स्वतःसाठी त्याने काहीच ठेवले नाही. चीनमध्ये मांचू राजाने देऊ केलेली रक्कम त्याने घेतली नाही. मांचूने दिलेले सुवर्णपदकही त्याने विकून टाकलें आणि त्याचे पैसे इंग्लंडमधील धर्मादाय फंडात जमा केले. त्याचा बहुतेक पगारही याच धर्मादाय फंडात जात असे. खार्टूममध्ये जे जे युरोपियन प्रवासी येत त्यांचे तो चांगले स्वागत करे.

पण गॉर्डन खार्टूममध्ये फारसा राहात नसे. तो उंटावर बसून महिनोन्‌महिने सूदानमध्ये दौरे काढीत असे व मोठमोठ्या मजला मारीत असे. एखाद्या ठिकाणी काही भानगड उपस्थित झाली की तो उंटावरून जलद गतीने तेथे पोहोचे. जेथे त्याला प्राणाचा धोका असे तेथेही शिरून तो आत्मविश्वासाने आपले काम साधून घेत असे. या सगळ्यांचा परिणाम म्हणून सूदानमधील परिस्थिती झपाट्याने सुधारू लागली. खार्टुम शहर वाढू लागले. व्यापार वाढू लागला. खार्टूमच्या दक्षिणेस सूद गवताच्या दलदलीतून नाईलमधून वर जाण्यासाठी जलमार्ग साफ करण्यात आला. बाकी सर्व सूदान शांत झाला होता. फक्त दरफूर प्रांतात गडबड चालू होती. तेथे झोबिरचा मुलगा सुलेमान याने शासनाविरुद्ध अरब टोळ्या जमा केल्या होत्या. तेथील बडखोरांचा समाचार घेण्यासाठी गॉर्डनने आपला इटालियन सहकारी रोमोनो गेसी याला पाठवले. तो नाईल नदीतून दक्षिणेकडे जाऊन बार-एल्-गझाल प्रांतांत घुसला. गेसीनें सुलेमानच्या टोळ्यांबरोबर लहान लहान लढाया दिल्या आणि शेवटी त्याने सुलेमानला आणि इतर सर्व टोळीप्रमुखांना ठार केले. पकडलेल्या १० हजार गुलामांची सुटका केली. झोबिर आणि त्याचे गुंड यांनी २५ वर्षे जो धुमाकूळ घातला होता व जुलूम चालवला होता त्यातून त्याने पश्चिम सूदानची सुटका केली आणि सूदान पूर्णपणे गॉर्डनच्या ताब्यात आला.

गॉर्डनने सूदानचे प्रांत पाडले व आपल्या अधिकारात प्रांताधिकारी नेमले. गेसीला बार्-एल्-गझाल प्रांतात, स्लेटिन या ऑस्ट्रियनाला दरफूर प्रांतात नेमण्यात आले विषुववृत्त प्रदेशात सिनिट्झर या जर्मनाला नेमण्यात आले तो डॉक्टर होता व त्याने मध्यपूर्वेत खूप प्रवास केला होता. त्याने मुसलमान धर्माचा स्वीकार केला होता व 'अमीन पाशा' हे नांव घेतले होते. त्याने एका पत्रात सूदान व विषुववृत्त प्रदेश येथे शांतता प्रस्थापित केल्याबद्दल गॉर्डनची खूप स्तुती केली आहे

इतके सर्व यश मिळविल्यानतरही गॉर्डनच्या मनात निराळेच विचार येऊ लागले त्याच्या मनाला शांतता लाभेना या सर्व यशाचा काय उपयोग आहे असे तो स्वत ला विचारी गॉर्डनला आपल्या इजिप्शियन सैनिकाचा तिरस्कार वाटू लागला. ते निग्रोंशी व सर्व जनतेशी फार क्रूरपणे वागत आपण सूदानचे भले करतो आहोत की सूदानच्या जनतेला जास्त दुःख देत आहोत याचा गॉर्डनला प्रश्न पडे. इजिप्शियन सैनिकानी पूर्वीच्या गुलामपकडच्या अरबांपेक्षा जास्तच अत्याचार केले होते

कैरोमध्ये खेदिव पैशाच्या अडचणीत होता. त्याच्या डोक्यावर युरोपियनाचे आठ कोटी पौंडाचे कर्ज होते. खेदिव ते कसे फेडू शकेल याचा विचार करण्यासाठी कैरोला एक समिती बसली होती. या समितीत इजिप्तच्या बाजूने गॉर्डनने भाग घ्यावा असे खेदिवाला वाटले परतु गॉर्डनला आर्थिक बाबींचे ज्ञान कमी होते व समित्यात काम करण्याची सवय नव्हती समितीत नेमला गेल्यावर गॉर्डन सगळ्यांशी भांडला आणि समितीचे त्यागपत्र देऊन खार्टूमला निघून गेला.

परतु त्याची इच्छाशक्ती व मन शाती नष्ट झाली होती. त्याने दूर केलेले इजिप्शियन अधिकारी त्याचे शत्रू झाले होते आपल्या मुलाच्या मृत्यूमुळे झोबिरपाशा खवळलेला होताच ! आणि इजिप्तमधील इग्लंडचा वकील एव्लिन बारिंग गॉर्डनच्या विरुद्ध होता. त्याचे निष्ठावत सहकारी त्याचेपासून लांब होते आणि तो खार्टूमला एकांतवासातच राहात होता या सगळ्याचा परिणाम म्हणून गॉर्डन सूदान सोडायला उत्सुक झाला होता.

खेदिव इस्माईल राज्यावर आल्यापासून सोळा वर्षे भरमसाट उधळपट्टी करत होता. कर्जफेडीबाबत नेमलेली समिती अयशस्वी झाल्यानंतर युरोपीय सत्ताच्या हस्तक्षेपाविरुद्ध त्याने लष्करी उठाव केला होता आणि स्वतंत्र होऊन कर्जातून सुटण्याचा प्रयत्न केला होता. ब्रिटिश वकील एव्लिन बारिंग व इतर युरोपियन सहकारी यांनी एक कट शिजविला. इजिप्तचा खेदिव शेवटी कॉन्स्टटिनोपल येथील सुलतानाचा नामधारी मांडलिक होता. परंतु युरोपियन सत्तांनी सुलतानाकडून खेदिव इस्माईलला पदच्युत करविले व त्याच्या मोठ्या मुलाला खेदिव पदावर नेमले. इस्माईलने खजिन्यात होती नव्हती तेव्हढी संपत्ती गोळा केली आणि देशत्याग केला. उरलेले आयुष्य त्याने बॉस्फरस येथील राजवाड्यात काढले.

गॉर्डनला हा शेवटचा धक्का ठरला. खेदिव इस्माईलच्या आग्रहावरून त्याने सुदानचे राज्यपालपद पत्करले होते. नवा खेदिव तेव्फिक याच्याबद्दल गॉर्डनचे मत चांगले नव्हते. तसे त्याने पूर्वी बोलूनही दाखविले होते. तो फार अस्वस्थ झाला होता. एका पत्रात तो लिहितो, 'मला आता कशाचीच इच्छा राहिली नाही. जेवण नको! मद्यपान नको! मला सर्व नकोसे झाले आहे. मला फक्त गाढ झोप हवी आहे!'

शेवटी जुलै १८७९ मध्ये त्याने राज्यपालपद सोडायचे ठरविले. परत येताना तो अबिसिनियातून आला आणि या वाकड्या-तिकड्या प्रवासात त्याने उंटावरून ८ ते ९ हजार मैलांचा प्रवास केला! अबिसिनियातून येताना नेबू टोळ्या आणि इजिप्त यांच्यात समझोता घडवून आणण्याचा त्याने प्रयत्न केला. पण ते साधले नाही. त्या टोळ्यांनी त्याला अटक केली आणि शेवटी उंटावर बसवून बाहेर काढले. शेवटी २ जानेवारी १८८० रोजी तो कैरोला पोहोचला. तेथे त्याने राजिनामा दिल्याचे दु:ख कोणालाच झाले नाही. तेथील लोकांना तो चक्रम वाटत होता!

गॉर्डन इंग्लंडच्या रस्त्यावर लागला. परतताना त्याने एक शत्रू स्वत:ला निर्माण केलाच! पॅरिसमधून जाताना त्याने तेथील ब्रिटिश वकील लॉर्ड लिऑन्स याला सांगितले की, इंग्लंडने जर सुदानमध्ये दुसरा राज्यपाल नेमला नाही तर मी फ्रान्सला ती जागा भरण्याबाबत विनंती करेन. त्यावर

लिऑन्सने विरोध दर्शविला. तेव्हा गॉर्डनने त्याला लिहिले, 'आज तुम्हाला सुदानच्या राज्यपालपदाची बाब महत्त्वाची वाटत असली तरी १०–१५ वर्षां-नतर आपल्याला त्याचे काहीच महत्व वाटणार नाही त्यावेळी आपण सर्वजण ६ फूट लांब आणि ३ फूट रुद काळ्या पेटीत बद झालेले असू !' लॉर्ड लिऑनला साहजिकच वाटले की गॉर्डनचे डोके ठिकाणावर नसावे !

लवकरच गॉर्डन आणि सूदान याना जोडणारा आणखी एक दुवा निखळला ! गेसी मरण पावला गॉर्डन निघून गेल्यानतर बार-अल्-गझॉल प्रांतात उप राज्यपाल म्हणून तो एक वर्ष होता. पण ईजिप्शियन अधिकाऱ्यानी नतर त्याला उपराज्यपालपदावरून काढले आणि साधा अधिकारी केले खार्टूमला परत येताना सूद गवताच्या दलदलीत तो तीन महिने अडकून पडला त्याच्या बरोबरच्या चारशे लोकांपैकी बहुतेक लोक उपासमारीने मेले त्यांची सुटका होण्यापूर्वी काहींनी इतराना मारून त्यांचे नरमांसही खाल्ले ! गेसी कसाबसा जिवत राहिला. पण ईजिप्तला पोहोचल्यावर तो मरण पावला गेसी मृत्यू पावल्याचे ऐकून गॉर्डनला फार दुःख झाले

१८८० सालापर्यंत आफ्रिकेच्या सशोधनाचा कालखड सपत आला होता ही विशाल भूमी ताब्यात घेण्यासाठी व आपले स्वार्थी हेतू राबविण्यासाठी येथून पुढे युरोपियन सत्ताची स्पर्धा लागलेली आपल्याला दिसेल येथून पुढच्या २० वर्षात या लोभी युरोपियन सत्तांनी आफ्रिकेचे लचके कसे तोडले याचा इतिहास तितकाच रोमाचकारी आहे पण तो एक निराळाच विषय होईल !

REFBK-0022002